


संगीत

# विश्ववैचित्र्य नाटक

अथवा

## कॉलेजिअन्स.

लेखक

श्रीयुत माधव नारायण जोशी

सं० 'कृष्णविजय' 'कर्णार्जुन' 'विनोद' 'मनोरंजन' 'करमणूक'
'आनंद' 'सत्त्वसाफल्य' 'हास्यतरंग' 'स्थानिक-स्वराज्य'
'वऱ्हाडचा पाटील' 'पुनर्जन्म' 'गिरणीवाला'
'वशीकरण' इ० नाटकांचे कर्ते.

---

पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे सर्व हक्क कर्त्याकडे

---

आवृत्ति पहिली ] १९३२ [ प्रती २५००

---

किंमत १२ आणे.

IRBK-0101114

IRBK-0101114

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें.

श्री. माधवराव जोशी कृत

**सं. लब्धप्रतिष्ठित** (प्रहसन)

**सं. कॉलेज**

**सं. शेतकरी**

लवकरच रंगभूमीवर येतील.

प्रकाशक—गणेश काशिनाथ गोखले
सेक्रेटरी, श्रीसरस्वती मंडळ
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें

# प्रस्तावना

मराठी रंगभूमीला विविधता आणण्याचें श्रेय ज्या अगदीं बोटावर मोजण्याइतक्या नाटककारांस दिलें पाहिजे त्यांत श्री. माधवराव जोशी यांची गणना करणें अगदीं अवश्य आहे. नाटकें कांहीं विशिष्ट विषयावर विशिष्ट तऱ्हेनें लिहिलेलीं व विशिष्ट रसानेंच ओथंबलेलीं असलीं पाहिजेत असा अलिखित निर्बंध पडल्यासारखा झाला होता. त्यामुळें संविधानकें बदललीं, कालविपर्यय करून पौराणिक कथांना आधुनिक पोषाक चढविला किंवा सध्याची सामाजिक अगर राजकीय परिस्थिती, पात्रांची नवी निर्मिति करून त्यांच्याकडून वदविली तरी त्या सर्वांचा साचा ऊर्फ विटाळें जवळजवळ एकाच तऱ्हेचें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें विविधता, विनोद व वैचित्र्य यापासून होणाऱ्या आनंदाला आपण मुकलों होतो. सुदैवानें ही स्थिति आतां पालटू लागली ही गोष्ट फारच चांगली झाली, व या पलटी देण्याच्या कार्यांत श्री. माधवराव जोशी यांचा वाटा मोठा आहे यांत शंका नाहीं.

श्री. माधवराव जोशी यांनी नाटकें लिहिण्याचा आपला हेतु स्पष्टपणें अनेक ठिकाणीं निर्दिष्ट केला आहे. थकल्याभागलेल्या जीवांची घटकाभर करमणूक करून व त्यांतल्यात्यांत सामाजिक व्यंगें, यांच्यांवर झोड उठवावी व समाजाला त्यांचा वाईटपणा पटवून देऊन तीं झाडून झटकून काढण्यास मदत करावी हा त्यांचा मूळचा हेतु अलीकडे त्यांनीं सदर बाबतींत एक पाऊल पुढें टाकून समाजांतील अनेक गुंतागुंतीच्या व भानगडीच्या प्रश्नावरहि नाटकें लिहावयास सुरवात करून, नाटकसृष्टीचें एक नवेंच दालन उघडलें आहे. स्थानिकस्वराज्य संस्थांच्या प्राथमिक अवस्थेमध्यें जे अनेक दोष उत्पन्न होणें अगदीं सहज होतें ते त्यांनीं मोठ्या कौशल्यानें आपल्या नाटकांत दाखविले. या दोषांच्या, 'खड्ड्यांत पडूं नका' असाच इशारा 'स्थानिकस्वराज्य' हें नाटक सर्वांना देत आहे, हें स्पष्ट दिसतें. 'गिरणीवाला' या नाटकांत तर त्यांनीं भांडवलवाले व मजूर यांच्या संबंधाचें सुंदर चित्र दाखवून हें भांडवलशाहीचे भूत गरिबांच्या मानगुटीवर कसें व किती तऱ्हेनें बसतें व त्यावर उपाय काय करावा हें दाखवण्याचा प्रयत्न केला. 'वऱ्हाडचा पाटील' या नाटकांत भोळा शेतकरी आपल्या उपजत भावनांच्या राज्यांत वावरत असला तरी त्या राज्याच्या

इमारतीला सावकारांच्या घुशी लागून ती जमीनदोस्त कशी होते हें उत्तम रीतीनें विशद केलें आहे. मनुष्यस्वभावाच्या बारीक सारीक खोंचा या नाटकांत तर बहारीनें दाखविल्या आहेत. तात्पर्य, या सर्व नाटकांवरून एका नवीन सृष्टींत त्यांनीं प्रेक्षकांस आणून सोडलें यांत शंका नाहीं.

लोकप्रियता ही त्यांच्या नाटकांच्या मागें उभी आहे हें कोणीहि कबूल करील. कोणी कितीहि नाकें मुरडोत, सोवळ्या व कोवळ्या मनाचे लोक मोठा घात झाला म्हणून ओरडोत किंवा आपल्या उघड व प्रच्छन्न कारस्थानांनीं त्यांच्यावर हल्ले चढवोत, त्यांची लोकप्रियता ते कमी करूं शकत नाहींत. नाटकें, कादंबऱ्या व काव्यें यांची लोकप्रियता मोजण्याचें एक प्रचलित माप आहे. तें हें कीं, जीं पदें सर्व लोकांच्याकडून प्रत्यक्ष व मनांत गुणगुणलीं जातात तीं खरी लोकप्रिय पदे होत. व ज्या नाटकांतील पात्रें आपल्या विशिष्टत्वानें लोकांपुढें उभीं राहतात व व्यवहारांत त्या पात्रांचीं नांवेंच जेव्हां त्या विशिष्टत्वाची जातिनिदर्शक होतात, तेव्हांच ती खरीं लोकप्रिय नाटकें झालीं असें समजावयाचें. या मापानें श्री. माधवराव जोशी यांचीं पद्यें व त्यांचीं पात्रें यांनीं लोकभाषेंत कायमचेंच स्थान पटकावलें आहे यात शंका नाहीं. उहाहरणें देऊन याचें विशदीकरण करावयाचें कारणच नाहीं.

त्यांचीं नाटकें निर्दोष आहेत असें कोण म्हणेल? तें निर्दोषत्व कोणालाच लाधलें नाहीं. सांप्रतचें नवें नाटक ' विश्ववैचित्र्य ' हें त्यांच्या लौकिकास साजेसेंच आहे. मार्मिकता, सूक्ष्म निरीक्षण, बुद्धिमत्ता व उच्च दर्जाचा विनोद व रोमान्स यांची ' विश्ववैचित्र्य नाटकां 'त पोटभर मेजवानी सर्वत्रांस मिळेल यांत शंका नाहीं. यांच्या कृतीकडे निराळ्या दृष्टीनें पाहणारास श्री. माधवरावांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे ' ढगांत चमकणाऱ्या विद्युल्लतेला अमूकच आकारानें चमकलें पाहिजे असा हुकूम सोडणें, जसें कोणत्याही शास्त्रज्ञांस शक्य नाहीं ' त्याचप्रमाणें प्रतिभेनें अमूकच पद्धतीचा वेष घेतला पाहिजे अशी आज्ञा करणें शक्य नाहीं.

ता. १५।८।३२, पुणें. ] दामोदर विश्वनाथ गोखले.

॥ श्रीराम ॥

# संगीत विश्ववैचित्र्य नाटक.

अथवा

६६२८ ना.नी. ६७२ ३०/५/३

# कॉलेजिअन्स

## ईशस्तवन.

### पद.

वंदन परमेश्वरासी । संत सखा सौख्य राशी । निर्मुनी जो विश्वगोल । अणू रेणूही व्यापी त्यासी ॥धृ॥ सकलासी आधार । जो अनाम निर्विकार । निराकार प्रभू अपार । नच सीमा वैभवासी ॥ १ ॥ जन्मा दे जीवासी । परि पालन करीत त्यासी । कळती हृदय भाव ज्यासी । माधव कवी वाग्विलासी ॥ २ ॥

सूत्रधार:—कोणत्याही कार्यारंभी ईशचिंतन करणं, म्हणजे पवित्र मनानं, त्या कार्याला प्रारंभ करणं होय! आणि पवित्र मनानं, केलेला प्रारंभ, कार्य सिद्धीस नेल्याशिवाय रहात नाहीं! ठीक, आपल्यावर नेहमीं कृपा दृष्टी ठेवणारे, सर्व आबालवृद्ध रसिक, आपले विश्ववैचित्र्य नाटक पहाण्यास, कसे अधीर झालेले दिसतात! तेव्हां आंत आपल्या नटवर्गांनीं, आपआपली भूमिका घेऊन सज्ज झाले आहेत किंवा नाहीं, तें पाहून ये! म्हणजे तांबडतोब नाटकाला सुरवात करूं!

मित्र:—ठीक आहे! ( दोन गृहस्थ येतात. )

एम्. ए.—अहो, सूत्रधार ! नमस्कार ! नमस्कार !

सूत्रधार—नमस्कार ! आपण कोण ! काय काम आहे !

एम्. ए.—हे वकील आहेत ! एलएल. बी. आहेत ! चिपळोणचे राहणारे आहेत !

सूत्रधारः—असं, एकूण तुम्ही चिपळोणकर अहात तर;

वकील—आणि हे मराठी घेऊन, एम. ए. झालेले गृहस्थ आहेत ! दाभोळचे आहेत !

सूत्रधार—उत्तम आहे ! एक दाभोळकर आणि तुम्ही चिपळोणकर !

वकील—कायहो, आज कोणचा आणखी नवा तमाशा करून दाखविणार आहांत ? वशिकरणातून जो जीव घेऊन बाहेर पडतों, तों लागलीच दुसरा तमाशा ! ( सूत्रधार हंसतो. ) कांहो, असें निर्भत्सनायुक्त हसतासे !

सूत्रधार—अरे, अरे, अरे ! अरे !

वकील—कां ! अरे ! अरे कां !

सुत्रधार—एक कायदे पंडीत, आणि दुसरा मराठी घेऊन, एम्. ए. झालेला पंडीत ! अशा पंडीतांच्या भाषेंतील शब्दांचा, दुर्गादेवी सारखा दुष्काळ पाहून, थोडं–वाईट वाटलं इतकंच ! कायहो, तमाशा म्हणजे काय ?

एम्. ए.—तमाशा म्हणजे तमाशा ! कांहीं तरी विभत्स, अशलील, असभ्य त्याला तमाशा असं म्हणतात !

सूत्रधार—अहात खरे दोघेही महान पंडीत ! तर मग ऐका ! तमाशा हा उर्दू शब्द असून, त्याचा अर्थ प्रेक्षणीय वस्तू असा आहे ! समजलांत ! काय हो ! एवढं इंग्रजी शिकलात आणि मराठीचे पंडीत म्हणून, शिक्कामोर्तब मुंबईला करवून घेतलं आणि तुम्हांला तमाशाचा अर्थ कळत नाहीं ! अगदीं बरोबर आहे ! शेंकडो डोकी दिसली, तरी मेंदू फारच थोडयांत असतो !

वकील—अहो, अदवातदवा बोलण्याचं कांहीं कारण नाहीं !

सूत्रधार—मी तरी तेच म्हणतो, तुम्हांला तरी अमूक, अभद्र, अशलील, असभ्य वगैरे शिक्कामोर्तबकरायचा काय हक्क आहे ! तुमच्या म्हणण्या प्रमाणं जर आम्ही वागायचं ठरवलं, तर सर्व संस्कृत आणि मराठी वाङ्मय समुद्रांत बुडवून, नुसत्या अंकलिपी मुळाक्षर, भूगोल, अंकगणिताची

पुस्तकच शिल्लक राहतील ! नुसतां सभ्यपणाचा आव आणलेल्या लब्ध प्रतिष्ठिताच्या मर्जीनुरुप, आजपर्यंत कोणताही कवी वागला नाहीं ! किंवा वागणार नाहीं ! ढगांत चमकणाऱ्या विद्युल्लतेला अमूकच आकारानं, चमकलं पाहिजे, असा हुकूम सोडणं जसं कोणत्याही शास्त्रज्ञान्याच्या हातीं नाहीं, त्याचप्रमाणें कोणत्याही लब्ध प्रतिष्ठीताला, अमक्याच साच्यांत काव्य ओत, असं कवीला म्हणतां येणार नाहीं ! आणि एखाद्या भाडोत्री किंवा माधुकऱ्याशिवाय, कोणताही स्वतंत्र बाण्याचा कवी तुमच्या गुरकावणीला भीक घालणार नाहीं !

वकील—ठीक आहे ! तर मग आम्हांलाही ह्याचा विचार करावा लागेल !

सूत्रधार—तसंच तुमच्यासारख्या हेकड, तिरसट आणि दांभिकाबद्दल आम्हांलाही विचार करावा लागेल ! कायहो, रंगभूमिवरील दृश्य काव्याचे प्रकार किती आहेत, हे तरी ठाऊक आहे कां आपल्याला ?

एम. ए.—नाटक, तमाशे, ललीत, छकडी, कलगीतुरा वगैरे ! वगैरे !

सूत्रधार—अहात खरे बुवा, कलगी तुरेवाले दोघेही ! आज आमच्या हिंदुस्थानांत नाट्य लेखनाला सुरवात होऊन, अडीच हजार वर्षें होऊन गेली, दंडी, भास, कालीदास, भवभूती, शूद्रक, हर्ष सौमिल्ल, यांनीं कंठशोष करून, दृश्य काव्य जे नाटक त्याचे नाटक, प्रकरण, भाण, डीम, प्रहसन, समवकार, व्यायोग, विथी, वगैरे दहा प्रकार आहेत म्हणून सांगितलं ! बरं, ज्या इंग्रजी अक्कलेची, तुम्ही घमेंड मारतां, तो तुमचा युरोपियन ज्ञानदाता पिता देखील, ड्रामा, फॉर्स, ऑपेरा, वर्लेसक्युस, एस्क्ट्रा, व्हेगेंटा, कॉमिडी, ट्रॅजेडी, असे नानाप्रकार नाटकाचे असतात म्हणून कानीकपाळी ओरडतो, असं असून, तुम्हां पंडितांच्या फक्त नाटक आणि तमाशा एवढं दोनच शद्ब तुमच्या चोचीत कां ? त्यातलाही एक चुकीचा ! कायहो, एवढा तुम्हांला शब्दाचा तुटवडा कां ?

वकील—हा मनुष्य फारच उर्मट दिसतो !

सूत्रधार—नाहीं ! मी लव्हाळ्यापेक्षांही नम्र आहे ! तुमच्या डोळ्याला दंभाचा विकार असल्यामुळें, मी उर्मट दिसतो इतकंच !

एम. ए.—कायहो, तुम्ही जो अत्ता आमच्या दुष्काळांत पांच, पन्नास, नाटक प्रकार शब्दांचा पाऊस पाडलांत, त्यांपैकीं कांहीं प्रकार उलगडून समजून सांगा पाहूं !

सूत्रधार—अहो, महाराज ! मी कांहीं येथें शाळा काढली नाहीं ! तुम्हांला जर इतकी ज्ञानाची तीव्र तहान लागली असेल, तर इंग्रजी आणि संस्कृत नाट्यशास्त्राचे ग्रंथ वाचा आणि नुसतच लब्धप्रतिष्ठीत म्हणून मिरवायच असेल तर, जसे अतां अहांत तसेंच, दोनच शब्द घोकत जन्मभर मिरवा जगांत ! हे सर्व प्रेमळ रसिक, तुमच्यासारखे रानावनांत व्रण विदारण करायला टपलेल्या, जातीचे नसून, केवळ हंसाच्या आणि भ्रमराच्या जातीचे आहेत, ह्यांच्या आनंदात कृपाकरून व्यत्यय आणूं नका !

वकील—ठीक आहे ! आम्हांला ह्याचा विचार करावा लागेल !

सूत्रधार—कबूल !

मित्रा, हा अनुभव मला नेहमींचा आहे ! यांच्यामुळं ह्या रसीक, मार्मिक प्रेक्षकांचा थोडासा खोंळबा झाला, याचं वाईट वाटतं ! प्रथम यांची प्रार्थना करून, लागलीच नाटकाला सुरवात करूं !

पद.

**रसिक हे मधूप गमती । अंतरीं धरूनी प्रीती । कुसुमाची मकरंदा ॥ चाखाया ॥ वनीं फिरती अली पंक्ती ॥धृ०॥**
**नाट्य कुसूम लव परिमळता । लोभुनीया रसिक तसे । प्राशिती काव्यरसा । मोद भरे त्यागुनिया दोषाते । दावीती गुण प्रीती ॥ १ ॥**

# अंक पहिला.

ना.गो. ६८२ ३०१५/३२

## प्रवेश पहिला.

[ सीन—रस्ता. ]

**विनायक**—दोन दिवस रत्नागिरीला जाऊन आलो, तो जसा काय वर्ष होऊन परत आल्यासारखं मला झालं आहे ! ज्याच्या नशिबी नित्याचा प्रवास असेल त्याचं काय होत असेल, देव जाणे !

**निलकंठ**—कोण विनायकराव ? अप्पासाहेब ! ओहो, नमस्कार ! गुडमॉर्निंग ! गुडमॉर्निंग ! सो ग्लॅड टू सी यू ! तुम्ही आमचे जुने दोस्त म्हणून, अलीकडे जो भेटेल, तो आपला माझ्याजवळ तुमची चवकशी करीत असतो ! सगळ्या गांवांत बभ्रा झाला आहे. पण माझा म्हणाल तर मुळींच विश्वास नाहीं त्याच्यावर ! आतां अनायासे गांठ पडली तुमची, आणि सहज ओघाला आलं म्हणून विचारूं कां तुम्हांला ? ( कानांत दोघे कुजबुजतात.) असं कोण गाढवासारखं करीलबुवा, काय खरं कीं नाहीं ! त्याला म्हणजे येरवड्यालाच पाठवला पाहिजे !

**विनायक**—पण मी विचारतो, तुमच्या कुटाळ कंपूच्या बापाचे त्यांत काय तीन चव्वल जातात ! मी तिच्याशीच लग्न लावणार ! पहातो कुणाची छाती आहे अडवायची मला ! मला या तुमच्या कॉलेजांतल्या नि हाय-स्कूलांतल्या टिवल्या भावल्या करीत, गांवांतून मिरवणाऱ्या श्रृंगार–नटव्या मला नको आहेत ! परकीय ज्ञानाच्या दारूनं झिंगलेल्या, गोऱ्या गोमट्या, छैलछबेलीचा पतिराज म्हणून सुप्रसिद्ध पुरुष होण्याची, माझी इच्छा नाहीं समजलांत !

**निलकंठ**—बरं, लावा बुवा लग्न तिच्याशीच ! उगीच वितंडवाद कशाला !

**विनायक**—हो, हो ! आणि म्हणूनच जिला तुम्ही अशिक्षित वेडगळ वगैरे समजतां, त्या खेडवळाशीच मी लग्न लावणार ! रात्रंदिवस सभांतून लेक्चर देणाऱ्या, समसमान हक्काची चर्चा करणाऱ्या,

वितंडवाद घेऊन हमरीतुमरीवर येणाऱ्या, पाश्चात्य शिक्षणाच्या चोच-ल्याची धुंदी चढवून, बायकोपणा टाकलेल्या एखाद्या एज्यूकेटेड रंगेल छेलछबेलीशीं जन्माची ब्रम्हगांठ मारून, मी घरीं तिच्या ऐवजी, चूल फुंकीत बसूं म्हणतां ! एवढी अक्कल नाहीं मला ! कबूल ! माझ्या बायकोला काय पाहिजे, तेवढं मी तिला शिकवलं आहे, आणि तेवढंच तिचं ज्ञान मला पुरे आहे !

**निलकंठ**—उत्तम आहे ! पण कायहो, समाजातल्या चालीरीति, ज्ञान, शिक्षण वगैरेची कांहीं एक जरूरी नाहीं म्हणतां !

**विनायक**—कशाला पाल्हाळ लावतां ! हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे ! मला नुसतां सद्गुणच पुरे आहे ! सार, असार, बरं, वाईट, खरं, खोटं, सद्गुण, दुर्गूण. पण आज दहा वर्षं मी अशीच खबरदारी घेतली आहे कीं, तिला नुसतं सारं, बरं, खरं आणि सद्गुण, एवढंच नुसतं शिकवून, असार, वाईट, खोटं, दुर्गूण अशा कांहीं वस्तू या जगांत आहेत, ह्याचा तिला मागमूस देखील लागूं दिला नाहीं ! आणि म्हणूनच तिला नुसतं उजळणी, बेरीज, वजाबाकी, कांहीं थोडा गोष्टीरुप इतिहास, भूगोल, तसंच श्रीगणेशा, शांताकारम् वगैरे अगदीं कामापुरतं पढीवलं आहे! जगा-तल्या पाजी लोकाचे शब्द, प्रेम, प्रतिप्रणय, विरह, वगैरे शब्दांचे तिला दया, माया, लोभ, आवड असे पर्याय शब्द घोकींवले आहेत ! प्रिये, प्रिया ! सख्या, लाडके ! वगैरे संसाराचे वाटोळे करणारे शब्द, जमिनींत गाडूनटाकून, नुसते पतिदेव, सहचारिणी, कांता, सती, अर्धांगी असे नुसते कनवाळू, ममताळू शब्दच पढीवले आहेत !

**निलकंठ**—तुमचं शिक्षण, म्हणजे नुसतां कित्ता असायचा ! छान, पण कायहो ! पतिदेव, कांता ! पत्नी, भ्रतार ! अर्धनारी, नटेश्वर वगैरे नात्याचे व्यवहार, धर्म, एकमेकांशी वर्तणूक, वगैरेचा कांहीं उल्लेख केला कीं नाहीं ?

**विनायक**—बिलकूल नाहीं ! मी तिच्याशीं लग्न केल्यावर, कळून येईलच तिला आपोआप ! तसंच पंचशर, अनंग, मदन, वगैरे आलिंगन, चुंबन शब्दांना, डिक्शनरीतल्या पानांत लपून बसायला, मी जागा दिली नाहीं, यांत काय ते सर्व समजा !

निलकंठ—कमाल आहे बुवा तुमच्या जपणूकीची! आणि त्या बिचाऱ्या तुमच्या सहधर्मचारिणीच्या भोळेपणाची!

विनायक—काय सांगू! कुंतीला कर्ण झाला तशीच बायकांना मुलं होतात कांहो, म्हणून जर तिनं मला विचारलं, तर त्यांत अगदीं मला नवल वाटायचं नाहीं! शिक्षणाची मी तशीच काळजी घेतली आहे! या शिवाय शिक्षण म्हणजे तुळशीची पूजा, प्रदक्षणा, मारुतीस्तोत्र, शिवणंटिपणं, निवडणं, दळणं, कांडण, स्वयंपाक करणं वगैरे.

निलकंठ—उष्टी, खरकटी, शेणगोळा, झाडणं, सारवणं, धुणी, भांडीं घासणं, वगैरे वगैरे महत्त्वाचे विषय असलेच पाहिजे भरतीला!

विनायक—हो, हो! अलबत! आज जरी एखाद्या जहागीरदारणीसारखी तिची रहाण्याची ऐपत असली, तरी देखील तिला स्वयपाकपाणी, उष्टीखरकटी हे आलंच पाहिजे! कुटाळ जगानं पाहिजे तर खुशाल दांत काढावेत! पण माझ्या आवडीप्रमाणं, समजुतीप्रमाणं आज दहा वर्षं, मी तिला वाढविली आहे! आणि तिच्या सारखी सद्गुणी, भोळी, मायाळू बायको मला पुरे आहे! काय सांगू निळकंठराव! सृष्टीनिर्मित प्रेमलतेची सौंदर्याची, आणि सद्गुणाची जणू काय अमोलीक ठेवच, तिच्या बापानं माझ्या स्वाधीन केली म्हणानात! माझं त्रिभुवनाचं राज्य, जर कांहीं असेल, तर ती एक सरला.

### पद.

**माझ्या जिवाचा ठेवा सुखाचा गवसला जणु विश्वासाचा ॥ ध्रु० ॥ आधार झाला मम जीवनाचा। बहरला तरू प्रेमाचा ॥ १ ॥**

माझं जीवितसाफल्य जर असेल, तर सरला! तिच्याशिवाय मला जग बुडाल्यासारखंच आहे!

निलकंठ—तुमच्या अकलेपुढं हा पहा आमचा कोपरापासून नमस्कार! तुमची ती प्रेमला, निर्मला, विमला, सरलादेवी ठेवा तुमची तुम्हीच गुलदस्तांत! तुमचं ते भोळ, बावळ, खेडवळ तुमचं तुम्हांला लखलाभ असो!

**विनायक**—होय वरं असून दे लखलाभ! तर मग तुमची छेलछबेली, एज्यूकेटेड, श्रृंगारलालडी, रोमांटिक पानडी, ती काव्यधुंद गुलावछडी, मोरासारखे केंस पिंजारणारी बगडी, बहात्तर खोड्याची सोनतुकडी तुमची तुम्हांलाच लखलाभ असो! तुमच्यापेक्षां शब्दकोशभांडार माझ्यापाशी जास्त आहे समजलांत!

**निलकंठ**—तुम्ही आलात अगदीं आतां एकेरीवर! सध्या तुमच्याशीं वितंडवाद नको! भेटूं पुन्हां म्हटलं! ठीक आहे! आवळ्याची मोट बांधून, लक्ष असून दे चांगलं तिच्यावर! नमस्कार!

**विनायक**—ठीक आहे! डोळ्यांत तेल घालून जपतो वरं! (निलकंठ जातो.) अरे जा वेड्या! आवळ्याची मोटवाल्या हा कांहीं कच्चा गुरूचा चेला नाहीं म्हटलं! मला लेकाचा शिकवितो आहे रोमान्स! ह्या कंगवाफणी करणाऱ्या कॉलेजाईट पारव्यांना, बेलगामी स्वप्नमय काव्यसृष्टींत भराऱ्या मारणाऱ्या ह्या चंडोलांना, काय अक्कल स्त्रीपरिक्षेची! किंचित ज्ञानाचा फास्फरस बुडीं चिकटल्यामुळें, लुकलुकऱ्या या कॉलेजाइट काजव्यांना काय अक्कल आहे, बायको पसंत करण्याची! म्हणे मुर्खांची खेडवळाशी लग्न कां करतां? अहो, न करून काय करतां! पहातोंच आहे गावांतून लोकांचे तमाशे! आमच्या आणि युरोपच्या संस्कारांत, मनोधर्मांत, चालीरीतींत, हवापाण्यांत, जमीनअस्मान फरक धडधडींत ठाऊक असतांना, तिकडच्या चालीरीतींचा, मतांचा, तत्वांचा गांजा ओढणाऱ्या, गांजेकसाचे पहातोंच आहे, गावांतून संसाराचे धिंडवडे! हे फाजील अक्कलेचे परधार जिणे पहिल्यानदां एटिकेट, फॅशन, रोमान्स करून, सुंदर दिसणाऱ्या खबुतराच्या मागं लागतात! चार दिवस घरीं आणून, बेहोप होतात! पण मग जेव्हां ते गिरेबाज कबूतर रोमान्स करीत ह्या घरावर बैस, त्या घरावर बैस, असं भराऱ्या मारूं लागतं! तेव्हां या बेटयाचे डोळे उघडतात! वरं, त्या मोकळा चाकळ्या वारा प्यायलेल्या खबुतराची दमछाकी होऊन, पुन्हां खुराड्यांत येईपर्यंत, या परधाराजिण्या गांजेकसाचे डोळे मिटतात, मिळून डोळ्याची आणि संसाराची उघडझाप एकदमच होते झालं! उगीच ह्या लेकानं माझा वेळ घेतला! माझ्या सरलेला केव्हां डोळे भरून पाहीन असं झालं आहे! (जातो.)

## प्रवेश दुसरा.

[ सीन-कॉलेज स्टूडंटची खोली. पात्रेः-प्रभाकर व दिनकर ]

**प्रभाकर**—हा गुडघ्यापर्यंत लांबीचा सिल्कन शर्ट, त्याच्यावर अमेरिकन एक गुंडीचा, बेंबीपर्यंत लांबीचा, शॉर्टकोट, बटन होलमध्यें हें गुलाबाचे फूल, हा गोंडेदार लोकरीचा स्कॉर्प, तीन तीन पठाण एकेका अस्तनींत मावतील असा मोकळा चाकळा, पठाणी पाय चोळणा! हें सिल्कनचे पायमोजे त्यावर हा मखमली लेदरचा, चढवलेला व्हॉईट टेनीस शू, हा अस्तनींतील काश्मीर बोकेमध्यें भिजवलेला हातरुमाल, चार्लीचापलीनच्या ह्या ओठावरच्या शाईचीं दोनच टिंब दिल्यासारखा, मिशाचा स्प्लेंडिड कट, हेरोल्ड लाईडचा नाकावर चढवलेला, बैल चष्मा! मॉयगॉड! सिंपली रोमांटिक, बायजोव्हस्वीट नाव्हेलटी!

पद.

**वघ केवि नटला कॉलेज राजा। नुरे वैभवासी सीमाही माझ्या ॥ ध्रु० ॥ पोमेड पावडरीनें, कंगवा फणी ब्रशानें, हा मस्तकीं विराजे, केसाळ किरिट माझा ॥ १ ॥ शिव स्कंधीं सर्प राही, भम कंठीं तेवी पाही, हा स्कॉर्प सुवक फडके, ध्वज हास्त्र जाण माझा ॥ २ ॥ नव कल्पनादि रत्ने, खाजिनाही पूर्ण भरला, व्हलेट सेफ्टीरेझर, हा राजदंड माझा॥ ३॥**

वेल, कॉमरेड! दिनकर सोंगाडे! हाऊ डु यू लाईक इट्!

**दिनकर**—ब्रदर, प्रभाकर बाताडे! सिंपली चार्मिंग! युआर ए वंडरफूल फेलो! वेल, लेटस हॅव फर्स्ट टी! कमलॉंग!

**प्रभाकर**—तारुण्याचा, यौवनाचा, भरजवानीचा मद किंवा मस्ती, अंगांत न सामावल्यामुळें, तिला श्वासरूपानें फूं फूं करीत, नासिक चाभेकळींतून, बाहेर लोटणाऱ्या, आठरा वीस वर्षांच्या तरण्याबांड पोरीचा, म्हतारा नवरा, जसा अभ्रक भस्म खाऊन, आपली तडफ तिला दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो! किंवा तिचे मनोरथ पूर्ण करण्याचा प्रयत्नांत, तो जसा अगदीं रडकुंडीस येतो! त्याचप्रमाणें ह्या कॉले-

जातल्या, बहुरंगी सरस्वतीशीं झगडतांना माझं झालं होतं! युनिव्हर-सिटीच्या कोर्टांत, सरस्वतीवर काडीमोड करून, घेण्याकरतां लावलेल्या, खटल्याचा निकाल जेव्हां मी ऐकला, तेव्हां माझा जीव खाली पडला! हा पहा, टेलीग्राम "प्रभाकर दिवाकर बाताडे सक्सेस फुली पॉस्ड् बी. ए. एक्झामिनेशन!" ही सरस्वतीवर मिळवलेली डायव्होर्स डीक्री. जेव्हां माझ्याहाती आली, त्यासरशी सगळ्या पुस्तकांचा गठ्ठा बांधून त्या सरस्वतीला तारवाल्याच्या मी स्वाधीन केली! आणि आजपर्यंत माझा तिनं अमानुष छळ केल्याबद्दल, तिला भरबाजारांत वाटेल त्या चिवडेवाल्या, हॉटेलवाला, वाण्याला विकून टाकून, येतील ते पैसे, तूंच बक्षीस घे. म्हणून आज्ञा केली! तात्वडतोब तारवाल्यानं सरस्वतीला बगलेंत मारून पलायन केलं! आतां जर कां अभ्यासाचं पुस्तक दिसलं, तर ठोकरीनं फुटबॉलसारखं उडवीन, इतका भयंकर चिडलो आहे!

**दिनकर**—कॉलेजमध्यें काय अभ्यासाचा दिवा लावलांत. तो पहातच होतो म्हणा! पडला झालं! परीक्षक आंधळ्याचा हात चुकून तुझ्या पेपरवर! बरं झालं! कॉलेज बहिष्काराचा फायदा घेऊन, मी आपली अब्रू बचावली! नाहीं तर मी कसला या जन्मी बी. ए. पास होणार होतो म्हणा! आणि राहीला होता कुठं दमडा खर्चायला! साफ झालो होतो!

**प्रभाकर**—आणि पास झाला असतास, तरी काय नवीन शिंग–शेपूट फूटणार होतं तुला! उदाहरणार्थ हा पहा, मी! मागच्या पुढच्या बेचाळीस पिढीच्या एकादी पुरुषाला पोट भरायला निरुपयोगी, अशा बाराशे विषयाच्या उकीरड्यांत लोळण मारून, हा विद्वान तुम्हांला दर्शनानं पुनित करतो आहे! हा सिद्ध पुरुष अनुभवाचा संदेश सर्व जगांला ओरडून सांगतो आहे कीं, इंग्लडांतील लॉर्डस्, ड्यूकस्, अर्लस्, बॅरोनेटस्, ज्यांना जगाच्या अंतापर्यंत, पोटाची बिलकूल काळजी नाहीं, अशा कुबेरांचे ऐष-आराम, शोक, चैन यांची लज्जत वाढायला उपयोगी पडणारे शिक्षण! आम्हां गरजवंत हिंदुस्थानी माधुकऱ्यांना, माय–बाप, सरकार कृपाळूपणानं, आमच्या नरड्यांत कोंबत आहे! जबरदस्त पान्हा फुटून, आम्हांला सरकार माऊली, लाजिक, फिलासफीचे स्तनानी ज्ञान पाजते आहे! मी अर्जुनाच्या शंखनादानं, ओरडून सांगतो कीं, हे शिक्षण आम्हांला नको आहे! ज्या

लक्षावधी उद्योग धंद्यावर, इंग्लंडांतील हराजो—तळघर सुवर्णाच्या नाण्यांनीं ठेचून भरली जाताहेत! पृथ्वी पुरेनाशी झाल्यामुळें जिथले रंगेल, आपल्या रंगीला विमानांत घेऊन, आकाशांत चांदण्यांत उडताहेत! ते शिक्षण आम्हांला पाहिजे आहे! पण आमचं ऐकणार कोण?

**दिनकर**—प्रभाकरा! या तुझ्या अभंग वाणीचा शिलालेख युनिव्हर सिटी सिंडीकेटच्या दगडी कपाळावर, कोण कारागीर खोदील तो खोदो! सध्यां मात्र अशी शिक्षणाची भयंकर ओढाताण चालू आहे कीं, विचारूं नकोस! समजा! एखाद्या कावाडकष्टी देशभक्तानं आपल्या वयाच्या एक-विसाव्या वर्षापासून, पन्नासाव्या वर्षापर्यंत बिनचूक दर अकरा महिन्याला, घरी पाळणा हलवायची सुरवात केली, तर पन्नासाव्या वर्षी, त्याच्या तीस मुलांच्या पुस्तकांचीं नुसती मोजदाद करायला, गणित शास्त्राची कोणतीही रीत लंगडी पडेल! मला तर वाटतं एका परार्धावर पुस्तक होतील!

**प्रभाकर**—दिनकरा! अगदीं खरं आहे! समजा! ते जोडपं जरी शनवारवाड्यांत राहत असलं, तरी पन्नासाव्या वर्षी, सर्व शनिवारवाडा मुलालेकरांच्या पुस्तकानं गच्च भरून जाऊन, जागेच्या अभागी त्या गृहिणीला, दिल्ली दरवाज्याच्या देवडीवरच, तीन धोंड्यावर चूल मांडायचा प्रसंग आला असतां! कालच पुस्तक आज नाहीं. आजच उद्यां नाहीं. उद्याच परवा नाहीं. मागं होतं ते पुढं नाहीं. पुढचं टाऊक नाहीं! आणि कांहीं कांहीं तर विकतच मिळत नाहींत. अशी डायरेक्टराच्या ऑफिसांत क्रमिक पुस्तकांची गल्लत, घालघुसड सुरू असल्यावर बिचाऱ्या मास्तरांनीं तरी काय बोंबलाव नि विद्यार्थ्यांनीं तरी काय किंचाळावं! ज्ञानसागरांत पोहणारा हा युनिव्हरसिटीचा व्हेल मासा, दर सहा महिन्याला, लक्षावधि शून्यांची अंडी घालतो आहे! आणि प्रत्येक पोराच्या शून्यामध्यें, मला पुस्तकांची परार्धं भरलेली दिसताहेत!

### पद.

बहुरंगी सरस्वती नटली। शून्यात परार्धें भरली ॥ धृ०॥
जो पहावा तोचि शहाणा। भीड मुरवत नाहीं कोणा।
लागला थांग कां ज्ञाना। परि यांना दिसली सीमा। करि
डरांव बेडूक जिभली। शून्यात परार्धें भरली ॥ १ ॥

**दिनकर**—बहार केलीस बुवा! आतां सरकारनं स्वराज्याचा घड आपल्या हाती देताच, तुला डॉयरेक्टर ऑफ पब्लिक डिस्ट्रक्शन नेमण्याचा पहिला ठराव स्वराज्य असेब्लींत मी मांडणार आहे! ठीक आहे, हा विषयच सध्यां बाजूला राहून दे! तूं तर सरस्वतीवर डिक्री मिळवलीसच. बरं मी. खटाला फिर्यादीच्या भानगडीत न जातां, आधींच तिच्यावर बहिष्कार घालून, तिला केव्हांच हांकून दिली! एकूण काय! सरस्वतीच्या साडेसातीतून, दोघेही आपण मोकळे झालो! आतां पुढं कसं काय? तुझं ठीक आहे! तुझा पुण्यश्लोक बाप, तुझ्या नांवानं बँक भरून, तो रीकामाच कैलासवासी झाला! आणखी थोडेबहुत पैसे जास्त लागले, तर तुझा निपुत्रिक काका दामूआण्णा तुला मदत करीलच! पण माझे मात्र तसं नाहीं! आजपर्यंत वडीलांच्या मनिआर्डरनं जड होऊन नम्रतेनं लोंबणारे माझे खिसे, आतांशा माझ्याविरुद्ध बंड करून हे असे माझ्यावर उलटून बाहेर पडले आहेत! हे बंड कसं मोडावं, या फिकीरींत मी सध्यां पडलों आहे!

**प्रभाकर**—हे राष्ट्र तुझ्या मदतीला असतांना, बिलकूल काळजी करूं नकोस! मी आतां त्याच्यावर चांदीच्या कुलपी गोळ्याचा मारा करून शांतता प्रस्थापित करतो! कर मारा, सोन्यारुप्याच्या बॉंब गोळ्याचा, आणि ठोस ठोस हे नोटांचे तोबरे, त्यांच्या तोंडांत आणि घाल पालथे पुन्हां त्यांना! झाले चारीमुंड्या चित! ठीक आहे! ब्रदर कामरेड! आतां जिथं मी, तिथं तूं! जर पुरुषापुरुषांत लग्न लावतां आलं असतं, तर तुझ्याशीं शास्त्रोक्त लग्न लावायला देखील, तुझा हा प्रभाकर बाताडे, एका पायावर तयार आहे! बेट्या दिन्या! तुला म्हणूनच हे स्थळ चालून येत आहे बरं!

**दिनकर**—नकोरे बाबा हे असलं खट्याळ रोमांटिक स्थळ! हा असला नवरा, चोवीस तास रोमान्सचा पतंग उडवायचा!

**प्रभाकर**—बेट्या, दिन्या! आतां कुठं अभ्यासाची काळरात्र संपून, सुखाच्या अरुणोदयाला सुरवात झाली आहे! बस, अत्ता म्हणजे नुसतं नाटके, सिनेमा, टॉकीज! जलसे, तमासे, हॉटेलस्! रेसिस, मॉरेजिस, बिलींग, कूईंग, फ्लर्टींग! ते कांहीं नाहीं! लॉईफमध्यें पोइट्री, व्हरायटी,

रोमान्स असल्याशिवाय, त्याला चार्मच नाहीं ! नुसतं अजागळासारखं, शिळपटासारखं, आयुष्य कंठण्यापेक्षां, तोळाभर आफू खाऊन, पासोडीत पाय ताणून दिलेले काय वाईट ! माझा पुढील आयुष्यक्रम रेखाटण्यांत मला तुझी अतिशय जरूर लागणार आहे ! समजलास, मी काय म्हणालो ते !

**दिनकर**—ऑल राईट ! ह्या दासाचं सर्व बुद्धीसामर्थ्य, चातुर्य, ज्ञान, तुझ्या शेवेला रात्रंदिवस हजर आहे !

**प्रभाकर**—थँक्यू ! पण तुझ्या चातुर्य, बुद्धी ज्ञानाची मला मुळींच मुळींच जरुर नसून, त्या कृपाळू परमेश्वरानं, कृपाळू होऊन जो अलौकिक मुर्खपणा, तुझ्यांत ठासून भरला आहे, त्याच्यावरच माझी जास्त भिस्त आणि जरूर आहे !

**दिनकर**—वेल, कामरेड ! हा माल तुमच्या डोक्याच्या वखारींत काय कमी आहे ! तूं देखील वकीलासारखा सत्यप्रिय, डॉक्टरासारखा मायाळू, सोनारासारखा प्रामाणिक, सुईणीसारखा पापभिरु आणि संस्थानिकासारखा विद्वानपंडीत आहेस. प्रसिद्धीला लागणाऱ्या सर्व साधनांचा पुरवठा तुला देवानं आधीच केलेला आहे ! तूं एकटाच काय, पण तूं मनांत आणलस, तर शेजारीपाजारीं, इष्टमित्र, गणगोत, सगेसोयरे सर्वांचा उद्धार करशील असं सामर्थ्य आहे ! एडीटर, संपादकासारखा मर्मज्ञ, मवाळासारखा मतज्ञ, टिकाकारासारखा रसज्ञ, कवीसारखा सर्वज्ञ, मांजरासारखा कृतज्ञ असून, पठाणासारखा सूज्ञराजनिष्ठ आहेस !

**प्रभाकर**—दिनकर, तपस्व्या ! संस्थानिकांचे बुद्धीऐश्वर्य वाढवणारा, हा तुझा स्तुती यज्ञ पुरे कर ! मी जहागीरदार, रावसाहेब, रावबहादूर किंवा आय्. सी. एस्. कलेक्टर, संस्थानिक नाहीं ! मी पुन्हां गर्जनाकरून सांगतो कीं, मी अधिकारी, किंवा संस्थानिक नसून, मी केवळ मनुष्यो हं ! मनुष्यो हं ! एक गरीब माणूस आहे !

**दिनकर**—नरेंद्रा ! जानामी ! समजलों ! ठीक आहे ! आतां पुढील आयुष्य क्रमाचं बजेट कथन कर ! व्रदर, कामरेड ! आज हा पूर्ण पोषाख करून स्वारीचा कुणीकडं आणि कशाकरतां स्वारीवर निघण्याचा बेत आहे !

**प्रभाकर**—कशाकरतां ! दोस्त ! मॉय डिअर अर्धांग्या ! प्रत्येक मनुष्य

प्राण्याच्या हृदयांतील मनराजा, जेव्हां साडे तीन हात, शरीराच्या हत्तीवर, बांधलेल्या बुद्धीच्या अंबारींत बसून, दिग्विजयाकरतां निघतो, अनंत कल्पनांच्या पलटणी, तर्कवितर्कांचा रिसाला, युक्तीप्रयुक्तीचा, तोफखाना, आशेच्या भराऱ्या मारणाऱ्या विमानाचा तांडा घेऊन त्यांतून प्रयत्नाचा बॉम्ब गोळ्यांचा मारा करूं लागतो! तो कशाकरतां? उत्कंठा, उल्हास, यांच्या डंकानौबती झडवून, आनंदाची, हर्षाची आरोळी ठोकतो! ती कशाकरतां? बोल! कशाकरतां?

**दिनकर**—प्राणेश्वरा! तुमच्याच तोंडाच्या शिपल्यांतून मोत्यांचा शब्द हार बाहेर पडूं द्या!

**प्रभाकर**—सुखदुःखाच्या वाटेकऱ्या, ऐकतर! जगांतील अंतिमरहस्य जे सुख, ते सुख साम्राज्यांत पादाक्रांत करण्याकरतां! सुख! सुख! सुख! प्लेझर! वेड्या, देव तरी कशाकरतां? देवाचं आस्तित्व तरी कशाकरतां! सुखाकरतां!

**दिनकर**—सुखाचं सामाज्य पादाक्रांत करण्याकरतां!

**प्रभाकर**—दॅटस् राईट! शिकंदर, नादीरशहानं स्वाऱ्या कां केल्या! लंगडा असतांना हिंदुकुश ओलांडून, तैमूरलंगानं स्वारीची लंगडी कां घातली? तपस्वी शरीर कष्ट कां करतो? भक्त देवाची आराधना कां करतो? नवरा बायकोचा रुसवा कां काढतो! तरुण विधवा, एकांती कां रडते? नवीन प्रोफेसर पोरावर टवकारून, पोरीच्याकडं किलकिल्या डोळ्यानं, केविलवाणा कां बघतो! चंडोल रात्रीचा दाणेआळी, शुक्रवारांत कां हिंडतो? संस्थानिक इंग्लंडच्या कां वाऱ्या करतो! सर्वांचं एकच उत्तर! सुख साम्राज्य पादाक्रांत करण्याकरतां!

**दिनकर**—प्रभाकरा! काय म्या पामरे बोलावी उत्तरे। परी तुज विश्वंभरे बोलवीले!

**पद.**

**खेळ सुखानें स्फूर्ति सखीच्या, काव्य लतेशी मोदभरे!**
**नव कलीकांच्या; मधु मकरंदा, घेई सुगंधा हर्षभरे॥ ध्रु०॥**
**काव्योद्यानीं प्रसाद प्रतिभा, झुळझुळ वाहवी विमल झरे।**
**काव्यविलासा जो उपभोगी, सार्थ तयाचे आयुखरे॥ १॥**

अतिशयोक्ती करतां येणं, मनोरंजक खोटं बोलणं, अलंकारानं भाषा नटवणं, ही विश्वंभराची देणगी नाही, असं कोण म्हणेल ! ते कांहीं असो कविश्रेष्ठा ! थोडा सारासार विचार करूनच, तुझं काव्य, नव्हे थापेबाजी चालवीत जा ! नाहींतर तुझ्या सानिध्यानं आणि काव्यामृतानं मला नेमका कुठं तरी बळी द्यायचास ! म्हणून प्रार्थना इतकीच कीं, काव्य जरा जपूनच करत जा !

**प्रभाकर**—ऑलराईट ! आय प्रॉमिज् ! पण कायरे दिनकर ! अलीकडं तूं म्हणे कुठंस काव्य करायला सुरवात केली आहेस !

**दिनकर**—नुसती हातांत पेन्सिल आणि समोर कोरा कागद घेऊन बसलो आहे !

**प्रभाकर**—पण वृत्त कोणचं घेणार आहेस ?

**दिनकर**—आर्यावृत्त !

**प्रभाकर**—अस्स ! मग तूं देखील सुंदर दोन चरणाच्या आर्यावृत्तावरच काव्य करण्याच्या विचारांत आहेस तर ! हार्टी कांग्र्याच्युलेशन्स् ! ठीक आहे ! चल तर ! माझ्या बरोबर स्वारीला ! तुझे बंडखोर खिसे तुला शरण आल्यामुळं, तुझ्याकडं शांतता झालीच आहे ! ( दिनकर पैसे परत देतो. ) आतां मला शत्रू आढळतांच त्याच्यावर चढाई करून, त्याला मांडलीक करून टाकण्याकरतां, मनोभावानं मदत कर ! चल तर !

**दिनकर**—हा दास सेवेला तत्पर आहे ! शत्रू तुझ्यासारखा रोमांटिक असला तर मात्र मग मजा येईल !

**प्रभाकर**—मग काय विचारतोस ! चंद्र, सूर्य, तारका, सप्तर्षी, अरुंधती, रोहिणी वगैरे झाडून साऱ्या काव्य धूमकेतूच्या खराट्यानं झाडून टाकून तावडतोब प्रथम दृष्टी पातातच, शत्रूचं आकाशपाताळ एक करून टाकतो ! ( जातात. )

## प्रवेश तिसरा.

सीन—रस्ता ( शंभ्या व श्रीखंड्या येतात. )

शंभ्या—जीव गेला तरी बी हरकत नहीं, पण ह्यो शंभ्या भांडी घासनं सोडूनशान, बामन व्हनार !

श्रीखंड्या—मेलों तरी बेहेत्तर, पण हा श्रीखंडे, पळा झारा सोडून, या उप्पर साहेब होणार !

शंभ्या—हें बामणच कोन लेकाचे बिरामदेवाच्या तोंडातून निघनार ! ह्यो पळ्या पळी पंचपात्री घेऊनशान बिराम देवाच्या तोंडांत उडी टाकनार! मंग काय बी हो !

श्रीखंड्या—हे साहेब लोकच कोण, शिष्ट, आम्हांला काळा आदमी काळा आदमी म्हणून झिडकारणार ! मीही थोबाड रंगवून लालसाहेब होणार !

शंभ्या—बामन कोन लेकाचे एकटे भसाम लावून शाव बनातीची टोपी घालनार !

श्रीखंड्या—तेच कोण लेकाचे मिशा काढून, घमेल्यांत डोकें अडकवणार ?

शंभ्या—तेच कोण, जेवाच्या आधीं पत्रोळीं भोवतीं पानी फिरवून आन वाइच भाताची शित घालून आपचन घेनार ? मी बी पानी फीरवून तीन मुट्ठा भात जमीनीवर टाकूनशान आपचन करनार !

श्रीखंड्या—त्यानाच तेवढा भेजा, कलीजा, कोंबडी मटकावयाचा काय हक्क आहे ? मीही कबाब, बिरयानी, हडकं चघळणार !

शंभ्या—तेंच कोन शास्त्रोक्त मुंज, लगान लावनार. मी बी माझ्या गिरजेशी पुन्हां यदोक्त गिर्भदान करनार !

श्रीखंड्या—तें कांहीं नाहीं. मी ही युरोपियन पद्धतीनें पुन्हां माझ्या अनपुर्णेचा परगावीं हॅनीमून करणार !

शंभ्या—बामनाच्या आवावानी, मी बी माझ्या गिरजेला काष्टा आवळूनशान घालाया लावनार. आन पुनेरी जोडाबी देनार !

श्रीखंड्या—हो असेंच ! माझ्या अनपूर्णेला देखील मुक्त कच्छ करून, लुगडें लेडीच्या लॅंग्या सारखे पोकळ, मोकळे चाकळे, तिला करायला सांगणार ! आणि बुट चढविणार !

शंभ्या—इशोदेव आपचन, आरग्या, संदया संमद बामनावानी पान्यानच करणार ! त्येंचाच काय पिढी जाद हक्क आहे !

श्रीखंड्या—मीही प्रातविधी, साहेबांचे सर्व प्रकारचें विधी कागदानेंच करणार ! त्यांचाच काय त्यावर वारसा आहे !

शंभ्या—आजच्या आज, नदींकांठून योक पेंडी दराभ उपटून पोतभर भसमाचा राखोडा घरीं आननार !

श्रीखंड्या—हाडकं, नळीं, मुंडी फोडण्याकरतां आणि चहाकरतां, कांटे, चमचे, सुऱ्या आणि कपबशांची खापरे आणलीच पाहिजेत !

शंभ्या—आतां मुंज करून, मुद्रा ठोकून, जावन्याच चराट गळ्यांत घालणार, आन त्याला योक हिरनाच चामडबी बांधनार !

श्रीखंड्या—आतां जानवं तोडून, शेंडीं उपटून, लंगोटीचा नेकटॉय सारखा गळफांस घेणार !

शंभ्या—मुडदा पडला तरी बामन व्हनार ! निदान माझा मुडदा बामनावानी व्हता, असं संमद्यांच्या कडून म्हनून घेनार !

श्रीखंड्या—प्राण गेला तरी बेहेत्तर, निदान हा श्रीखंडे आंचारी, साहेबाचें भुत होता, असें त्रिभुवनांत गर्जिवणार !

शंभ्या—आधींच माझ्या गिरजेला बामनींनी वानी सवळी करून मंग मी मला नदीकांठीं पेटून घेनार !

श्रीखंड्या—प्रथम माझ्या आनूच दुसऱ्याशीं रजिष्टर लग्न करून, मग मी स्वतःला पुरुन घेऊन उरावर क्रॉस लाकडाचा फुलवर धरणार ! हिंदुस्थानांत, डच, फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्लीशांनीं पाय ठेवतांच त्यांचें अनुकरण न करणारे, त्यांच्या चालीरीती, धर्म न उचलणारे आमचे पूर्वींचें सर्व विद्वान वंशज म्हणजे नुसते टोणगे, बोकड असलें पाहिजेत !

शंभ्या—आज इकती हजारो वर्षे बामनाच्या संगतीस रातदीन असून

आमचे बापजादे, दाढी मिशा, जटा वाढवून लंगोटी नेसलें नहींत, तवा ते समदे गाढव आन डुकार व्हते! गाढवाचे लेक समदे शिपाई बान्यान लढाया मारून किरीट-कुंडल घालून राजे झाले! योक तरी बी राखात लोळून, नाक धरून, समाधीं लावून मसनांत गेला असल तर मला पुसा! तें कांहीं नाहीं! ठरला बेत! नहीं मला आतां, क्षत्रीयासारखं आन मराठ्यासारखं खिनभर राहवत!

**श्रीखंडया**—नाहीं मला आतां हें ब्रह्मतेज सहन होत! ताबडतोब साहेब व्हायला प्रारंभच करतो!

**शंभ्या**—ही बघा सुरुवातच! इपर म्हंजी बामन भट्ट संध्या करतो त्यो. इज्ञोपवित मंजी जानवं दोरी, भट्ट, सुतार, गवंडी गळ्यांमंधी घालतो त्ये! इभूत म्हंजी भसाम राख, बामन आंगूळ केल्यावर माखतो, ती. आपचन कर म्हंजी तीन वक्ता पानी पी!

**श्रीखंडया**—युरोपियन म्हणजे साहेब! विजार, कोट, टोपलं, डोकीवर घालतो तो. गुड मॉर्निंग म्हणजे नमस्कार! साहेब हातानं हिसडा देऊन करतो तो. बटर म्हणजे लोणी, साहेब अच्छेर खातो तें किंवा आम्ही त्यांना लावतो तें.

**शंभ्या**—उदाक म्हंजी पानी. वस्तार म्हंजी धोतार. इघ्रंत म्हंजी तूंप. पत्रोळ म्हंजी इस्तारी. कुत्र म्हंजी शवान. लघुशंका म्हंजी इराकत म्हनावं!

**श्रीखंडया**—डॉग–कुत्रा. कॅट–मांजर. गोट–बोकड. बुल–बैल. मंकी–माकड लघुशंकेला–मेक वॉटर म्हणावे! किंवा फसफसणाऱ्या पाण्यास सोडा वॉटर म्हणावें.

**शंभ्या**—ह्यो बघा! श्रीखंड भट्ट!

**श्रीखंडया**—तोंड संभाळ, मला ब्राम्हण म्हणालास तर! तुला मला साहेब म्हणायला अगदीं जीभ वांकडीच पडत असली, तर गाढवाच्या लेका, निदान पाद्री तरी म्हण! चट्टेगार तरी म्हण! काय समजलास ना! शंभूराव मराठे, तुम्ही क्षात्रिय आहांत म्हटलं, लक्षांत ठेवा!

**शंभ्या**—तोंड संभाळ! मारीन कमरेंत लाथ. कुनालारे लेका क्षात्रिय, मराठ म्हून शा देतोस! योक वेळ भंगी म्हटलं तरी चालल! ह्यो पळ्या

आतां शंभू गडी राहिला नसून, शंभेश्वर भट्ट झाला हाय! कां! समजलास कां भट्ट्या, नव्हे श्रीखंड साहेब्या!

श्रीखंडया—हा गाढवाच्या लेका, असें जुळतें घेतल्यावर भांडण कुठें राहिलें. काय शंभेश्वर भटजी खरं ना!

शंभ्या—काय! काय म्हणालास! शंभेश्वर भटजी! श्रीखंडसाहेबा मार मिठी मला! या वक्ती तूं माझा बाप हैस. आन् शंभू भटजी तुझं लेकरुं हाय! अरे असं देवावानी जुळत मिळत घ्यायचं गुण तुझ्या अंगांत ह्यायती ते मला काय ठावं?

श्रीखंडया—हा रांड लेका! आपलं तेवढं वाईट, आणि दुसऱ्याचें सगळें चांगलें असें समजण्याचा माझ्यासारखा उपजत गूण तुझ्यांतही आहे. हें मला कसें कळणार! ठीक आहे. बिशाद काय त्या साहेबांची! भर उन्हाळ्यांत जरी उकड आंब्यासारखा आंत शिजलो तरी तसा घामानं निथळत, कोट, जॉकीट, बूट, विजार, पायमोजे, हातमोजे, गळ्याला मफलर आणि डोकीवर घमेलें घालून, माझ्या अनपूर्णेला बरोबर घेऊन हॉटेलांत, चहा कडकडीत आम्लेट खाणार! अनपूर्णेला बरोबर पाहून, लोकांनीं म्हटलें पाहिजे, कीं ही कोण ब्राह्मणाची बाई साहेबांनीं बगलेंत मारली!

शंभ्या—आन मी बी, टीळा, टोपी, मुद्रा, भसाम, डोकीवर समिधाची मोळी, खाकांत दर्भाची पेंडी घेऊन माझ्या गिरजेसंग घराबाहीर पडलों कीं संमद्यांनीं म्हटलं पाहिजे कीं कोन मराठ्याची फटाकडी बामनाचा हात धरून निघाली, तवाच मला बामन म्हना. ठीक आहे, जातो घरांत माझं लई काम पडलया!

श्रीखंडया—मला तरी कुठं फुरसत आहे! भाजी वगैरे चिरायची व कणिक तिंबायची तशीच पडली आहे.

शंभ्या—ठीक आहे! राम राम! नव्ह, नमस्कार श्रीखंड साहेब!

श्रीखंडया—येतो तर! नमस्कार! नव्हे, गुड-मार्निंग शंभेश्वर भटजी!

शंभ्या—आर्ग्यां दे–पानी सांड. परसाद–सांजा गुळ. परानयाम कर–नाक धर. परदाक्षीन कर–गरगरा फीर, किंवा घिरट्या घाल.

श्रीखंड्या--मॅन्-मनुष्य! डॉंकी-गाढव! हॉग-डुक्कर! ब्रॅंडी-म्हणजे रंडी, अंडी, थंडीच्या सानिध्यांत उत्साह देणारे औषध म्हणावें.

[ जातात.

## प्रवेश ४ था.

( सीन—प्रेमाचें घर-प्रेमा व सुधा. )

प्रेमा—हं दमले बाई. हें केसाचे फुगे फुगीवता फुगीवता! सुधे, तूं तरीही जरा इकडे पीन बशीव! ही मेली सकाळची वेणी फणी टायलेट, आणि साफसफई म्हणजे तब्बल तासाच काम असतं! हं हें पहा ह्या पंचानं किती दाबलं आहे! पण मनासारखा केसाला कुरळ, किंवा मुरड पडत नाहीं! ही कपाळावरची सौंदर्यलड ब्युटी लॉक अजुनी मनासारखी बसत नाहीं.

सुधा—कोण मेली यातायात, या तुझ्या ड्रेस करण्याची! केसाचे फुगे नि कपाळावरील, कूंकवाची टिकली, किंवा लावण्य लांछनाचीहि झिजी, बरोबर आकर्षक रितीन बसली आहे किंवा नाहीं याची पारख किंवा निकाल, तुझ्यामाझ्यांत कसा लागायचा! याला कुणी तरी त्यांतला दर्दीच सांगायला हवा!

प्रेमा—सुधे, तुला पुन्हां सांगतें, पोइट्री, नाव्हेल्टी, व्हरायटी! विपुलता, विविधता आणि रसिकता! सौंदर्य, माधूर्य, प्रेम. यांच्या सामुग्रीनं जर मनुष्य घडला गेला नाहीं! आनंद, उत्साह, हास्य या चैतन्यामुळं जर त्यांच काळीज स्फुरण पावलं नाहीं तर त्या बिचाऱ्या माणसाच्या काळजाची धडपड म्हणजे कसायान मानेवर सुरी ठेवलेल्या बकरीच्या तडफडी सारखच आहे.

### पद.

**काव्य शोभा मानवाना। पंख जैसे मधुकरांना ॥ धृ० ॥**
**श्लेष कोट्या, उक्ति, उपमा। रम्यता दे कल्पनाना ॥ १ ॥**
**भाग्य लाभे भाग्यवंता। ते न मिळतें अरसिकांना ॥ २ ॥**

सुधा—पमे, आपल्याला देखील हा तुझा रोमांटिक शेतकऱ्याचा धंदा फार आवडतो.

प्रेमा—काय ! मी रोमांटिक शेतकरी ! आणि ती कशी बाई!

सुधा—वाचनाचा, सुक्ष्म निरीक्षणाचा, ज्ञानाचा चांगला नांगर फिरवून, शंका कुशंकाची हरळी कुंदा निघाल्यामुळं, तुझ्या मेंदुच सुपीक शेत कसं सुंदर झालं आहे. आतां अनुभवाच चांगलं पोसलेल बी, बियाण त्यांत पेरलं आणि जर कां वेळोवेळीं स्फुर्तीचा पर्जन्य पडला, तर आलेल्या कणसाच्या दाण्यावर तूं एकटीच काय पण तुझ्या सात पिढ्या जिवंत राहतील !

प्रेमा—आहे बुवा आहे बुवा ! तुमच्यांत देखील करामत ! चांगलं झांकल माणिक आहेस एकंदरींत ! हीच हीच, जी प्रत्येकाच्या हृदयांत उपजत बुद्धीची ठिणगी असते. तिला चांगला वारा घालून, इंधन पुरवून तिचा चंद्रज्योतीसारखा प्रकाश पडावा, म्हणूनच शाळांची, आणि कॉलेजांची योजना झाली ! पण सध्याचा शिक्षण कोर्स म्हणजे नुसता फार्स मांडला आहे ! युनिव्हरसिटीन किंवा डायरेक्टरानं तिकडं देवाज्ञा केली कीं, इकडे प्रोफेसर्स, ऊर बडवून लेक्चर् देऊं लागतात आणि त्याच ठेक्यांत समोरची मुलं, हुंदके देऊन, डोळे पुसून, पेंगू लागतात ! नुसती गुजराथ्याची स्मशानयात्रा झाली आहे ! खरं म्हणशील तर शिक्षणाच्या कोर्समुळं, जितका बायकोपणा मुलींना जास्त येइल ! तसास जितका पुरुषीपणा पोरांना जास्त येईल, तितका यायला पाहिजे आहे ! पण सध्यांच्या या कोर्समुळें सगळं गाड उलटसुलट झालं आहे ! स्टुडंन्स बिचारे, आमच्यासारखे नटून-थटून, लाजून-मुरडून, माना वेळूं लागले आहेत ! क्षुल्लक गोष्टीवर भांडणाची ताण करून, जरा कोणी उणं उत्तर देतांच पोरीच्यासारखंच दृच्दिशा डोळ्यांना पाणी आणून रुमालानं नाक पुसूं लागलें आहेत ! आतां कुणी कुणाला नवरा म्हणायच, हाच वादाचा प्रश्न उद्भवणार आहे!

सुधा—होय कां ? झालं तर मग ! निळंकठरावाच्या मागणीला तूं न्हाटाण्याच्या अक्षदा दिल्यास हें विचारायला नको.

प्रेमा—त्या निडला वाटलं, तो मोठा स्कॉलर, तेव्हां माझ्यावर इम्प्रे-

ज्ञन पडेल म्हणून. पण दिसेल ते खानदेशी, नगरी तट्टु खरारा मारून त्यालाच ठाकठीक करून, टांग्याला जोडून, प्रवासाला निघण्याची मला कुठं एवढी गर्दी झाली आहे! त्या स्कॉलरच्या डोळ्यांसमोर नुसतं उत्पन्न करणं आणि मरणं, एवढे दोनच ढोबळ नियम त्याला दिसतात. पण या जन्ममरणाच्या दोन खांबावर, देवानं केवढी द्वारका वसविली आहे, केवढा मनुष्याच्या आयुष्याचा राजवाडा शृंगारला आहे, काय कलाकुसरी केली आहे! वेलबुट्टी केली आहे! कल्पनांची, प्रसंगाची हर्षाची, काय मनोहर झुंबरं लावली आहेत! इंद्रधनुष्याचे रंग एकमेकांत मिसळून, त्यांत रोमान्सचं पाणी घालून किती मजेदार, आंत पेंटींग् केलं आहे. याची त्याला काय कल्पना! या शृंगारलेल्या राजवाड्यांत, चार दिवस राहून जायचा, देवालासुद्धां मोह आवरला नाहीं! पण हा स्कॉलर पहावा, तो राजवाडा सोडून नुसत्या दोन खांबांतच घुटमळतो आहे!

सुधा—प[illegible] आहेस खरी कवि.

पद

**ऋतु वसंत जगी नटवी उपवना। पक्षी गणानां हांसवि सुमना ॥ धृ० ॥ रवि कवि तपदा काव्योद्यानी । लोभवी मार्मिक प्रेमी जनानां ॥ १ ॥**

असं कां! ( गिरीजा येते ) हो बरी आठवण झाली! कायग गिरीजे, आज आम्हांला एक गंमत दाखविणार होतीस ना! नुकतंच कोंकणांतून आलेलं पार्सल इथं घेऊन येणार होतीस ना! काय झालं मग त्याचं!

गिरीजा—त्ये पार्सल, अक्षी माझ्याबरोबरच घेऊन येनार व्हते, अक्षी माझ्यासंग निगालीबी व्हती! पन आनुबाईनं वाइच हाटकल्यामुळं, लुगडं बदलून येनी फनी करून शान माझ्या मांगच येतीया म्हून म्हनाली!

सुधा—ठीक आहे! पाहिजे तर पुन्हां हेलपाटा मार! पण ती अमोलिक चीज आमच्या पमीला दाखवलीच पाहिजे. तसंच जातांना शंभ्याला सांग, आमच्या सायकली चांगल्या साफ करून वारा भरून ठेव म्हणावं.

( गिरीजा जाते ).

प्रेमा—काय ग सुधे, कसलं कोकणांतल पार्सल ! कसली अमोलिक चीज ! मला तर कळुं दे काय आहे ते !

सुधा—तें आमचं आपलं एक लहानस रोमान्स आहे ! पुरुषाच्या आप्पलपोटेपणाचं, स्वार्थीपणाच तुला एक गमतीच रोमान्स दाखविणार आहे ! इतक्या पराकियांच्या लाथा खाताहेत ! पारतंत्र्यांत पचताहेत, तरी दुसऱ्यांना पारतंत्र्यांत ठेवण्याची, या आप्पलपोटे पुरुषांची संवय जात आहे कां पहा ! मी जर सत्ताधीश असते, तर त्या आपल्या जवळच्या बंगल्यांत नवीन बिऱ्हाडाला आलेल्या त्या विनायकरावाला तिकाटण्यावर बांधून चांगलें कोरडे उडवलें असतें ! सुधारणेचा सूर्य माध्यान्हीवर आला तरी हा मेला, सुधारणेचा ज्ञानाचा सूर्यप्रकाश तिला दिसूं नये, म्हणून बंदोबस्तान आज दहा वर्षं तिला कोंकणांतल्या खेडेगांवांत बंदिवासांत ठेवतो आहे ! नुकतंच आठ दिवसापूर्वीं ते पार्सल कोंकणांतून त्यानं इथं आणलं ! ते विधात्याचं सुंदर स्वयंभू काम प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघावं म्हणून युक्तीन, गिरीजे मार्फत तिला, इथं आणून, तुला दाखविणार आहे ! समजलीस आतां सगळं ! ( गिरीजा येते ) कायग ! आली कां ती !

गिरजा—व्हय, या बघा सरलाबाई येऊन राहल्या ! सुधाताई, शंभ्या म्हनतोया ! तुमच्या सायकलच्या चाकांत पंकचर झालया म्हून !

सुधा—बरं जा, तूं चहा घेऊन ये आणि आमच्या गप्पागोष्टी होई-पर्यंत शंभ्याला सांग पंकचर नीट करून ठेव म्हणावं ! तूं मात्र त्याच्या मदतीला उभी राहूं नकोस ! तूं आपल्या कामाला जा आधीं. नाहीं तर उद्यांपर्यंत त्याच्याच्यानं सायकली नीट व्हायच्या नाहींत ! ( गिरीजा जाते ) पमे, बघितलसनां कसा सुंदर राजवाडा आहे हा ! या, सरलाबाई ! या, बसा ! ( सरला येते ).

सरला—( दोघींना नमस्कार करते ) काय, कायतरी बाई गमतीचं नी नवलाच सामान तरी हें ! किती सुरेख दिसत आहे हें !

प्रेमा—बसा सरलाबाई ! कमलॉग् टेक युवर सीट !

सरला—काय म्हटलं ! मला नाहीं बाई, तुम्ही काय म्हणालांत तें कळलं !

**सुधा**—प्रेमाबाई, खुर्चीवर बसा म्हणून म्हणताहेत !

**सरला**—होय कां ! मी खालींच बसत्यें बाई ! मी नाहीं गडे असल्या घडवंच्यावर कधीं बसले हो ! पडाबिडायची नाहीं तर !

**प्रेमा**—छे, हो, आम्ही नाहीं का बसलों ! बसा !

**सरला**—बरं बाई, बसतें हवी तर. ( ती बायकांच्यासारखे मांडी घालून बसते, तें पाहून प्रेमा, सुधा, हांसतात.) हांसतां कां गडे माझ्याकडे पाहून, कांहीं चुकलं आहे कां माझ्याकडून ! सांगा मला ! म्हणजे करीन बापडी तसं हो !

**सुधा**—हें पाहिलंत कां, आम्ही कशा बसलों आहोंत तें !

**सरला**—पाय असें खाली सोडून, लोंबते ठेवूं कां ? बरं तर ! ( तशी बसते ).

**प्रेमा**—अरेरे ! बिचारी लिव्हींग इनोसन्स् !

**सरला**—तुम्ही कोणत्या भाषेंत बोलतां नि काय म्हणतां तें मला नाहीं बाई समजलं !

**सुधा**—त्या कीं नाहीं, तुम्ही अगदीं साध्या भोळ्या, मनमिळावू आहांत, असं म्हणताहेत ! तुम्हांला उशीर झाला थोडा इकडं यायला !

**सरला**—झाला खराच बाई, सकाळीं उठून, वेणीफणी, अंगधुणं, तुळशीला पाणी, रांगोळीचं स्वस्तीक काढून, दुध पिऊन मग इकडे आलें ! अजून देखील बरीच कामं घरांतलीं पडली आहेत ! स्वयपाकाचं सामान काढून द्यायचं आहे ! तुम्ही नाहीं कांहीं माझ्या सारखी घरांतलीं काम करीत !

**प्रेमा**—हो ! हो ! आम्ही देखील करतो तर !

**सरला**—तुमच्या इथं किती किती सुंदर सामान आहे हो ! आमच्या इथं म्हणजे नुसते लोड, तक्या, गाद्या, गिरद्याच ! पण तुमच्या इथं, कुठं गुलाबदाणी, अत्तरदाणी, पानाचा डबा दिसत नाही हो !

**सुधा**—सरलाबाई ! हा सरंजाम आमच्यासारख्याच्या इथं नसतो हो ! ती ठिकाणं दुसरी असतात !

**सरला**—काय बाई नवल बघा ! कोकणांतून इथं आल्याबरोबर मला

सगळं जग कसं अगदीं निराळ वाटूं लागलं आहे ! काय तरी बाई या जगांत गमती आणि प्रकार आहेत ! ( गिरीजा चहा भिस्कीट घेऊन येते. )

सुधा—घ्या सरलाबाई ! चहा आणि ही भिस्कीटं आवडतील तुम्हांला ! तुम्ही घेत होतानां कोंकणांत चहा !

सरला--हो ! एखाद्या वेळेस घेत होते ! पण बाई, फुलपात्रांत आणि ताम्हनांतन घेत होते ! पणबाई ही गमतीचीच फुलपात्र नि ताम्हनं तुमची ! आणि बाई, संध्येची पळी तरी कायहो विचित्रच आहे हो इथली ! आणि हें काय हें ! शंकरपाळे कां पांढरे, अगदीं पांढरे गोल गोल नि खुसखुसित केलें आहेत हो ! आमच्या कोंकणांत कसे चौकोनी नी तांबडे असतात हो. पण गडे, कुणब्रिणीचा चहा शंकरपाळे खरकटें, तें कसें खायचे !

प्रेमा—छे, छे, त्याला कांहीं हरकत नाहीं ! तें निर्लेपाचेच आहेत !

सरला--होय कां ! माझा तुझ्यावर विश्वास आहे हो !

प्रेमा--नुसती ट्रॅजडी आहे, हिच्यापुढं कसलं लव्हर नी रोमान्स करायचा त्या विनायकरावाला चांगला सडकला पाहिजे !

सरला--तुमची बंडी काय तरी विचित्रच आणि तोंड पहायला लहान लहान आरसे, कानांला बांधून, नाकावर कां टांगावे लागतात ?

प्रेमा--हे आरसे नाहींत ! दृष्टीदोषा करतां आणि कांहीं वेळ सौंदर्याच्या खुलावटीकरतां हा दागिना वापरतात ! सुधे, तूं आज खरोखरीच जिवंत रोमान्स मला दाखवलास.

सरला—( चहा घेऊन झाल्यावर ) पाणी कुठं आहे ? मी आणते विसळून हीं भांडी हो !

सुधा--राहूं दे, गिरिजा विसळील, असूं दे !

प्रेमा--अरेरे, पुअर इनोसेन्ट गर्ल ! सिंपली रुईन्ड ! सत्यानाश केला राक्षसानं !

सरला--मी मघांपासून ऐकते आहे, तुम्ही मराठी बोलतां बोलतां मधून कांहीं बाईच हेंगाड फेंगाड बोलतां हो ! तुमच्या मनांतल सरळ मराठींत नाहीं कांहो बोलतां येत ? मला आज तुमच्या घरांत कसं बघेन ते पाहीन ते सगळं नवनवच दिसत आहे गडे ! किती तरी तुमच्या जवळ

पोथ्या, पुस्तकं नी चित्र आहेत ही ! ही सगळीं गणित, भुगोल, स्तोत्र, रत्नाकर, सावित्रिगीत, हनुमानकवच, रामरक्षा, हीचना सगळीं पुस्तकं पोथ्या ! ( टेबलाजवळ जाऊन ) अगबाई, काय तरी हें पुस्तकाचं नांव तरी ! अनंगविलास, पहिलं चुंबन, आषूकमाषूक ही हो कोणची अभ्यासाचीं पुस्तकें तुमची !

**प्रेमा**--आतां काय सांगायचं हिला कपाळ !

**सुधा**—या इकडं बसा अशा, तीं किंनही गहन शास्त्रीय विषय आहेत !

**प्रेमा**--तो किंनाही एक प्रकारचा अनंगविलास आहे !

**सरला**—हेंच कां शास्त्र या पुस्तकांत उलगडून सांगितलं आहे !

**सुधा**--सरलाबाई, तुम्हांला एखादा पंडित भेटला म्हणजे पडेल उलगडा या गहनशास्त्राचा !

**सरला**—इश्यः तुम्ही शाळेंमधे हींच कांहो अभ्यासाची पुस्तकं शिकलांत ! नी हें कां शास्त्र गुरुजी शिकवित होते तुम्हांला ! मला की नाहीं असलं एक पुस्तक देखील, अप्पासाहेबानीं कधीं दाखवलं नाहीं ! अगबाई, हें काय नविनच, रबरी चेंडू नि बुंदीच्या झाऱ्या सारखं हें काय हो ! मला पाहिजे तर वेडी म्हणा ! पण सांगा गडे समजावून !

**प्रेमा**--हा कीं नाहीं, इलेक्ट्रीक टार्च, विजेचा दिवा आहे आणि तसंच हें टेनिस बॉल, बॅट, हा एक इंग्रजी खेळ आहे ! अगदींच खेडवळ आहांत !

**सरला**—मी कुणाला कांहीं विचारलं म्हणजे कांहीं तरी सांगून मला गप्प बसवतात ! माझ्या मनाला पटेंल असं कोणीच सांगत नाहीं ! मला नाहीं बाई तुमचें हें इंग्रजी खेळ ठाऊक ! आम्ही कीं नाहीं ! कोंकणांत, फुगडी, झीम्मा, छंपापाणी, कोंबडा, घसरफुगडी, हेंच खेळ खेळून कसं अगदीं दमून जात होते ! तुम्हांला होत कांहो थकल्यासारखं तुमचें इंग्रजी खेळ खेळून ! पण तुम्हांला आमचे खेळ व मला तुमचे खेळ, येत नाहींत ! म्हणजे मी कोंकणी व तुम्ही इंग्रजी खेडवळ असंच ना !

**सुधा**—बरी बसली श्रीमुखांत !

**सरला**—शहर गांवांतून भारीच नवीन गमती असतात हो !

### पद

**वाटे मौज या मनाला । चोहींकडे पाहतां ॥ गमती जगी-च्या सांगाया मजला ॥ शब्द सुचति ना ॥ ध्रु० ॥ बघतां हें विलास सुखकर नाना । तृप्त होईना । तृप्त होईना ॥ १ ॥**

प्रेमा—हें स्वयंभू पात्र म्हणजे नुसती ट्रॅजेडी आहे !

सुधा—मुळींच नाहीं, कपट, लबाडी, खोटेपणाची ट्रॅजेडी असून, मला तर खरेपणाची कॉमेडीच वाटते ! जिला आज दहा वर्षं जवळजवळ अंधारकोठडीची शिक्षा भोगावी लागली, तिला जर सध्याचे, शोध सुधारणा, याचा गंध नसला, तर या बापडीचा काय दोष !

प्रेमा—सगळ्या आयुष्याचा नाश करून टाकला त्या कोल्ह्यान ! कसं जीण जगायचं अशा बायकोनं !

सरला—पण कायहो, मी विचारतें, तुमचा इंग्रजी खेळ, तुमच्या इंग्रजी विजेच्या दिव्याच ज्ञान जर मला समजलं नाहीं, तर आमचं आयुष्य फुकटचं गेलं कांहो ! आम्ही म्हणजे वायांच गेलों कांहो !

सुधा—छे हो, असं कुठं झालं आहे ! आज आमच्या पमीला बरा परस्पर रोमान्सचा डोस मिळाला !

प्रेमा—चल, डोस आला आहे !

सरला—रागावलांत हो माझ्यावर ! रागावूं नका बाई, माझं कांहीं चुकलं तर सांगत जा समजावून, जाते गडे मी आतां घरीं ! अजून देवाची पूजा व्हायची आहे ! आप्पासाहेब रागावतील उशीर झाला तर ! सुधाताई, हळदीकुंकवाचा करंडा कुठं आहे !

सुधा—तो पहा तिथं आहे. (एकमेकींना कुंकू लावतात.)

प्रेमा—हं हं, अहो केवढं कुंकूं लावलंत हे !

सुधा—मला तर मळवटच भरलान !

सरला—असूं दे जरा मोठं कुंकू, अगदीं मसूरीच्या डाळीसारखं, दिसेल न दिसेल लावलं तर कसं बाई समजणार ? कीं तुम्ही कुंवार कीं सवाष्ण आहांत म्हणून !

**सुधा**—आज आमची पमीसारखा काडेचिराइताचा काढा पिते आहे. ( गिरजा येते ).

**गिरजा**—शंभ्या म्हनतूया, सायकली नीट करूनशान, पंप करूनशान तयार झाल्याती.

**सुधा**—येत जाहो कधीं कधीं अशाच.

**सरला**—कायग गिरजे, बायशिकली काय म्हणालीस तूं, काय म्हणाली प्रेमाताई !

**प्रेमा**—इंग्रजींत बायसिकल, सायकल म्हणतात हो त्याला !

**सरला**—इंग्रजींत नको, मराठींतच सांगा.

**प्रेमा**—सुधे, फोड कपाळ आतां मराठींत तिच्यापुढं !

**सुधा**—सरलाबाई, मराठींत पायगाडी, संस्कृतमध्यें द्वीचक्रयंत्र म्हणतात. समजलंना आतां !

**सरला**—काय म्हणालांत देव जाणे ? मला तर कांहीं समजलं नाहीं. येते हो मी.

**प्रेमा**—गिरजे, पोंचीव जा यांना घरापर्यंत ! या हो. ( सरला जाते.) सुधे दाखवलीस खरी प्रेक्षणीय वस्तू आज ! ठीक, चल तर ! आज जिमखान्यांत जायला चांगलाच उशीर होणार. ( जातात ).

---

## प्रवेश ५ वा.

सीन-( पात्रें—विनायक, श्रीखंड्या उघडा बंब नुसती विजार घातलेला.)

**विनायक**—श्रीखंड्या; गाढवाच्या लेका !

**श्रीखंड्या**—तुमच्या पायां पडतो, पण मला साहेबाच्या लेका म्हणा ! मला साहेबाच्या कुत्र्या म्हणा पाहिजे तर !

**विनायक**—वाटेल तितके नोकर, कारकून मास्तर, मिळतात, पण ह्या स्वैपाकाच्या दुर्मिळतेमुळें मी यांच्या मूर्खपणाकडं थोडा कानाडोळा केला ! तुला बजावून सांगतो, माझ्या घरांत, ही असली साहेबी थेरं, मला मु ळींच खपायची नाहींत ! हें कसलं पोतं अडकवलं आहेस !

**श्रीखंडया**––याला इंग्रजींत पाटलूण म्हणतात! मी आपला सर्व साहेबी पोषाख. घमेलं, गळफांस, कांटे, कपबशा, बूट, स्लिपर्स...

**विनायक**––या क्षणींच उकीरडयावर नेऊन टाक जा. जर माझ्या घरांत हें असलं अपशकुनी सोंग आणलंस तर चाबकानं पाठ फोडीन, सांगून ठेवतो.

**श्रीखंडया**––आप्पासाहेब. यापेक्षां देखील सैल पाटलून, बूट, घमेलं घालून प्रातःकाळीं आपल्या घरांवरून, शेंकडों मोठमोठे अधिकारी, पेन्शनर हवा खाण्यास जातात, एवढे मोठमोठे सरकारी अधिकारी, अपशकुनी कसे! सगळेंच गाढवाचें लेक कसें होतील! माझ्या आवडीमुळं, आपल्या घरकामांत व्यत्यय आला तर कान धरा! हें गरीबाचें, साहेबाचें लेंकरूं समजून घ्या निभावून कसेंही करून! अरे हिरमोड करणाऱ्या दुष्ट परमेश्वरा, मला इंग्लंडांतल्या एखाद्या भंग्याच्या पोटीं कां नाहीं घातलंस! निदान चोविस तास बूट पाटलूणींत गुरुफटून मऊ मऊ मासे खाऊन मारे मरे मरे तो काम केलें असतें. या हिंदुस्थानांत आणि त्यांतून या ब्राह्मणकुळींत मला ढकलून माझा सर्वस्वी गळा दाबलास! आप्पासाहेब, तुम्ही तरी निष्ठूर होऊं नका! मी कामधाम आटपून तुमच्या घराबाहेर साहेबी थाटानं वागलों तर हरकत नाहीं ना?

**विनायक**––काय अस्सल एक नंबरचा गाढव आहे हा! रांडलेका! तुझं गांजा ओढून डोकं फिरलं खास. काय एवढा पोषाखावर भाळलास. हा शुभ्र रुमाल, अंगरखा, उपरणं सोडून, हें काय मोहरमांतलं सोंग झालास?

**श्रीखंडया**––आप्पासाहेब, या पोषाखाचा काय तुम्हांला जादू सांगूं! मी डोळ्यांनीं पाहून अगदीं थक्क झालों. उगीच नाहीं भाळलों! आपल्या पलीकडील आळी सकाळीं झाडणारा भंगी, होल्या डोंब मी प्रत्यक्ष पाहिला! एका पाद्रयानं खुष होऊन, त्यास असाच एक ड्रेस दिला! त्यानं तो ड्रेस घालतांच, यक्षिणीच्या कांडीसारखा प्रकार झाला. भावावर मारामारीची फिर्याद म्हणून तो पोलीस चौकींत गेला, तिथं नांव विचारतांच, त्यानं मिस्टर हालोहेड म्हणून सांगितलें, त्यासरशी तिथल्या गणेश टेबलनें सॅल्यूट उडवला. आर्मीडोअरने नव्हे फौजदारनें सेकंडहॅन्ड केला. कोर्टांत

जातों तोंच खुर्ची मिळाली. स्टेशनवर जातांच बिन तिकिटानं सेकंडक्लास गांठलीन्–रिफरेशमेंट रुममध्यें साहेबाची पंगत झोडलीन. नुसता एक दिवस तालुक्याच्या ठिकाणीं गेला, तों तिथल्या मामलेदार फडणिसांनीं त्याची सरबराई केली. आज सहा महिन्यांत त्यानं नुसत्या पोशाखाच्या देखाव्या-वर शेंकडों, अंडीं, कोंबडीं, बकरी फस्त करून शेवटीं त्यानं रेल्वेगार्डची नोकरी पटकावली! तेव्हांच खूणगांठ बांधली कीं, आपलें कांहीं तरी चुकते आहे खास! उगीच नाहीं, प्रत्यक्ष हिंदु असतांना, ब्राह्मण असतांना, मराठे असतांना, या पोशाखावर, मामलेदार, सब्‌ज़ज्जीस भाळले! उगीच नाहीं, रावसाहेब, दिवाणबहादूर, रावबहादूर हुरळून गेलें! उगिच नाहीं, डॉक्टर, वकील भान विसरले, उगीच नाहीं बॅरिस्टर, सॉलिसिटर मोहून पडलें! यापेक्षां, या पोषाखाचा महिमा जास्त विस्तारानं काय सांगूं? हा संपूर्ण पोशाख करून जर मी थोबाड रंगविलें, तर आकाशपाताळ एक करीन अशी प्रतिज्ञा करतो.

**विनायक**—ठीक आहे, ये पाहूं इकडं, तुझ्या आकाशाचं मग पाहीन; सध्यां पाताळांत दोन लाथा घालतो आणि घराबाहेर हाकून देतो!

(त्याचा कान धरून त्याला मारतो, त्यामुळें विजारींत ठेवलेला कांटा त्याला बोंचतो) हरामखोरा!

**श्रीखंड्या**—थांबा, थांबा, पाताळांत कांटा, अहो पाताळांत कांटा बोंचला. मी विसरून, खिशांतच ठेवला वाटतं! हा पहा डबलरोटीचे तुकडे टोंचून खाण्याकरतां विकत घेतला, तो चुकून खिशांतच राहिला. नेमकी लाथ बसतांच मांडींत शिरला.

**विनायक**––पुन्हां माझ्या घरांत शिरलास तर याद राखून ठेव! हरामखोर गांजेकस! अनपूर्णे, ए अनपूर्णे! ये इकडे आधीं (ती येते). ह्या श्रीखंड्याला जर माझ्या परवानगीशिवाय घरांत घेतलास तर खबर-दार! आणि जर पुन्हां त्याला कामावर यायचं असलं तर सगळें सामान नि कपडे जाळून टाक म्हणावं! कायग, तुला हें कसं सगळं खपतं!

**अनपूर्णा**––हे पहा बाई काय ते! इश्श त्यांचा माझा काय संबंध! मला काय करायचं त्यांच्या पोशाखाशी!

**विनायक**—हो! तें सगळं मला ठाऊक आहे! मी पंधरा दिवस घरीं नव्हतो, तो फारच गाढव चेकाळला. जा, नीघ. ( श्रीखंडया जातो ) तूं माझ्या अत्यंत विश्वासांतली म्हणून म्हणतो, कायग, माझ्या पश्चात माझ्या सरलेच्या दृष्टीस पडेल असं, श्रीखंडया आणि तूं वेडविद्रं नाहीं ना वागलांत!

**अनपूर्णा**—इश्श छे, छे.

**विनायक**—तिला भलत्यासलत्या गोष्टी नाहींना पढवल्यांत!

**अनपूर्णा**—इश्श काय पढवणार मी तिला!

**विनायक**—अग, काय काय कला तुला अवगत आहेत तें मला सगळं ठाऊक आहे! काय पढवतां यायचं नाहीं तुला! बरं पण माझ्या पश्चात ह्या गाईन त्या वासरीला चार देवळांत नाहींना फिरवलीन भलत्या-सलत्या कथा पुराणाला!

**अनपूर्णा**—छे हो, मी कशाला नेऊं सरलाबाईना! त्या घरांतच करमणूक करून घेत होत्या! मी मात्र कधींमधी जात होते!

**विनायक**—तुझ्याबद्दल वादच नाहीं; तूं रोज गेलीस तरी हरकत नाहीं. जा घरांत आपल्या कामाला आंतून घट्ट कडी लावून घे. मी थोडा कामाला जाऊन येतो. चुटकी, चिटकी, खडा, शीळ, ऐकून खबरदार दार उघडलंस तर! समजलीसना! तसंच तो श्रीखंडया, खबरदार कपडे जाळल्या-शिवाय परत येऊं दिलास तर! चल जा! ( ती जाते ) अरे हें पत्र पोष्टांत टाकायचं तसंच राहिलं! चला आधीं टाकून आलं पाहिजे. कोण! अरे वा! कोण दिनकर! ( दिनकर येतो ).

**दिनकर**—अर्‌र्‌र् विनायकराव! अरे वा! अगदीं अवचित भेट झाली बुवा! फार दिवसांनीं भेटलों बुवा!

**विनायक**—हो, फार दिवसांनी भेटलों! तुमचं कॉलेज वगैरे कसं काय ठीक चाललं आहे ना! तुम्ही काय चंडोल गडी!

**दिनकर**—कॉलेजवर केव्हांच बहिष्कार पुकारला आहे! आतां फर्स्ट-क्लास चाललं आहे! बाकी कॉलेजमध्यें असतांनां काय जिवाला घोर लागला होता थोडाच! तिनशें पासष्ठ दिवसांत–इस्टर, ख्रिसमस, आक्टोबर, मे महिना, कांहीं पुण्यतिथी. स्मारकदिन. जन्मतिथी––डिबेटींग,

गॅदरींग, टूर्नामेंट, क्रिकेट मॅचिस्, टेनिस मॅचिस् याशिवाय कुणीं प्रोफेसर, पेट्रन. मेला, गेला, मिळून तिनशे त्रेप्पन्न दिवस नुसता जलसा, मजा असायचा! काळजीचे काय ते बारा दिवस!

**विनायक**--शाबास! काळजीचे बारा दिवस कोणते?

**दिनकर**—दर महिन्याच्या पहिल्या तारखेचे. तेवढा काय तो दिवस पितृस्मरणाचा. काय सांगू विनायकराव, पोष्टमन् मनिआर्डर घेऊन येतांना पाहिला कीं पोटांतला आनंद गगनांत मावेनासा होत असे! पोष्टमन पितृस्थानी वाटून, प्रत्यक्ष पितृदर्शनापेक्षांही हर्ष वाटत असे. आणि असंच वर्षानुवर्षं पितृदर्शन महिन्याच्या महिन्याला बिनचुक घडावं म्हणून आणलेल्या मनिआर्डरीमधून चट्दिशीं एक रुपाया भिजवून वडिलांच्या हातावर दक्षणा ठेवित असे.

**विनायक**--भले शाबास! पण सध्यां कसं काय चाललं आहे?

**दिनकर**–कसलं चाललं आहे! रांगत आहे, फरफटतं आहे, लंगडत आहे! कसलं काय. काहीं तरी आहे झालं! विनायकराव, मी तुमच्या घरीं दोन तीन वेळ येऊन गेलों! थोडी पैशाची अडचण होती म्हणून पण, पाहतों तों घराला कुलुप.

**विनायक**—( मी पूर्वीच घर सोडून इकडं बिऱ्हाड बदललं हे बरं झालं. याला ठाऊक नाहीं ते नाहीं तर पैशाची जळू लागायची रिकामी. ) अरे तुम्ही काय चंडोल गडी! बोलून चालून कॉलेजॉइट पारवे तुम्ही! तुमच्या नडीला, गरजेला, वाटेचा वाटसरु देखील उपयोगी पडायचा. आज अगदीं फॅशनिबल् ड्रेस करून कुठं निघालास! गर्दीगर्दीन शिकारीला!

**दिनकर**--तुमचा आमचा मुळींच परकेपणा नाहीं. तेव्हां तुम्हालां खरं सांगायला काय हरकत आहे! घेरून आणलं आहे सावज, पण–म्हणावी तशी गोळी लागली नाहीं.

**विनायक**--अस्सं. पण सावज जखमी होऊन पसार झालं नाहीं ना?

**दिनकर**—छे, हो, त्या गरीब गाईला, हरणीला, बकरीला काय जखमी करायचं! उलट चांगली माणसाळली तर जन्मभर पाळणार आहे मी तिला!

**विनायक**—आहेस खरा बाबा चंडोल गडी! बरं, पण सावज कुठं असतं! कोण कुठलं! कांहीं तरी कळूं दे!

**दिनकर**—तें म्हणजे एक अरेबियन नाइटमधील कोडच आहे! ती म्हणजे नुसती जाईजुई, चमेली, बकुळ, पारिजातक, यांच्या फुलांची जणूं काय रासच आहे.

-पद-

**लोभावला मज दास केला। टाकुनिया मोहजाला जीव वेडावला ॥ ध्रु० ॥ वदनशशी मम प्रिय रमणीचा । करिल चकित मति सकलाला ॥ १ ॥ निष्पापाचा प्रगटे ठेवा। दर्शनी पुनीत करायाला ॥ २ ॥**

तिच्याशी बोलतांना, हांसतांना, सुगंधाच्या दरवळणीनं मस्तक कसं धुंद होऊन जातं! तिच्या जवळ गेलों, म्हणजे मला तर कांहींच भान राहात नाहीं! ती माझी सरला! ह्या पलीकडच्या कोपऱ्यावरच्या बंगल्यांतच राहते.

**विनायक**—अर्र्र्! हा हरामखोर तर माझ्या घरांतच रोमान्स, पोईट्री करतो आहे! ह्या बोक्याला नेमकं दुधाचं पातेलं कसं सांपडलं!

**दिनकर**—ती गंमत सांगून तुमचा सल्ला विचारायकरतां दोन तीन वेळां तुमच्या घरीं आलों होतों. पण घराला कुलूप. त्यामुळं भेटीचा योग घडला नाहीं. अहो विनायकराव, इतक्यांतच काय बिचकतां? आणखी नाहीं तुम्हांला गंमत ठावूक! तिला म्हणे, एका स्वार्थसाधु हलकटानं आज आठ दहा वर्षं अशी बंदिवासांत ठेवली आहे! तो सुंदर कस्तुरी मृग चांगला पोसून मोठा करून, एकट्यानं त्याचा फन्ना उडवावा, म्हणून इतके दिवस त्यानं तळघरांत कोंडून धरला आहे! जर कां तो मला भेटला, तर प्रथम तीन टिकवीन, मग पुढं भाषा!

**विनायक**—ह्याच भाषण म्हणजे जसं कांहीं माझ्या कानांत शिशाचा रस उतरतो आहे! जस काय सांडसानं मासाचे लचके तोडतो आहे.

**दिनकर**—कां! विचार कसला करतां! तुम्हांला देखील आला ना माझ्यासारखा राग! तुम्हाला माहीत आहे कांहो तो बेशरम!

**विनायक**—( तूं बेशरम, तुझा बाप बेशरम ) विशेष परिचय नाहीं, साधारण तोंड ओळखीचा असेल कदाचित्!

**दिनकर**—मला दाखवाच तो हलकट! काय सांगू माझी सरला,

म्हणजे रत्न आहे बरं रत्न ! तिच्या डोळ्यांतलं तेज, कोहिनूरच्या स्वप्नांतहि नाहीं ! कांहीं कारणानं जर मोती, पांच, लालडी, माणिक, हिऱ्याचं तेज एकदम नाहींसं झालं, तर सगळ्या सराफ आळींतल्या जव्हेऱ्यांनीं ओंजळींत गारगोट्या घेऊन तिच्यापुढं धराव्यांत, नुसती तिने दृष्टी टाकली, तर त्या गारगोट्याचे पुन्हां हिरे होतील ! कायहो तुम्ही बोलत नाही—चालत नाहीं. कंटाळलांत वाटतं आमच्या गोष्टीला ! मग चेहरा अगदीं जमीनदोस्त करून टाकलां तुम्ही ! कां चेहरा असा आंबट कां केलांत ?

**विनायक**—छे आहे तसाच आहे ! थोडा थंडीनं मुरडा होऊन पोटांत कळ उठती आहे मधून मधून !

**दिनकर**—एवढंच ना ? कां म्हटलं आम्हांला सरलेची लॉटरी मिळणार म्हणून पोटांत मुरडा आला तुमच्या ! अहो, कांहीं कांहीं जणांना तर दुसऱ्याला लाभ झालेला ऐकतांच कॉलरा होतो. ठीक आहे. मुरडा, कळ होते आहे, तुम्ही थोडे रात्रीं सुंठेचं चाटण घ्या, किंवा सकाळीं जुलाब घ्या. मी भेटेन पुन्हां तुमच्या घरी येऊन ! ( जातो ).

**विनायक**—ठीक आहे, भेटा पुन्हां कधीं तरी ! आतां काय जुलाब द्यायचा बाकी ठेवला आहेस ? माझी तर अक्कल गुंग करून टाकली यानं! माझ्या घराच्या आणि नांवाच्या फसगतीमुळं हा गाढव माझ्याशी बकून गेला आणि म्हणूनच सगळं बाहेर पडलं ! जरा आणखी खुलवून, त्याचे पुढचे डावपेंच काढून घेतले असते तर फार चांगलं झालं असतं. आतां त्याला शेवटपर्यंत, घराचा आणि नांवांचा पत्ता न लागूं देतां, त्याच्या पोटांत शिरून, त्याचे बेतबात युक्तीनें काढले पाहिजेत.

**दिनकर**—( परत येऊन ) हो बरी आठवण झाली, मुद्दाम परत आलों. विनायकराव, एक शब्द देखील बाहेर जाऊं देऊं नका ! मी आपला फ्रेन्ड म्हणून सहज तुम्हांला सांगितलं ! विशेषेकरून, त्या हरामखोराला याचा वास देखील लागता कामा नये ठीक आहे. ( जातो ).

**विनायक**—ठीक आहे ! हरामखोरा ! गाढवाच्या लेका ! जर तुला पुरून उरलों नाहीं, तर नांवाचा विनायकरावच नाहीं. ( जातो ).

---

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ सीन—धराच्या ओटीवर शंभ्या संध्या करतो. ]

शंभ्या—गिरिजे, ये हकडं. ये हकडं ( गिरिजा येते ) कां खजाळी केल्यावानी नाक मुरडूनशान हांसतियास ! उमगलं, उमगलं कां हांसतियास तें—

### पद.

**ह्यो गडी बामन बनूनशान जाणार ॥ संध्या करनार ॥ जावनं घालनार ॥ आतां दर्भान तर्पन करनार ॥ धृ० ॥ श्राद्ध पक्षाच खाऊन पिंड ॥ गांवांमधून काढिन धिंड ॥ तुझ्यासंगति म्हणून जानार ॥ १ ॥ समिंदराच पानी गुळमाट ॥ बामनानं केलं खारट ॥ त्येला गुळवणी वानी करनार ॥ २ ॥**

अग हांसू नगस, योक दिन हा शंभ्या, पट्टशीश होऊनशान शंकाचार्यांच्या गादीवर न बसला, तर सांगाशिल ते ऐकन. जर बामनाचा बा म्हूनशान, सोन्याचांदीच्या मुठीच्या काठ्या धरून, ललकारत भालदार, चोपदार, माझ्या म्होरं न नाचलं तर सांगाशिल ते ऐकन. जर शिशिनम्हून तुझ्यासंग तुपाच्या मशाली लावून पालखीत गोंडा धरून, भर दीसा गांवांतून न मिरवलों, तर मंग मला म्हन ! अग हाय काय त्यांत ?

गिरिजा—आतां काय म्हनू तरी बाई या वेडेपनाला ! कितीबी खरारा केला तरी गाढवाच घोडं कसं व्हनार ! अहो शंभूराव, हे कसलं आपलं कामधंदा टाकूनशान, येदोक्ताचं खूळ घेऊन बसलांत ! तुमी तर पंधरा दिसांत आंगबी धुतलं नहीं. बामन आंग धुतल्याबिगार संध्या करतात कां कुठं !

शंभ्या--आसनान ! आन रोज करतूया नव्हका आसनान ! लागली वटवट कराया ! ह्यो राखोड्याचं भसाभ स्नान केलं नव्हका ! डोळं गेल्याती व्हय तुझं ! अग तीन पोतीं मुडद्याचा राखोडा घरांत आनून ठिवला हाय ! जवाका, पाहटंस ह्यो पठ्यानं राखोडा फांसला, म्हंजी......

गिरिजा--मोहरमातलं सोंग हाय का शंभूराव हाय ह्योबी नाय उमगायचं कोनाला ! मी म्हनत्ये, पन तुमासनी बामन भेटला म्हनजी त्यासनी, तुमी, पाजी हरामखोर, आन नाहीं नाहीं त्या कडकडून शीगाळी करतां, मंग बया त्येच बामन होयापायीं तुमी का आपल्या जिवाचा तरफडाट करतायसा ! तुमी कां त्येंच्या संमद्या हरामखोरी पायीं आपला जीव टाकतायसा !

शंभ्या—अगं तसं नव्ह ! पन मला लई चीड येतीया बामनांची. लई आपलपोटीं, लई दिमाकाची, लई सवळी जात हायती. मानसावानी मानसं आमी मराठं, त्येंच्या घरांत गेलों आन त्येंच्यांत आमासनी मिसळून घेतलं तर त्येंच्या बाचं काय तीन चवल जात्यात व्हय ! आपल्या पंक्तित आमासनी घेतलं तर त्येंच्या नरड्यांत काय घांस आडकून बसल व्हय ! लई नाकानं वांगी सोलत्यात.

गिरिजा—दुसऱ्याच्या डोळ्यामंदी कसं पटकन बोट जातया ! मग योकादा म्हार मराठ्याच्या घरांत शिरला, आन लग्नाच्या पंक्तित पत्रोळीवर बसला, तर काय मराठ्यांच्या घशांत तेलवडा आडकून डोळं पांढर व्हत्यात व्हय ! कां पटकी येतिया त्येंना ! त्योबी मानसावानी मानूस ! मंग महार, चांभार, मराठ्याला खेटला तर काय त्येच्या इंटाळानं मराठ्याच्या हातापायाला ठणका लागतोया व्हय ! मराठंबी लई नाकानं कांद सोलत्यात. आमी मराठ्यांनीं म्हाराला दूर लोटलं, म्हून विठोबा त्येना दूर लोटील व्हय ! गळ्यांत काळा दोरा, खांद्यावर घोंगडी, आन हातांत काठी घेऊन इठ्या म्हार झाला ठावं नाय व्हय !

शंभ्या—त्ये नग मला सांगूस ! पन आमी बामनाच्या देवघरांत शिरलो तर काय त्येच देव तामणांतून उड्या मारून पळून जातील व्हय !

गिरिजा—पन म्हारानं पंढरपुरास, इठोबाच्या पायावर, डोकसं ठिवलं

तर काय संमद्या मराठयांचीं घर पेटत्यात व्हय ! अव ही काय अवदसा आठवलीया तुमाला ! कामधंद्यानं जाती वायल्या वायल्या झाल्या तरी समदीं मानसच हायती. संमद्या जातीबी इठोबाच्या लाडक्याच हायती.

**शंभ्या**—इचिभन ही तर अक्षी भटाळली. मालकीनीच्या संगान अक्षी मडाकली ! अग गिरीजे, आज काय चहाच्या बदली पमाताईचं योकादं आंग्रजी पुस्तक पान्यांत कोळून प्यालीस व्हय ! ये हकडं, लई वटवट चालवली हैस ! कायबी केलंस तरी तुला माझ्यासंगच संमदा जनम काढाया व्होवा.

**गिरिजा**—पन मी तरी कुठं बामण नवरा व्होवा म्हून म्हनतीया. जेचं त्येलाच व्होव, आन जेच त्येलाच भूषान !

**शंभ्या**—अग, अग गिरीजे, कशी तुझ्या तोंडांत खडीसाखर है जनुं. अक्षी खारकेवानी, मधावानी, ग्वाड हैस बघ ! आन हे माझ्या गिरीजेचं झाड या माळ्याचं अक्षी लाडकं हाये बघ ! ये, बैस माझ्याजवळ ! हिंग अस्स ! अग तसं नव्ह ! बामनीनीवानी, उकीडवी बैस, पायावर बैस ! आन लाव तुझा हात माझ्या हाताला ! नहीं तर दोनी हातांनीं माझ्या दंडाला धरून बैस ! मी वाईच् संध्या, पळीनं तामणामंदी आपचन करतो.

**गिरिजा**—अहो, पन संध्या करायच्या आधीं मुंज करतात बामणांची ! आन ह्यो काय बया दोडावानी मांडलायसा तुम्ही !

**शंभ्या**—अग त्यांत काय दोडावानी झालं ! मुंज केली ना माझी मीच !

**गिरिजा**—चला बोलूं नका ! आन ती कशी झाली ! काय भाजी आहे व्हय मंडईतली !

**शंभ्या**—अग परवां चार बामणं घरीं बोलावून त्येसनी पाटावर बसवलं आन केशर घालून आटीव दूध त्येंच्या म्होरं ठेवलं, आन पांच पांच रुपये त्येंच्या हातावर ठेऊन मुठ दाबली. आन मी मारुतीवानी हात जोडून म्होर उभा राहिलों आन माझी मुंज करा म्हून बोललो.

**गिरिजा**—नुसतं गाढवाचं प्वार हात झालं ! मंग काय झालं !

**शंभ्या**—काय व्हायचं! मला लंगोटी घाला म्हनतांच योक हात पगडी-वर आन योक हात काष्ट्यावर ठेवूनशान इचु चावल्यावानी बामन पळाल्याती ! तवा माझं माथं पिसाळलं, आन रागबी आगडोंब उसाळला !

तसाच रागाच्या झटक्यात इंगळावानी डोळे लाल करून हीं पोथी, आठ आन्याचं घमेलभर गाईचं शेन आन मुत, बाजारांतून इकत आणून, योका बैठकीला यो पठ्यानं चपाटलं! आन तोंड पुसूनशान लंगोटी, जावनं अड-कावलं! त्या वक्ताला जर का माझी बहीन सारजा नाही तर तूं म्हार गवस-तीस, तर रागाच्या झटक्यांत तुमचीबी मुंज करून मोकळं केलं असतं! हरकत नाहीं तुझी मुंज नहीं झाली तरी. आपुन पोथीबरहुकूम पुन्हां यदोक्त गिर्भदान करून टाकूं म्हंजी त्येतलं ह्यांत आलं!

**गिरिजा**—नुसतं गाढवाचे राजे आहांत झालं! अहो, असं पोथी घेऊन बामणं झाली असती तर आजपाउतर शेकडों राजं, शिंद, होळकर, गायक-वाड, भोसलं नसतं कां बामन झालं! तुमचं शिवाजी राज नसत कां बामन झालं! त्ये संमदे येडे व्हते व्हय! आन आतांच तुमाला बामन होयापाई शिंग शेपूट फुटलं व्हय! अहो जातींत काय पुरलं कुनाच गांठोडं! बाम-नांत काय म्हार नसत्याती व्हय! आन मराठ्यांतबी काय भंगी कमी हायती व्हय! संमद्या जातींत साधुसंत, आन उलट्या काळजाचं दोनीबी लोक गावत्यात. मी तर म्हनत्ये देवानं जिथं जनमाला घातलं, त्या जातीचाच संमद्यासबी अभिमान व्होवा! जो जातीशीं बेइमान झाला, त्यो देवाला तरी काय आवडणार हाय!

**शंभ्या**—खात्रीनं आज कोनी तरी भटानं तुझ्या डोकीवर हात फिरी-वला, म्हून अशी चबार चबार बोलतीयास. आतां मुकाट्यानें माझ्या दंडाला धरून बैस, नहीं तर दाविन या मराठ्याचा दरारा.

**गिरिजा**—आतां काय नव्यान बघनार हाय! हाय मला संमद ठावं! अगबया, ह्यो काय गळ्यांत! काय! पमाताईंचा इस्लीपर! आज दोन दीस संमदं घर धुंडाळलं मी! आन तुमी तर गळ्यांत माळ करून घातला यसा. अहो, काय येडेबिडे तर नाहीं झालांत!

**शंभ्या**—अग बामन जावन्याला हिरनाचं कातड बांधत्यात, गावांत इकत नाहीं मिळालं! पन पमाताईंचा इस्लीपर हिरन्याच्या कातड्याचा हाय म्हून त्येसनी बोलतांना ऐकलं तवा त्योच दिला जावन्याला गुतवून (आंत प्रेमा स्लीपर कुठं आहे म्हणून ओरडते)

**गिरिजा**—( त्याच्या जानव्याचा बांधलेला सोडते ) गावला, गावला, हकडं कोंपऱ्यांतच पडला होता! अहो असं काय मुडदाडावानी करतायसा! हानू का घा पांच !

**शंभ्या**—हान, हान त्येला काय झालं ! हिरनाच्या कातडयाचा सवक्यांतला हाय ! अग त्येच्या कातडयाच्या संबळीत देवी, महादेव, बालकिनस, बाणभी राहतूया, त्येला काय झालं, हान घा पांच !

**गिरीजा**—चला, आज कुठं तरी चिलीम केलीया ! उठा हातनं ! संमद काम घरांत पडलया ! ( आंतून प्रेमा ओरडते-अग सांपडला काग !) आनला, आनला, हा बगा हातातंच हाय.

**शंभ्या**—व्हो म्होर तूं ! मी आलोंच आपचन करून बेगीबेगी. ( गिरीजा जाते ) केशवायनम्हा, नारायणायनम्हा ! माधवायनम्हा ! ( तीन ताम्हनं पाणी पितो. ) हऱ्यायनम्हा ! ओंभुर्र भस्स ! ओंफिर्रफट ! अहो येनार नाय म्हंजीं काय ! अश्शी येदोक्ताचं घद्याचं गाडग घुसळून काढतो बगा ! ह्यो संमद संसकुत्र सबुद बोलून, माझ्या थोबाडाचा अश्शी गोळा होऊन गेला हाय ! तीन तामनं आपचनाचं पानी पिऊन पोट फुगून कशी रगबी लागलीया ! तीन वेळां मिळून नऊ तामनं पानी बामनं कसं पेत्यात देवाला ठावूक ! माझ तर तीन तामनांतच तीन शेंडया मारवाड्यावानी तटाटा पोट फुगलया ! कानाला जावनं बांधून वाईच बाहीर तंरी जाऊन येतो म्हंजी पोट शाप उतरल ! ( शंभ्या जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

[ सीनः—बगीच्या. ]

**प्रेमा**--मी नेहमी अशा ठिकाणीं मधुन मधुन येते. म्हटलं कुठं तरी कांहीं तरी चमत्कार दृष्टिस पडेल ! पण कुठं कांहीं नाहीं ! चौफेर दृष्टि टाकावी तों वर उन्हाळा आणि खाली वणवा पेटलेला आहे !

**सुधा**--आलं लक्षांत ! ज्याच्या सांवलीला क्षणभर बसावं, अस एक देखील आवडीचं कोणीं भेटलं नाहीं, असचं कीं नाहीं तुझं म्हणणं !

**प्रेमा**--काय सांगू तुला, पाहीन तिकडे सुतकी चेहरा नजरेस पडतो. इतके जिनगरी बाहुल्यासारखे नटलेले, कांहीं कांहीं तर नुसत्या फॅशनकरतांच जगलेलें, रोमरंध्री एटीकेटनं लचकत मुरडत असलेले, अलिकडचे तरुण, जवळ जाऊन बघितलं कीं नुसता हाहाकार उडालेला दिसतो ! पांच मिनीटाच्या संभाषणाच्या आत तो बिचारा, ओठांवरच्या मिशा नि डोक्यांतली अक्कल दोन्ही एकदम साफ केल्याचा अनुभव देतो. हा लांबून केसाचा आयाळ फुगवलेला सिंह, जवळ जातांच हरणासारख्या हातापायाचा, त्रिकोणी तोंडाचा आणि बगळ्यासारख्या उंच मानेचा दिसतो. चेहऱ्यावरची कळा तर विचारायलाच नको !

**सुधा**--हो, हो ! सगळं अवसान काय तें, कंगवा, फणी, शिंप्याचे ड्रेस, आणि तोंडाचा बकवा ! वाटेल त्याला विचारा, ताबडतोब बिचारा, मेथॉ, रानडे, टिळक, गांधी, दास, मालवीय, यांच्यावर तोंडसुख घेऊन मतांचा शिक्का मारून, आपल्या डोक्यासारखाच मोकळा ! तोंड करीत आहे बाता आणि कंबर खाते आहे लाथा !

**प्रेमा**--अशांना, रोमान्स, नाव्हेल्टी, मेतकुटाशी खातात कां आमटीशी भुरकतात, तें देखील कळत नसतं. बिचारे हे मरतुकडे उंट, आपल्या आयुष्याचं, रखरखीत वाळवंट, जन्मभर तुडवून शेवटीं अखेरचे कुठं तरी पाय ताणून, मान टाकतात झालं ! कायग, असल्याच एखाद्या उंटाच्या मानेवर, पाठीवर बसून सगळा जन्म, हेंदकाळत काढायचा, म्हणजे पूर्वजन्मीचं पातकंच ! ये, आपण या बागेंत थोड फिरुं या ! या खोट्या जगांतली, सडक्या हृदयाची घाण घेण्यापेक्षां, या बिचाऱ्या भोळ्या मनमोकळ्या, आनंदी आणि हासतमुख फुलांतच जाऊन मिसळू या ! थोडी तरी मनाला मौज वाटेल !

( प्रेमा, सुधा बागेंत फिरत असतात इतक्यांत दिनकर, प्रभाकर येतात )

**प्रभाकर**--ब्रदर कॉमरेड ! तुला तसं वाटतं ! डॉक्टर किंवा वकील यांच्यासारखा, मी, दाबांची, खुंटीची कलम बांधणारा मात्र आचरट माळी नाहीं. क्षणिक औदासिन्य, खिन्नता, ग्लानी," यांच्या लहानशा,

रोपट्यावर, डॉक्टर जसा, मॅलोकोलिया, हायपोकांड्रीया नुरेस्थिया या मोठमोठ्या रोगांची कलमं बांधतो, किंवा सरकारी वकील जसा "स्वराज्य माझा हक्क आहे! राज्ययंत्र बदललं पाहिजे! नोकरशाही मदोन्मत्त आहे," वगैरे लहानशा सत्याच्या रोपट्यांवर, एकशेएकवीस, एकशेचाळीस, एकशे त्रेप्पन्न, अशी पिनलकोडाची कलमें बांधू लागतो, असा गाढव माळी मी नाहीं! त्यांच्यासारखा विपर्यासाच्या दुर्बिणींतून सहज गोष्टीकडे पाहणारा मी नाहीं! हरबऱ्याच्या झाडावर वडाची फांदी चिकटविणारा मी नाहीं! आतां लोक तुझ्याबद्दल कोकलतात वाटेल तें, पण मी विश्वास ठेवला आहे का त्यांच्यावर!

**दिनकर**—अरे पण मी केलं आंहेच काय! मला कां विनाकारण बळी देतोस! अरे पण थांब! हे रे कोण! नुसत्या हवा खायला आल्या आहेत का यांचा फराळाचा नी जेवण्याचा बेत आहे! गड्या प्रभाकर, हा संस्थानिक तर मोठा फॅशनेबल दिसतो. (एकमेकांस पाहतात).

**सुधा**—पमे, थांब! हीं कुणी तरी बागेंत चरायला आलेली हरणं दिसताहेत! छे, दोन्हीही काळविटच आहेत. दुर्वा खायला आलेले दिसतात.

**प्रेमा**—बघते थांब, मी पुढं जाऊन बिचकतात कीं काय तें! थांब अं! मी जरा गंमत करते. (हातरुमाल खालीं टाकते) बघते शीत चाचपून.

**दिनकर**—प्रभ्या, गळ टाकला तिनं! तो पाहिला का गळ! लाग गळाला! हो पुढं! घे अडकवून घशांत!

**प्रभाकर**—अरे डरतो थोडाच! ऑलराईट! (रुमाल उचलून तिला देतो व सिगारेट केस खिशांतून पडते). वेल, लेडी, युवर हॅन्डकरचिफ! काय सुगंध दरवळतो आहे!

**प्रेमा**—ओ थँक यू! युवर सिगारेट केस!

**प्रभाकर**—ओ, ट्रिमेंडसूली ओब्लाइज्ड्!

**प्रेमा**—आपण कोण? कुठले, काय? आम्हांला कळलं तर बरं वाटेल!

**प्रभाकर**—व्हाय नॉट! मोस्ट सरटनली, अॅन्ड वुइथ प्लेझर!

**दिनकर**—ब्रदर, खाकेंतून काव्य भिरकवतांना संभाळरे बाबा!

**प्रभाकर**—मी, माझ्या मनाच्या हिरव्यागार कुरणांत, आनंदाचे आणि स्फुर्तीचें दहींवर पडून, शब्दांचे दुर्वांकूर चांगले उभे राहिले म्हणजे त्या-

वर काव्यकल्पनांच्या चपळ मेंढया चारून उदरनिर्वाह करणार एक धनगर आहे !

दिनकर--माय गॉड ! भले पठ्ठे !

सुधे--पमे, अगदीं रंगुनच नाहीं ! आंबेमोहोर दिसतो आहे !

प्रभाकर--तुमचीही माहिती आम्हांला कळेल कां ?

प्रेमा—सरटन्ली ! काळ, वेळ, प्रसंग खिन्नता वगैरे कुरुप आणि हिडीस दिसणाऱ्या मुलांना देखील, उपमा, तुलना, सुंदरहास्य, मनोहर कोट्या, यांच्या जरीची मखमली झबली, टोपी शिवून घालून, त्यांना गोजिरवाणी करणारी मी एक शिंपीण आहे !

सुधा—आतां मात्र रोमान्सचं झेपलीन उडणार खास !

दिनकर--हा शिंपी चालवणार आतां कात्रीं या धनगराच्या मेंढ्यावर!

प्रभाकर—दिनकर; हिअर इज् पोइट्री ॲन्ड ब्यूटी !

प्रेमा—देअर इज् रोमान्स ॲन्ड नॉव्हेल्टी—

पद

**किती सखे, मंजू मधू वेणू नाद । काव्यश्रवण मी करीत असे हा ॥ धृ० ॥ नच माधुर्ये मधुर आलापे । शांत करित मम अधिर हृदय ॥ १ ॥ प्रणयभावना, देई चेतना । प्रेममया करी सकल जगत ॥ २ ॥**

दिनकर—होणार आतां झटापट !

प्रभाकर—तुमचं कौतुक कसं करावं तेंच समजत नाहीं ! तुमच्या शब्दांच्या अमृताचे तुषार उडाल्यामुळें माझ्या मनोराज्यांत नुसती दंगल माजली आहे ! माझ्या मनोराज्यांतले गरीब बिचारे निर्जीव कल्पना-चित्राचे सर्व प्रजाजन एकदमं जिवंत होऊन त्यांनीं मारे धावपळ सुरू केली आहे ! राज्यांत चोहींकडे प्रोसेशन्स् निघाली आहेत !

दिनकर--मग त्यांच्यावर यांना करकमलांचा लाठीचार्ज करायला सांग पाहिजे तर !

प्रेमा--ओ माय गॉड ! नुसता आंबेमोहोर नाहीं, कमोद चिमणसाळ

आहे! आणखी थोडासा चांचपून बघते. आतां थोडं ढोंग करते हं ! सुधे, सुधे, धर बाई मला. कशी आनंदानं मूर्च्छा येत आहे ! ( ती सुधेच्या अंगावर पडते ).

**सुधा**—धांवा हो धांवा कोणी तरी ! हिला एकाएकीं घेरी आली वाटतं !

**प्रभाकर**—थांबा थांबा-भिऊं नका ! हा मी आलों !

**सुधा**—मी कारंजांतून पाणी घेऊन येतें. तोंवर धरा हिला !

**दिनकर**—मीही, जवळ बर्फ मिळतो कां पाहतो, आणि कांदा हुंगायला आणतो.

**प्रभाकर**—बेलाशक जा ! येण्याची विशेष गर्दी करूं नका ! मीही थोडसं हिचं डोकं मांडीवर घेऊन हिला सावध करतो ( वारा घालतो ). सावध व्हा, सावध व्हा ! असं काय बरं ? आतां आसपास जवळ दुसरं कोणी नाहीं ! आणि असले, तरी ते सर्व बैल आहेत असं समजा ! तुमच्या स्वप्नसृष्टींतील मजा पाह्यला, मला कां बरं बरोबर नेलं नाहींत ? सावध व्हा, सावध व्हा, असं काय बरं! अस्सं भरारी मारणाऱ्या माझ्या मनाच्या गरुडावर बसलेला, माझा जीव प्राण विष्णू, तुमच्या हृदयाच्या क्षीरसागरांत खोल दडून बसलेल्या लक्ष्मीकरतां, कसा विरहानं व्याकुळ झाला आहे ! काय करावं ? आज स्मेलींग सॉल्टची बाटली देखील बरोबर आणली नाहीं ! ( सुधा पाणी घेऊन येते ).

**सुधा**--हं हे घ्या पाणी ! शिंपडूं का डोक्यावर ? ( दिनकर कांदा घेऊन येतो ).

**दिनकर**---हं हा घ्या कांदा ! फोडूं का बुक्कीनं !

**प्रभाकर**---आलांत कां धडपडत ? आणखी थोडं जास्त तिकडे थांबला असतां तर !

**सुधा**—थांबा ! ( हिच्या रोमान्सची खोडकी मोडते ) काय नाहींना सावध होत बऱ्या बोलानं ! वेल जन्टल्मन् जरा थोडी तपकीरीची डबी द्या पाहूं इकडे. तुम्ही हिच्या डोळ्यांत कांद्याचा रस पिळा आणि मी तपकीरीची चिमुट नाकांत सोडते.

**प्रेमा**—छे, हिनं खरंच तपकीर नाकांत सोडली तर करतां काय ? ( जांभई देते. )

**प्रभाकर**—शुद्धीवर येऊन डोळे उघडल्यावर कमलांतून भृंगे बाहेर पडल्यासारखं मला वाटलं ! दिनकर, या लावण्यक्षेत्रावर आज आपण कसे आचुक आलों !

**दिनकर**—लागलास कां काव्य भिरकावायला ! दोस्त जरा बेतानंच चालूं दे !

**प्रेमा**—सुधे, आज किती वर्षांनीं मला ही नॉव्हेल्टी आणि व्हरायटी आढळली ! आपण कोण ? कुठं असतां ? सांगतां कां ?

**प्रभाकर**—कांहीं उत्तर देतां येत नाहीं. नुसतं मदिराक्षीला डोळे भरून पाहूनच मला अनिवार निशा चढली आहे ! ओठानीं प्यायलो असतो तर काय झालं असतं देव जाणें !

**दिनकर**—प्रीति आणि मदिरा ह्या सख्या बहिणी आहेत !

**प्रभाकर**—चूक आहे ! दारु आनंदी करते, प्रीति व्याकुळ करते. दारू विसर पडते, प्रीती सर्व जन्माच्या आठवणी काढते. दारू झोंप आणते. प्रीती, जागरण घडवते. दारू भोळा बनवते, प्रीती चिडखोर करते. दोघी बहिणी नसून, जमीनअस्मान स्वभावाच्या सवती आहेत !

**प्रेमा**—आपल्या चातुर्यानं, आणि उपकारानं, आपल्याविषयींच्या चौकशीची उत्सुकता, आमची सारखी वाढते आहे ! आपण कुठं असतां ?

**सुधा**—काय उद्योग करतां, वगैरे कळवलं तर फार उपकार होतील !

**प्रेमा**—उपकारकर्त्याचं नांव, गांव, कळावसं साहजिक वाटायचं !

**प्रभाकर**—छे छे, उपकार कुणाचा कुणावर झाला, हा तुम्ही निराळाच वादग्रस्त प्रश्न काढलांत ! खरं म्हणाल तर तुमचेच उपकार माझ्यावर जास्त झाले आहेत ! ते कसें बोलून दाखवावे, हेंच मला सुचत नाहीं ! शाळेची घंटा होतांच, पहिला नंबर पटकावण्याकरतां जशी लहान पोरं, हमरीतुमरी, मारामारी करून दरवाज्यांत घुसतात, त्याचप्रमाणं तुमच्या स्तुतीचा पहिला नंबर पटकावण्याकरतां माझ्या हृदयांत कशी शब्दांच्या पोरांची मारामारी सुरूं झाली आहे ! हा म्हणतो, मी पहिला जाणार, तो म्हणतो, मी पहिला जाणार.......

**दिनकर**—अरे, पहिला कुणी तरी असायचाच ! कान धरून चटकन्, एक शब्दाचं पोर जीभेवरून बाहेर ओढून काढ, म्हणजे तंटा मिटला.

प्रेमा—डिअर सुधे! रिअली ए रोमँटिक फेलो!

सुधा—अनायासे तुझ्या विमानाला पायलाट वैमानिक मिळाला!

दिनकर—हा रोमँटिक शत्रू मांडालिक झाला तर तुम्हां दोघांची वस्ती यापुढं ढगावरच व्हायची!

प्रभाकर—रिअली, आय से दिनकर!—

**पद**

**मारी जिव्हारी हा नेत्रबाण धनुधारी ॥ धृ० ॥ जुलमी डोळे जादूगिरीचे। लावी विष त्या मधुहास्याचे ॥ अजिंक्य कार्मूक ह्या भ्रुगुटीचे । सूं सण सण शिरला उरी ॥ १ ॥ सरस्वतीची। गमे तुतारी। कल्पनाच कां मारी भरारी। नवरसमूर्ती लीलाधारी। जड मुढ संजीवन करी ॥ २ ॥**

प्रेमा—आपण याच गांवांत असतां काय?

प्रभाकर—होय, बगदादहून परत आल्यापासून इथंच आहे!

दिनकर—काय बगदाद!

सुधा—काय बगदाद! कशाला गेला होतां!

प्रभाकर—गेलों होतो! लढाई संपल्यावर परत आलों!

दिनकर—काय लढाई! हा हरामखोर तर महाकाव्य करायला लागला! करणार चीत सगळ्यांना!

प्रेमा—काय म्हणतां? लढाईवर शिपाई होऊन गेलां होता?

प्रभाकर—छे, छे, टाईम्स ऑफ इंडियाचा बातमीदार म्हणून गेलों होतो. बंदुक होती माझ्याजवळ!

दिनकर—तरीच टाइम्स ऑफ इंडियामध्यें बातम्या अगदीं बिनचूक येत होत्या! बेट्या, लावलास खरा दोघांच्या गळ्याला फांस! तीन वर्षे कॉलेज सोडून कुठं गेला असेल तर शपथ!

प्रेमा—तुम्हांला देखील लढाईत पडावं लागलं?

प्रभाकर—तर! त्याशिवाय खडानखडा माहिती कशी कळणार?

प्रेमा—माय गॉड ब्रेव्ह मॅन!

**प्रभाकर**---काय, सांगूं, तिथला भयंकर देखावा ! ते खंदक, ते रेताड, ती नदी, तो उन्हाळा, तो तोफांचा गडगडाट ! मशीनगन्सचा खडखडाट, बॉंब गोळ्यांचा दणदणाट ! तो बंदुकीचा मारा, वरून पावसाच्या मुसळ-धारा, घोड्यांचं खिंचाळणं, वीरांचं किंचाळण, खेचरांची लाथाडी, मारे धुमधडाका उडून गेला ! कुणाचा कुणाला पत्ता नाहीं.

**दिनकर**--काय गोष्ट आहे काव्यसम्राटा तुझी !

**प्रभाकर**--या बहाद्दरानं एकट्यानं, खजुरीच्या झाडाआड लपून माझ्या हातांतला बातमीचा रिपोर्ट हिसकावून घ्यायला टपलेल्या, पन्नास तुर्कांना लंबे केलें.

**प्रेमा**--आमची तरी काय बाकी राहिली आहे ! आम्हीही गुदमरून मरतोच आहोंत ! बरं पण आपण लवकर कां परत आलांत ?

**प्रभाकर**---अहो, मलेरिया ! भयंकर चिलटं चावली तिथं ! पण त्यांनीं उपकार केला म्हणायचा ! म्हणूनच आज तुमचं दर्शन घडलं !

**प्रेमा**—ओ डिअर ! नथींग लाईक वॉरफेअर !

**सुधा**--पमे, हा वीर जरी पुन्हां युद्धाला सिद्ध असला तरी इतक्यांतच तोंड देणें ठीक नव्हे !

**प्रभाकर**—काय सांगूं ! वाटेल त्या भयंकर शत्रूच्या छातीला छाती, नजरेला नजर, मी भिडवली, पण त्यांनीं मला सरेंडर केलें नाहीं ! पण आज तुर्कांच्यापेक्षांही शूर अशा तुमच्या डोळ्यांनीं, या लव्हबॅटलमध्यें, लढाईतला कैदी करून टाकला ! आपल्या प्रेमाच्या शृंखलेचं बंधन, मला व्हिक्टोरिया क्रॉस मिळाल्यासारखं भूषणास्पद वाटतं आहे !

**प्रेमा**--खरं आहे ! पण थिअरी आणि प्रॅक्टीस यांचा कसा मेळ घालावा हा मला थोडा विचार पडला आहे !

**दिनकर**—अहो कमांडर पुरे कीं थापेबाजी ! पडलांत कीं चांगलें तोंडघशीं !

**प्रभाकर**---अशा शत्रूसमोर तोंडघशीं पडणं कोण नाकारील ? आप-ल्याला नियमित खंडणी देऊन, मी आपल्याशीं तह करायला तयार आहे !

**प्रेमा**--कबूल ! आपल्या सद्गुणखजिन्यांची मदत एकमेकांना करून अशा दोन राष्ट्रांनीं शांततेचे तहनामे, जर आपल्या प्रेमाश्रूच्या शाईनें

लिहिले, तर सुंदर गोष्ट होईल यांत शंका नाहीं! पण त्यापूर्वी दोघानांही या महत्त्वाच्या तहनाम्याच्या अटींचा पूर्ण विचार करायला अवधी पाहिजे.

**दिनकर**—हं, गेले दांत चांगले घशांत! तुला थापेबाजींत भान रहात नाहीं म्हणतो तें हें असं!

**सुधा**—पमे, ते पाहिलेस कां निळकंठराव! इकडेच येत आहेत! आधीं धाय उचल, नाहींतर जुंपायची!

**प्रेमा**—कमलॉंग! ठीक आहे, आपले उपकार मी विसरायची नाहीं! भेटा असेंच पुन्हां केव्हां तरी!

**प्रभाकर**—अहो, पण तुमचं नांव, गांव, ठांवठिकाणा, अहो कांहीं कळवाल तर भेटायचना पण!

**सुधा**—काढावा शोधून! त्यांत काय आहे! बरं आहे, थँक्यू!

( प्रेमा सुधा जातात ).

**दिनकर**—घे दुसरी थप्पड! मी सांगतो पत्ता--नांव विद्युल्लता, ठिकाणा ढगांत, गांव आकाश, पत्ता वर!

**प्रभाकर**—आणि आपण तर खालीं. भेट कशी व्हायची?

**दिनकर**—त्याची फिकीर नको. आणखी असंच कुठं तरी काव्य केलंस म्हणजे जाशील चटदिशी वर! ठीक, चल!

( जातात ).

---

## प्रवेश तिसरा.

[ **सीन**—बगीच्याचा रस्ता. **पात्रें**—विनायकराव, सरला ].

**विनायक**—आतां जिथं मी तिथं तूं! चोविस तास अगदीं खड्या पाहऱ्यांत पाहिजेस! माझ्याशिवाय घराबाहेर पाऊलसुद्धां तूं टाकतां कामा नये. घरांत बसून कंटाळा येतो म्हणतेस ना! ठीक आहे! अगदीं माझ्या-बरोबर येत जा! तुला सांगितलं होतं ना, विचारल्याशिवाय कुठं जायचं नाहीं, मग त्या प्रेमाबाईकडं कां गेलीस?

**सरला**--तुम्ही इथं नव्हता, मग कुणाला विचारायचं ? त्यांच्या इथं किती गमतीगमतीची सामानं नी चित्र होती बाई !

**विनायक**--सरले, हें जग म्हणजे कुटाळांचा, लुच्चांचा, निंदकांचा बाजार आहेस समजलीस ?

**सरला**--हें कुठं तुम्ही मला सांगितलं हो ! तुमचे हे शब्द आज मी पहिल्यांदा ऐकते. कुटाळ, लुच्चे, निंदक म्हणजे काय हो ? कोण असतात हे लोक ?

**विनायक**--मी मुंबईला गेल्यावर, तो हरामखोर दिनकर, आपल्या घरीं येत होता ना ?

**सरला**--येत होते ! त्याचं काय ?

**विनायक**—कपाळ माझं ! सांग पाहूं तो कां आला तें ? त्याच्यासारख्या लोकांना, कुटाळ, लुच्चे, निंदक म्हणतात समजलीस ?

**सरला**—नाहीं समजलं ? पण ते कसे आले तें सांगते ! संध्याकाळी मी दारांत उभी असतांना, ते घरांवरून जात होते. इतक्यांत भयंकर आवाज करीत एक फडफड करीत दोन चाकांचं यंत्र आलं ! त्याचा धक्का लागून ते पडले. आणि त्यांच्या पायाला जखम होऊन रक्त वाहूं लागलं, आणि तें पाहतांच मी धांवून जाऊन त्यांच्या जखमेवर औषध लावून चिंधी आणि कापूस बांधला.

**विनायक**--तुला कुणी सांगितली होती नसती उठाठेव ?

**सरला**--तुम्हीच नाहींका शिकवलंत कीं दुसऱ्यावर उपकार करावा म्हणून ! त्यांना नंतर ते लंगडत होते म्हणून मी त्यांच्या हाताला धरून, घरांत आणून, पडवीत निजवलं, नी उन्हून कॉफी करून दिली, तशी त्यांना थोडी हुशारी वाढली.

**विनायक**--चांगलं केलंस ! नसतं मधाचं बोट लागलं त्याला ! बरं पण पुढं काय झालं ? हरामखोर, पाजी, चोर लेकाचा !

**सरला**--पुढच तर झाली सगळी गम्मत ! अप्पासाहेब, ते सारखे माझ्याकडे टक लावून पाहूं लागले, आणि सुस्कारा सोडून, केविलवाणं तोंड करून त्यांच्या डोळ्यांत पाणी तरंगूं लागलं !

**विनायक**--अरे हरामखोरा ! अरे वेरडा !

**सरला**—त्यांनीं सांगितलं कीं ते फार आजारी आहेत ! आणि त्यांच्या आजारावर केवळ माझं बोलणं चालणं आणि सहवास घडला तरच ते जिवंत राहतील, असं म्हणून हात धरून रडूं लागले. तशी माझ्याही डोळ्याला पाणी आलं हो !

**विनायक**--अरे वेरडा, रामबाण औषध शोधून काढलंस ! मग तूं काय सांगितलंस त्या चोराला ?

**सरला**—मी काय सांगणार ? इतक्या थरावर जर दुखणं जात असेल, तर येत जा बापडे बोलायला, बसायला, म्हणून सांगितलं. तुम्ही नाहीं काहो मला शिकवलंत कीं, आपल्याकरतां कुणी तळमळला, मेला, तर पाप लागत म्हणून !

**विनायक**--पुरा घात झाला ! माझ्या शिक्षणाचा मूर्खपणा चांगला माझ्या गळ्यांत आला ! शहाण्याचं व्हावं चाकर पण मूर्खाचं होऊं नये धनी !

**सरला**--तुम्ही कांहो पुटपुटला मनाशींच ! अलीकडं ते लागोपाठ घरीं यायला लागल्यापासून कसे खडखडीत बरें झाले. माझ्याशी कसें हंसून गुलगुल गोष्टी बोलतात ! पण बाई आतांशा त्यांच्याशीं माझ्या डोळ्याला डोळा लागतांच लाजून माझी मानच खाली होते ! त्यांनीं हातांत हात धरला म्हणजे अंगावर कसे शहारे येतात बाई ! आजपर्यंत वाटत नव्हतं असं, काहो वाटूं लागलं ? कां होतं चमत्कारिक मला ! काय ? सांगत नाहीं असं कसंसच कां वाटतं ते !

**विनायक**--माझं कपाळ ! गप बैस, वेडी कुठली ! तसं वाटणं मुळींच चांगलं नाहीं समजलीस ! मूर्ख कुठली !

**सरला**—आम्ही नाहीं जा ! पण मला मग त्या वेळेस कसं बरं वाटत होतं ! मी त्यांनीं धरलेला हात मुद्दाम तसाच बराच वेळ राहूं देत होते !

**विनायक**--चूप बैस ! मूर्ख कुठली !

**सरला**--पण आपल्याला जें वाटतं तें खरं सांगावं असं तुम्हीच नाहीं कांहो मला बजावून सांगितलंत !

विनायक—होय बाई! त्या वेळेस खेटरं मारायला नव्हता कुणी जवळ! दुसरी बाजू न कळूं देतां एकांगी दिलेलें शिक्षण असं नेमकंच माझ्या पायाखालीं खड्डा खणील, हें मला काय ठावूक! आणखी कांय गोंधळ घातला त्या गाढवानं, देवाला ठावूक!

सरला—हें काय हो आप्पासाहेब.—

पद.

**आतां कां उगाचि रागवता। कटु वचना कैसे वदतां॥धृ०॥**
**सत्य तिथें परमेश्वर असतो। तुम्हीच मज म्हणतां॥ समजावुनी मज सांगत जावे। कुठेही मम चुकतां॥ १॥**

आम्ही नाहीं जा सांगत अशानं! तुम्ही रागावतां आमच्यावर, मग कशाला सांगायचं!

विनायक—( गांगरून ) म्हणजे! खरंच कांहीं ब्रह्मघोटाळा केला कीं काय! आतां काय करावं! नाहीं नाहीं रागावत! सांग चटकन!

सरला—त्यांनीं कीं नाहीं माझा......

विनायक—तुझा काय!

सरला—मग कांहो असें रागावून बघतां! आम्ही नाहीं जा!

विनायक—आतां काय कपाळ फोडूं हिच्यापुढं! अग नाहीं रागावत! त्यानीं तुझा काय! काय केलंन त्या महारानं! हं सांग सांग!

सरला—त्यांनीं कीं नाहीं, माझा तुम्ही काढलेला फोटो उराशी धरून, मग त्याचे शेंकडो मुके घेतले हो!

विनायक—( श्वास सोडून ) एवढंच ना! हरकत नाहीं! सरले! तूं मूर्ख वेडी आहेस! तो रामोशी तुला फसवायला येत होता समजलीस! गरीब भोळ्या भाबडया मुलींना हे हरामखोर असे फसवायाला तयार असतात.

सरला—पण मी तुला प्राणांतीही फसविणार नाहीं, असं देवाची शपथ घेऊन, त्यांनीं मला सांगितलं!

विनायक—साफ खोटं आहे!

११२४
नाटक.


सरला—पण खोटं म्हणजे काय ! आणि कसं ओळखायचं हें तुम्ही मला कांहीं नाहीं शिकवलंत !

विनायक—सारखी माझी बोटं माझ्या डोळ्यांत घालते आहे ! सरले, त्या गाढवाचं पुराण मला नको आहे ! ते राहूं दे ! तुझं माझ्यावर प्रेम नाहीं का ! नाहीं का प्रेम !

सरला—हाच, तो शब्द ! त्यांचं माझ्यावर जिवापाड प्रेम आहे. असं मला सांगून, माझं त्यांच्यावर प्रेम आहे कीं नाहीं, म्हणून मला तिनदां विचारित होते. पण खरचं अप्पासाहेब, हें प्रेम, प्रेम म्हणजे काय हो ! तुम्ही कुठं त्यांचा अर्थ मला शिकवला !

विनायक—माझं नी तुझं कपाळ ! माझ्या तंगडया माझ्याच गळ्यांत येताहेत. सरले, प्रेम म्हणजे, त्याचे किती तरी प्रकार आहेत ! आवड वाटणं, कल्याण चिंतणं, सहवास इच्छिणं, आनंद वाटणं, मला सांग, माझ्यावर तुझं प्रेम आहे कां !

सरला—हो तर मग प्रेम आहे. तुम्ही आवडतां, बरे वाटतां, तुमचं कल्याण–व्हावसं वाटतं, इतकंच नव्हे तर तुम्ही मागं शिकवलंत ती माया, ममता, तुमची मला दया वाटते ! पण......

विनायक—छान, शाबास ! आतां पण काय राहीलं सांग !

सरला—पण बाई, तुमच्या जवळ बसले, बोलले, हसले म्हणजे मला लाज कांहो वाटत नाहीं ! तुमच्या दृष्टीला दृष्टी लावली म्हणजे अंगावर शहारे कां येत नाहींत ! त्यांनी हात धरला, म्हणजे कससंच वाटतं ! तसं कांहीं होत नाहीं आतां !

विनायक—मूर्ख, पांजी, गाढव आहेस तूं.

सरला—नाहीं हो सांगता येत उलगडून, मला कससंच वाटत ते ! ह्या वाटण्यांलाचकां प्रेम म्हणतात ?

विनायक—होय ! तोही एक प्रेमाचाच प्रकार आहे !

सरला—होय कां!

विनायक—मग मला सांग, माझ्यावर तुझं प्रेम आहे कीं नाहीं !

सरला—पण मग, तसा प्रकारच नाहीं. नुसतं, आवड, ममता, दया-माया, कल्याणाच प्रेम वाटत ! तसा प्रकार होत नाहीं.

**विनायक**--चूप, मूर्ख कुठली ! परक्या माणसाशीं तशा प्रकारचं प्रेम म्हणजे पाप आहे समजलीस !

**सरला**--पाप म्हणजे काय ! आणि तें कसं जाणार !

**विनायक**--मी लवकरच तुझ्याशीं लग्न लावलं म्हणजे सगळं पाप जाईल.

**सरला**--पण तशा प्रकारचं प्रेम त्यांच्याशीं आणि लग्न तुमच्याशीं !

**विनायक**--आतां काय करावं हिला ! त्यांच्याशी कोणाशी! मसण्याशी !

**सरला**—इश्य ! म्हणजे दिनकररावांशी !

**विनायक**—चूप बैस ! त्या महाराचा आणि तुझा कांहीं एक संबंध नाहीं. ये म्हणावं आतां बदमाष माझ्या घरीं ! दोन पायाचें चार पाय करून टाकतो. खबरदार, तूं पुन्हां त्याला घरांत येऊं दिलास किंवा त्या हलकटाशीं एक शब्द बोललीस तर !

**सरला**—त्यांची माझ्यावर माया आहे हो ! आमचं एकमेकांच एक-मेकांवर एकप्रकारचं प्रेम आहे हो ! तें चांगलें आहेत. त्यांनीं काय बरं आपलं केलं !

**विनायक**—आणखी काय करायचं बाकी ठेवलं आहे ! घरावर निखा-राच ठेवला नाहीं काय तो ! हरामखोर, बदमाष, गळेकापू ! बस. मी सांगेन तसंच झालं पाहिजे ! खबरदार त्याला येऊं दिलास तर ! आणि कोणत्याही प्रकारचं प्रेम केलंस तर !

**सरला**--( रडूं लागते ) नाहीं हो तो प्रकार थांबवणं माझ्या हातांत ! मला अगदीं खोल खोल हृदयांतून ते आवडतात हो ! नाहीं हो उलगडून समजावून मला सांगतां येत कसें आवडतात ते ! ते अतिशय खरे आणि गरीब आहेत हो ! त्यांना कसं बरं नका येऊं म्हणून म्हणतां येईल मला ! आप्पासाहेब, नका हो रागावूं त्यांच्यावर !

**विनायक**—त्यांच्यावर, त्यांच्यावर, त्यांच्यावर ! तो कोण हरामखोर ! पाजी, दगलबाज ! चल घरीं परत ! आतां त्याच्या त्या बेरडाच्या तर्फेचा एक शब्द बोललीस तर याद राख ! चल हो पुढं ! म्हणे एक प्रकारच प्रेम आहे !

**सरला**--पण तुम्ही तर खरं बोलायला शिकवलं, आतां कांहो रागा-वतां माझ्यावर !

विनायक---चल हो पुढं ! चांगलं अंजन घातलंस !

(जातात.)

---

## प्रवेश चौथा.

(सीन—रस्ता. पात्र--शंभ्या.)

शंभ्या--पिरतीवी म्हंजी जमीन, भुई. कुंभ-म्हंजी मडकं, गाडगं, बामण भोल्याजवळ उतरंड मांडतो त्ये. इदवान-गॅनी. कालेजांत बामन शिकवतो त्यो. ह्यो संमद संसकुत्र शिकनं म्हंजी तोंडांत इंगाळ इस्तू लागल्या वानी व्हतया ! पन करायचं काय ! घरांदारावर नांगर फिरवल्याशिवाय आन ओंभवती केल्याशिवाय मी बामण कसा व्हनार ! ह्यो कोन ! निळकंठराव, सारखा जिबल्या चाटीत पमाबाईच्या नादीं लागला हाय ! ती देतीया ह्येला सारखा गुंगारा ! त्या मशालीच्या मागं हे काजवे लागले हायती. पन त्येकांनों चटका बसल तवा उमगल !

निळकंठ—(प्र. करून) कायरे शंभ्या, बाईसाहेब आहेत कां घरीं ?

शंभ्या—हायती अजून उठल्या नाहींत, निजल्याच हायती !

(प्रभाकर, दिनकर येतात)

प्रभाकर--हा कोण ? अर्र्र्र् हा तर आपला निळू ! आणि कसला एवढा हल्ल्याछाप्याचा बेत ठरवतो आहे ! थांब ! आपण जरा बाजूला होऊं ! काय गौडबंगाल आहे कळून तर दे !

दिनकर--पण कांहीं काव्याचं लचांड करूं नकोस हं ! सांगून ठेवतों आधीं !

निळकंठ--अस्सं ! एकंदरींत काल संगमावर त्यांची जॉली पार्टी होती तर !

शंभ्या--व्हय, आन नावतनं फिरत व्हत्या बगा !

निळकंठ--काय, बोटींग देखील ! मला पत्ता देखील लागूं दिला नाहीं अं ! बरं आहे म्हणावं ! बरं, रात्रीं केव्हां परत आल्या !

असो. एकंदरींत वारा शांत झाला. पूर्वेकडे फटफटलं ! कोंबडे ओरडले, कावळे कोकलले, होडी किनाऱ्यावर लागून, आम्ही सर्व घाटांवर उतरलों.

निळकंठ--मेला कां नाहीं बुडून तसाच ! अहांत खरे बुवा नशिबवान !

दिनकर--भलेबहाद्दर ! मेला ठार हा !

निळकंठ—पण त्या लेडीजचं नांव काय बरं !

दिनकर—त्याची नांव परमेश्वरच जाणें !

प्रभाकर—करायचं काय मला त्यांच्या नांवाशीं ! नुसतां मजा आला संपलं ! शेवटीं पुढं त्यांनीं डबा उघडला, फराळ केला, पोटभर पाणी प्यालों ! नंतर घाटावर बसून नदींत गळ टाकून मासे धरीत बसलों ! संस्कृतमध्यें झष् मारणें म्हणतात. आम्ही आमची मोटार येईपर्यंत झषं मारीत बसलों.

निळकंठ—ताबडतोब तिला भेटून याचा खुलासा करून घेतला पाहिजे.

प्रभाकर—पुढं घाटावर......

निळकंठ—झक मारतोस तूं ! मला मुळींच वेळ नाहीं. ( जातो ).

प्रभाकर—एकदम उखडला बरं का ! त्याला वाटलं, त्याचच कोणी तरी पाखरूं माझ्या होडींत होतं !

दिनकर—कायरे, तुला अशा रोमांटिक फिटस् नेहमीं येतात का ! एखाद्या वेळेस महाकाव्याच्या फिट्समध्यें मला नेमका उतरीव कुठं तरी विहीरींत म्हणजे सुटलास ! कमाल आहे बुवा तुझी !

प्रभाकर—बरं आतां तुझ्या परवानगीनं काव्य करीत जाईन. ठीक चल घरीं आधीं माझ्या काकांना पत्र पाठवू दे ! मी त्यांना थाप मारून, मुंबईस मेडीकल कॉलेज जॉइन केलं, असं दोन महिन्यापूर्वी कळवलं, आणि मी तर इथंच डुबी देऊन बसलों आहे !

दिनकर—भले शाबास ! आहे खरा मुलगा तसा बेदाणा ! मेला कां जिवंत आहेस, हें देखील कळवलं नाहींस ना ! बरोबर आहे ! कामं फार पडली तुम्हांला !

प्रभाकर—तसं नव्हे ! जिवंत आहोंत तोंपर्यंत काय पत्र पाठवायची बरं ! कांहीं कमजास्त झालं तर लपून राहातं थोडच ! कळायचंच केव्हां तरी. ते राहूं दे ! त्या ओल्डफूलचं सध्यां पुराण नको ! पण मला हें आधीं

सांग ! तूं माझ्या हिरॉइनची चवकशी केलीस कां ? काय सांगूं ? तिची आठवण झाली म्हणजे रोमांच उभे राहतात ! हात लावून बघ आंगाला ! बरं बोल चवकशी केलीस का ?

**दिनकर**—सगळी विचारपूस केली. एकाला विचारलं ती कोण ? त्यानं सांगितलं तो परगावचा आहे ! दुसऱ्याला विचारलं, ती काय करते ? तो म्हणाला तिला जन्मांत कधीं पाहिलं नाहीं ! तिसऱ्याला विचारलं, इथलीच राहणारीण कां ? तो म्हणाला कांहीं सांगतां येणार नाहीं. चवथ्याला विचारलं कुठं घर आहे ? तो म्हणाला ठावूक नाहीं ! म्हणून चिडून पांचव्याला एकदम सर्व प्रश्न विचारून बंबार्ड केला ! पहातो तो बहिरा आणि मुका निघाला, म्हणून मुकाट्यानं नाद सोडून दिला ! कां तूं देखील तुझ्या रमणीचा मूक वृत्तांत ऐकून मुका झालास वाटतं ?

**प्रभाकर**—बरं आतां सांगतोस मुकाट्यानं कां चढवूं चार गुद्दे ! हं बोल मुकाट्यानं !

**दिनकर**—अरे चवकशी केली, ठाव ठिकाणा काढला, पण तिनं तुला पत्करलं पाहिजे ना ! नुसती कंबर बांधून काय उपयोग ?

**प्रभाकर**—तें कांहीं नाहीं, बायको करीन तर तीच करीन ! नाहींतर बॅचलर राहीन !

**दिनकर**—अरे, पण तिच्यामागें बरेंच झटताहेत !

**प्रभाकर**—तिथंच तर मजा आहे ! तिच्याबद्दल चार रोमांटिक काव्य देतो चोहोकडे पसरून म्हणजे माझ्याशीं लग्न केल्याशिवाय तिला गत्यंतरच नाहीं. असं करून टाकतो ! माझं काव्य ऐकल्यावर एकजण तिच्या दाराशीं फिरकला किंवा चौकशी केली तर मला विचार !

**दिनकर**—पण बेट्या, उगिचच्या उगिच ! तिच्या अब्रुनुकसानीचा कांहीं विचार ?

**प्रभाकर**—अरे पण मी स्वतः लग्न करून, तिच्या अब्रुचं भांडवल वाढवायला आहेना तयार ! ठीक आहे, चल, आधीं काकांना...ऑं ! काय ? आठवण काढतांच भूत हजर !

**दिनकर**—काय? तुझे काका? हे हे गृहस्थ! काय करील बिचारा? आंतड

आहेना ! आला तांतडीन ! आतां घेणार तुझी चांगली हजेरी ! हातांत सोटा दिसतो !

**प्रभाकर**—काय करावं ! तोंड चुकवून पसार व्हायलाही आतां संधी राहिली नाहीं ! अगदीं तोंडासमोर येतो आहे ! हे पहा, त्यांची तुझी ओळख नाहीं. तूं नुसता होला हो कर ! म्हणजे मी नेतो सगळं निभावून !

**दिनकर**—घाल खड्यांत मला म्हणजे झालं ! कायरे बाबा, काय विचार तरी काय आणला आहेस मनांत !

**प्रभाकर**—मी सांगेन सगळं नंतर तुला ! अर्‌र्‌र्‌ हे आलेच ( दामूआण्णा येतो. प्रभाकर नमस्कार करतो. )

**दामूअण्णा**—कायरे, काय मांडलं आहेस तूं हे ! दोन महिन्यांत पत्र नांहीं ! काय आहे काय हे !

**प्रभाकर**—कालच औरंगाबादेहून आलों ! आज निघणार होतो तुम्हांला भेटायला !

**दिनकर**—शुद्धीवर आहेस ना !

**दामूअण्णा**—मी तर ऐकलं तूं इथंच आहेस !

**प्रभाकर**—छे, छे, औरंगाबाद, दौलताबादेहून हे मी नुकतेच दोन दिवसांपूर्वीं आलों ! ह्यांची आपली थोडी ओळख करून देतो ! मी वेरुळची लेणी पाहायला गेलों होतो. तिथं यांची माझी प्रथम भेट, ओळख झाली. फकीराबादेजवळ एक बोंबिलाबाद म्हणून गांव आहें ! तिथले हे नबाब आहेत !

**दामूअण्णा**—अस्सं !

**प्रभाकर**—यानां मोगलाईत हिज हायनेस् दि नबाब दुमहिलावखां डरपोक यार जंग बहाद्दर ऑफ बोंबिलाबाद असं म्हणतात ! पूर्वीचे मुळा-मुठा निवासी महाराज ऑफ भांबुर्डा, यांचे परम स्नेही ! त्यांचं स्टेट खालसा झाल्यामुळं त्यांनीं आतां विटांचा कारखाना मुळामुठेच्या काठीं काढला आहे!

**दिनकर**—गाढवाच्या लेका, तूं मांडलास काय माझा विचका !

**दामूअण्णा**—ओ. आय ॲम ग्लॅड टुसी यूवर हायनेस दुमहिलावखां !

**दिनकर**—ओ थँक्यू !

**प्रभाकर**—भयंकर श्रीमान ! पण एखाद्या माधुकऱ्याच्या तोंडांत मार-

तलि अशी साधी रहाणी आहे ! चार महिन्यापूर्वी, हे राउंडटेबल कॉन्फरन्सहून आपल्या बोंबिलाबाद जहागिरीवर परत आले. ह्यांची तिकडे फार वाहवा झाली.

**दामूआण्णा**--कुठं !

**प्रभाकर**—विलायतेंत ! आतां इथं सुरु झाली आहे !

**दामूअण्णा**–ओहो, वेल. नबाब दुमहिलाव, मग राऊंडटेबलचं काय झालं!

**दिनकर**—बहोत अच्छा हुवा ! रौंड होगया !

**प्रभाकर**--वाटोळं झालं म्हणतात !

**दामूअण्णा**—हिंदुस्थानविषयीं तिथं मुख्य महत्त्वाचे प्रश्न कोणचे सुटले!

**दिनकर**--माशा अल्ला ! क्यां पुछते हो ! अंग्रेज बडा कदरदान है ! व्हेरी कोर्चस, बॉल थे, डॅन्स थे, डिनर्स थे ! खूप खाये, पिये, रंग मचाये, और लंडनपर परिंदेके माफक दो महिने उडते थें ! क्या कहूं ! याद आती तो होष बिगड जाते है !

**प्रभाकर**--फारच महत्त्वाचे प्रश्न सोडवले तुम्ही तिथं एकंदरींत !

**दिनकर**—ओफ ! आदमी है या हैवान हैं येबी ख्याल उडगया ! ऐसी लेडीयोंकेसाथ पिये, कुदे, और रंग जमाये ! कुछ पुछो मत ! आखर हम आपसमें ऐसें लडपडे, ऐसी धुम मचाये, ऐसी मारपीट करे, ऐसे झगडे मचाये, आंग्रज तो साले देखकर चक्रगर्दूम होगये ! बस, लढपडे, मरपडे, कुदपडे !

**प्रभाकर**--शेवटीं राहिलेलें तंटे हिंदुस्थानला भांडायला लाथ मारून हांकून दिलं यांना ! केवढा भयंकर प्रश्न सुटला हिंदुस्थानचा हा !

**दिनकर**—बेशक ! और इसलीये, हिंदुस्थानके, गोरगरीबोंके, पचास लाख रुपियोके पतंग उडगये !

**दामूअण्णा**—कायरे, यांना मराठी मुळींच येत नाहीं !

**प्रभाकर**—समजतं फार चांगलं ! पण बोलणं मराठी अगदीं घेडगुजरी ! संवय नाहीं !

**दामूअण्णा**—बरोबर आहे ! कायरे, तूं म्हणे इथं कांहीं लग्नाच्या भानगडींत आहेस ! काल म्हणे कुठं बोटिंगला होतास ! मला इतक्यांत निळकंठरावानं सांगितलं !

**प्रभाकर**—काय ! मी ! बोर्टिंग ! निळकंठरावानं सांगितलं !

**दामूअण्णा**—तूं म्हणे, मध्यें बगदादला गेला होतास ! अरे मला कळवायचं तरी !

**प्रभाकर**—मला तरी वाटलंच ! निळकंठरावाचं काम असलं पाहिजे !

**दामूअण्णा**—कां बरं ! असं वाटण्याचं कारण ! अत्तां तुझी भेट होण्यापूर्वींच सांगितलं !

**प्रभाकर**—आतां हे प्रत्यक्ष नबाब दुमहिलाव, साक्षीदार होते म्हणून बरं ! तुम्ही यायच्या आधींच, त्याचा माझा खटका उडाला ! भयंकर थापेबाज तो मनुष्य ! त्याच्या संगतीनं माझी बेअब्रू, नाचक्की होऊं लागली ! हातच्या कांकणाला आरसा कशाला ! अहो कुणीकडे संगम, कुणीकडे बोर्टिंग ! कुणीकडे बगदाद !

**दिनकर**—यस, बिलकूल डोका फिरला !

**प्रभाकर**—नदींत गळ टाकून मासे धरीत बसलों म्हणून म्हणालाना !

**दामूअण्णा**—हो हो, म्हणाला खरंच ! तूं म्हणे त्याला कांहीं घाटावरची हकीकत सांगणार होतास !

**प्रभाकर**—काका एक शब्द खरा नाहीं ! यानांच विचारा !

**दिनकर**—नाट ए वर्ड खरा ! बिचारेका कैसा होगार तो पहावा ! तुमाला बिलकुल झुटा बोलला ! थोडा डोका गेला !

**प्रभाकर**—गेलं नाहीं, आहे खांद्यावरच ! पण भयंकर खोटं बोलण्याची सवयं ! तें कांहीं मुद्दाम म्हणूनच नाहीं ! संवयच !

**दिनकर**—हां हॅबिट् !

**दामूअण्णा**—हें खोटं असलं तर उत्तमच ! पण मला विचारल्याखेरीज आतां तुझ्या लग्नाच्या बाबतींत कोणतीही गोष्ट करायची नाहीं, सांगून ठेवतो. तुझा पूसतपास करायच्या करतां आणि तुझ्या लग्नाच्या कामांकरीतां मी मुद्दाम इथं आलों आहे, समजलास !

**प्रभाकर**—ठीक आहे ! आतां थोडिशी, हिज हायनेस यांची एके ठिकाणीं एंगेजमेंट ठरली आहे, तेव्हां त्यांच्याबरोबर जाऊन, येतोच तुमच्या भेटीला ! तुम्ही उतरलांत कुठं ?

**दामूअण्णा**—दिवाण बहादूर सुवर्णचुंबक.

प्रभाकर—ठीक आहे. भेटतो येऊन तिथं ! मग सगळं बोलूं !

दामूअण्णा—ठीक ! वेल, आय टेक युवर लीव्ह ! युवर हायनेस दुमहिलावखां ! तुमचं संस्थान कसं काय ?

दिनकर—ओ, बोंबिलाबाद स्टेट ! सिंपली फ्लारिशंग, बहोत जोषमे हैं ! नो प्लेग-ऑर कॉलरा ! ओ नो, सब गांव शराबसे घोलवाकर, साफ कर दियां हूं ! सब किडे रोगकें मरगये !

प्रभाकर—आतां माणसंच पिऊन किडयासारखी झाली आहेत !

दामूअण्णा--ठीक आहे, येऊन भेट काम आटपतांच ! गुड डे, गुडडे ! ( जातो. )

दिनकर—आदाब, बंदगी, सलाम, तसलीमत !

प्रभाकर—अहो, पुरे कीं शेपूट हालवणं आतां !

दिनकर--अहो, भांबुडर्यांचे महाराज !

प्रभाकर—काय म्हणतां हिज हायनेस, बोंबिलाबाद !

दिनकर--हा कोपरापासून नमस्कार तुझ्या महाकाव्याला ! आतां मला थोडस उर्दू येत होत म्हणून निभावून नेलें, नाहीं तर मेला असतास कीं नाहीं ! आणि म्हणणं इतकंच कीं या शरणागताला, आतां मरण नसावं ! ( सांष्टांग नमस्कर घालतो. )

प्रभाकर—अगदीं गरुडासारखा हात जोडून, उभा राहिला आहेस पुढं !

दिनकर---वरदान मागतो आहे.

प्रभाकर---पण काय ?

दिनकर--या उप्पर तुमचा माझा या जन्मीं संबंध नसावा !

प्रभाकर--चल बेट्या, असं कुठं झालं आहे ! ब्रदर कामरेड, वुइ आर वन टिल डेथ ! मरेतों पर्यंत तंगडींत तंगडी !

दिनकर--हं, मग होणार या जगांतून लवकर माझी उचलबांगडी. ( जातात. )

**सरला**—होय कां ! तर मग आणखी घ्या ! तुमचं पोट भरलं, तुम्हांला बरं वाटलं, म्हणजे मला देखील बरं वाटतं हो !

**दिनकर**—कितीही सेवन केलं, तरी तृप्तीच होऊं नये असाच हा अवीट पदार्थ देवानं निर्माण केला आहे ! सरले तूं माझी होणार ना !

**सरला**—पण मी तुमचीच आहे ना !

**दिनकर**—पण माझ्यावर प्रीती आहे ना !

**सरला**—नाहीं !

**दिनकर**—मग काय ! माया आहे !

**सरला**—नुसती दया, माया आवड आहे. इतकंच नव्हे, जे कधीं मला तुमची गांठ पडेपर्यंत वाटलं नाहीं, असं एक प्रकारचं प्रेम वाटून कससंच होतं ! आणि ते देखील, एकटं तुम्हांला पाहिलं म्हणजेच वाटतं ! कांहो असं वाटतं !

**दिनकर**—अस्सं, सांग पाहूं, कोणत्या प्रकारचं प्रेम वाटतं !

**सरला**—पहिल्यांदां कीं नाहीं, तुम्हांला पाहिलं म्हणजे मला भारी लाज वाटून, अंगावर शहारे येत. पण आताशा मात्र देवापाशीं कसं वाटतं, तसं–तुमच्याजवळ मुळींच लाजूं नये असं वाटतं ! नेहमीं सांगाल ते ऐकावं, जवळ प्रहरनप्रहर बसावं, बोलावं, हांसावं, हे पाहा कीं नाहीं जसें तुम्ही आणि मी अगदीं, अगदीं एकच आहोंत असं वाटतं ! तुम्हांला देखील माझ्या बद्दल असंच वाटतं कांहो !

**दिनकर**—होय ! लाडके, मलाही अगदीं असंच वाटतं ! ह्या चमत्कारिक वाटण्यालाच, प्रेम, प्रीती म्हणतात !

**सरला**—आभाळांतल्या ढगांत कशी एकदम विज चमकते. ती कुठून हो त्या ढगांत शिरतें ! तसंच हें प्रेम, प्रीती काय आहे ! कुठून येते ! आणि हृदयांत कशी शिरते हो !

**दिनकर**—ती प्रथम डोळ्यांतून शिरते.

**सरला**—खरचं ! तुम्हांला मी प्रथम पाहिल्यावर डोळ्यांतूनच शिरली. पुढं डोळ्यांतून कुठं जाते हो !

**दिनकर**—ती ओठांत जाते !

सरला--तरीच माझे ओठ देखील, कसे कांपू लागले होते ! आठां-तून कुठं जाते हो !

दिनकर—ती हृदयांत येते !

सरला—खरचं बाई, त्या वेळेस कसं हृदय धडकी भरल्यासारखं झालं होतं, पण मला बरं वाटलं हो !

दिनकर—अहाहा, हिला एखादं हरीण बालक म्हणूं कीं कोंकरूं म्हणूं. निर्मल प्रेमाची, भोळेपणाची, ममतेची सद्गुणाची खाण म्हणूं ? मला कांहींच समजत नाहीं !

**पद**

**प्रेमी जीवा जिवाच्या देवा । परम विमल बघतां, कमल वदन, स्फुरवि भावा ॥ धृ०॥ मम सौख्याचा मंगल ठेवा पाहुनि, । करतिल वाटे अमरही माझा हेवा ॥ १ ॥**

तुला कुठं ठेवूं असं मला झालं आहे ! या निर्मल प्रेमानं कोण विरघळून जाणार नाहीं.

सरला—मला कीं नाहीं, आताशां तुमच्याशिवाय मुळींच जिवाला चैन पडत नाहीं हो ! आणि आप्पासाहेब तर रागवतात माझ्यावर ! तुम्ही आलेल कळलं म्हणजे, मग कसं बरं करायचं ! त्यांना तुम्ही दृष्टीसमोर इथं जर-दिसलांत, तर काय करतील काय नाहीं, तें देवाला ठावूक ! मला इथून तुमच्या घरीं नाहीं काहो नेता येणार !

दिनकर—मी रात्रंदिवस त्याच विचारांत आहे मी सर्व योग जुळून आणून नंतर तुला घेऊन जाईन ! पण ऐन वेळेस घाबरून तूं माघार घेणार नाहींस ना ?

सरला—छे, मी आनंदानं धांवत येईन. तुम्ही कीं नाहीं मला देवासारखे वाटतां ! देवानं सांगितल तर कोण बरं मोडील ! पण न्यायाची गड मला तुमच्या घरीं ! मनांतून, तुम्ही जावं, असं नाहीं वाटत ! तरी पण अत्तां आप्पासाहेब यायची वेळ झाली, म्हणून सांगते. आतां जा बाई तुम्ही घरीं लवकर नी बेत ठरवा !

**दिनकर**—ठीक आहे ! मी जातो ! आणि समक्ष संधी साधून किंवा युक्तिनं पत्र तुझ्या हातीं पडेल नेमकं अस करून, तुला पुढं कसं काय करायचं ते कळवतो येतो तर.........

**सरला**—कसं बरं तुम्हांला मी जा म्हणून सांगेन ? पण काय करूं, तुम्हांला आप्पासाहेब फार बोलतील हो !

**दिनकर**—सरले, जाण्याच्या आधीं, तुझ्या हातासारखा गालाचा दे !

**सरला**—मग घ्यायचा हो ! मी तुम्हांला नाहीं का म्हणेन ? देवाजवळ कोण बरं लाजेल ? हं घ्या ! तुम्हांला बरं वाटतं, त्यांतच मला बरं वाटतं हो !

**दिनकर**—सरले थांब ! ह्या, पावित्र्याच्या ह्या निर्मळ प्रेमाच्या देवतेला जर मी अशुद्ध मनानं स्पर्श केला, तर परमेश्वर मला केव्हांही क्षमा करणार नाहीं. तुझ्या पावित्र्याची साक्ष, परमेश्वर देखील देईल. तुझ्या निर्मलतेची साक्ष, लहान हांसरी मुलं देखील देतील ! पुरे, मला तुझ्या हाताचं चुंबन पुरे ! तसं चुंबक परमेश्वराचा आशिर्वाद मिळाल्यावरच घेईन.

**सरला**—पण आतापर्यंत हाताचं चुंबन घेतलं त्याला नाहीं ना देव रागावणार ?

**दिनकर**—मला वाटतं नाहीं रागावेल अस ! या वेळेस मी मनाच्या, अत्यंत पवित्र आणि उत्कट भावनेनं तुझ्या करकमलाचं चुंबन घेत आहे. म्हणून नाहीं रागवणार !

**सरला**—मग घ्या तर ! (तो चुंबन घेतो)(जाऊं लागतो,) थांबा गडे ! मला देखील तुम्ही करतां तसं केलं म्हणजे बरं वाटतं हो ! (इतक्यांत आवाज होतो.) अगबाई, अप्पासाहेब आले वाटतं ! जा गडे लवकर ! त्यांनीं जर तुम्हांला पाहिलं, तर डोक्यांत कुऱ्हाड घालतील हो ! तुम्हांला बरं वाटणार नाहीं म्हणून मी तुम्हाला सांगितलं नाहीं ! पण ते भारीच रागवतात हो तुमच्यावर ! माझ्या डोक्यांत कुऱ्हाड घातली तरी चालेल, मला नाहीं त्याचं वाटणार ? पण तुम्हांला एक शब्द रागावून बोललें म्हणजे मला बरं वाटत नाहीं हो ! (आंतून-सरले, सरले म्हणून हाक मारसात.) आले हो आले ! जा गडे लवकर !

**दिनकर**—सरले, तुला असं संकटांतून सोडून मी तरी कसा जाउं ?

**सरला**—जा गडे ! मी तुमच्या पायां पडते ! मला तुमच्या घरीं

लवकर न्यायची बरं कां ! मला तुमच्या शिवाय जिवंत राहणं देखील बरं वाटत नाहीं हो ! जा गडे लवकर ! मागच्या दरवाज्यानं (दिनकर जातो). आले हो आले ! मी कीं नाहीं अगदीं रडकुंडीस आले आहे बाई ! आपल्या देवाशिवाय काय बरं दुसऱ्याशीं बोलायचं ! आले हो आले ! ( जाते ).

---

## प्रवेश सहावा.

[ सीन—रस्ता. पात्रें—विनायकराव, दिनकर. ]

**विनायक**—शृंगार लालडी, रोमांटिक सोन तुकडी ! एज्यूकेटेड छब-कडी, नको–म्हणून ह्या सरलेला सार खरं, बरं, दया माया, आवड वगैरे केवळ अत्यंत सद्गुणाचं एकांगी शिक्षण देऊन तिला, तुरट, खारट, तिख-टाची दुसरी बाजू अजिबात कळूं दिली नाहीं. पण हें सर्व लचांड माझ्या गळयांत येऊन नेमकं उतरायचा रंग आला आहे !—

**पद.**

**प्राण हरण करी जगीं ज्ञान हें । जरि एकांगी पढविलें ॥ धृ० ॥ भस्म विलेपित अग्नि असतां । करि दहन जरि पद पडतां ॥ सत्या मिथ्या करुनि तुलना । ज्ञान सुखद हो जरि मिळविलें ॥ १ ॥**

—आज दहा वर्षं, रात्रंदिवस खटपट करून, जोपासना करून झाड वाढ-वलं मी ! आणि आयत्यावेळीं त्याची फळं पळवायला तो हरामखोर हजर ! म्हणे मला बरं वाटते हो ! थोबाड फोडून टाकतो ! त्या हरामखोरानं माझं घर म्हणजे धर्मशाळाच केली आहे ! निसटला लेकाचा आतां ! नाहींतर नारळीच्या झाडाइतका जमीनींत खोल पुरून टाकून कायमचा बंदोबस्त करून टाकला असतां ! तें कांहीं नाहीं ! आतां निकरावर आलं आहे ! एकवेळ शहानिशा लागलाच पाहिजे ! घरांतलं नावं आप्पासाहेब आणि बाहेरचं नांव विनायकराव. तसंच बदललेलं बिऱ्हाड यामुळं सगळीं गल्लत उडाली; आतां घरांत त्याची नी माझी दृष्टादृष्ट झाली असती म्हणजे सम-जलं असतं हा विनायकराव कोण तें ! हा कोण ! होय ! तोच तो ! ठीक आहे ! आपण आतां मागमूस लागूं न देतां, ह्याचा पुढचा बेत काढून

घेऊन, हा समंध कायमचा जमीनींत गाडून टाकला पाहिजे ! मी मेलों ओझ्याखालीं ! आणि साखरेची गोणी पटकावली या महारानं !

( दिनकर येतो. )

**दिनकर**—ओहो ! कोण विनायकराव ? म्हणजे तुम्ही इकडे कुणीकडे ? तुमची आमची प्रथमपासून शेवटपर्यंत गांठ याच ठिकाणीं पडायचा योगायोगच आहे कीं, काय ? अहो, तुमच्या घरीं हेलपाटे मारायचे तरी किती ? जेव्हां पहावं, तेव्हां आपलं घराला कुलुप ! दुसरीकडं कुठं बिऱ्हाड बदललं कीं काय ?

**विनायक**—छे छे, त्याच घरीं आहे. दिवसभर कामामुळं बाहेरच असतो, रात्रीं केवळं पडायला तिथं जातो. म्हणून गांठ पडली नाहीं ! बरं पण तुमच्या शिकारीचा प्रोग्राम कुठंवर आलां आहे !

**दिनकर**—ते काय विचारतां आणि काय सांगूं तुम्हांला !

**विनायक**—म्हणजे ! मी नाहीं समजलों !

**दिनकर**—अहो त्या सावजावर दोन शिकारी टपले आहेत ! आतां इतक्यांत त्याची माझी चांगली जुंपायची वेळ आली होती. पण काय करूं, त्या बिचाऱ्या सरलेच्या विनवणींमुळं मला पाय काढावा लागला. तो कोण, तिचा आप्पासाहेब का मसण्यासाहेब, तो हालकट, एकवेळ दृष्टिस पडायलाच पाहिजे होता !

**विनायक**—मग ! घोटाळा झालां म्हणतां !

**दिनकर**—काय सांगूं? भेटला असतां, म्हणजे पायातला काढून, त्याचा ब्रह्मघोळच सपवला असता ! तो महार, आतांशा तिला भयंकर छळतो म्हणे!

**विनायक**—पण तुम्ही एकादी हिकमत लढवून टेवली कीं नाहीं.

**दिनकर**—मी त्याचा बाप लागून गेलों आहे म्हणा !

**विनायक**—( कोणकुणाचा बाप होतो ते समजेल रामोशा तुला ) मग काय ! युक्ती योजली आहे !

**दिनकर**—बघा कसं जुळवतो तें ! तो कोण मसण्यासाहेब आहे ना ? त्याचा एखादा जॉली दोस्त शोधून काढतो !

**विनायक**—बरं पुढं !

**दिनकर**—आणि त्या जॉली दोस्ताच्या मार्फत, एका रिकाम्या घराच

चत्ता देऊन मेजवानीला बोलावतो ! मग काय ! अशी मेजवानी झोडतो. पहातच रहा म्हणावं ! लाथा, बुक्या, चपराक, ठोसे, गुद्दे, जोडे, खेटरं, कानमुरड, चापटपोळया, मुष्टीमोदक वगैरे पक्वान्नाची चंगळ उडवून ऐस आग्रहान वाढतो कीं खातां खातां बेट्यानं डोळे पांढरे केलें पाहिजेत !

विनायक—( मी मेजवानी झोडतो कीं त्याच पाटावर तुझे पितर आणून बसवतो, तें कळेल बेटया तुला ) बरं, पुढं काय जमविणार काम.

दिनकर—पुढं काय ! चार दिवस त्याच घरांत कोंडून घालून, त्या अवधींत माझ्या सरलेला घेऊन मुंबईला पसार कीं लग्न लावून मोकळा ! बैस म्हणावं लेका ! मग जन्मभर चांगला ठणाणा करीत !

विनायक—कायहो, पण ती कोण सरला, ती तुमच्या बरोबर पळून जायला तयार होईल म्हणतां ?

दिनकर—अलबत ! अहो मी सांगितलं तर पेटलेल्या आगीच्या झोतांत उडी घालील ! नाहींतर प्रेम कसलं आमचं ? उभयताच !

विनायक—( ठीक आहे बच्चाराम, बघशील लेका, तुझी मी होळी पेटवतो ती ! ) मग आहे बुवा तुमचं प्रेम ! आहांत बुवा वस्ताद खरेंच तुम्ही !

दिनकर—तसं नव्हे. तिचं जर त्याच्यावर प्रेम असतं, आणि मी जर बिब्बा घालायला गेलों असतो, तर मग मी अपराधी ! पण देव आणि भक्त. यांच्यासारखे, प्रेमानं आम्ही एकजीव झालों असतां, त्या चांडाळानं तिचा छळ सुरू केला. म्हणून माझ्या आंगाचा कसा संतापानं तिळपापड झाला आहे !

विनायक—मी देखील सांडग्यासारखा तळून निघालों आहे !

दिनकर—अहो प्रेम कुठं हुकुम पाळतं का ? बात झूट आहे ! त्या गाढवाला एवढं देखील कळू नये का ! जिचं आपल्यावर प्रेम नाहीं, तिला बायको करून काय करायचं ? ज्या देवळांत देव नाहीं ते देऊळ काय उरावर घ्यायचं ? ज्या शरीरांत प्राण नाहीं, त्या प्रेताला काय कवटाळायचं ! जाऊं द्या झालं ! त्या डुकराला काय कळणार हा वेदान्त ! बाकी कायहो ! तुम्हांला नाहीं अचंबा वाटत ? त्या गाढवाचा !

विनायक—( तूं सात गाढव ) हंसतो.

**दिनकर**--कायहो, तुम्ही नुसतेच हंसता ! तुमचं मत नाहीं सांगितलं ?

**विनायक**--( गाढवाचा लेक माझी कबुली मागतो आहे ) नाहीं ! रुची आणि मतं भिन्न असतात !

**दिनकर**—अहो, वर्फी आणि शेण, यांच्या रुचित मतभेद कां व्हावा ? बाकी, त्या डुकराला दोन्हीं एकच म्हणा ! पण तुम्ही तरी मत सांगायला पाहिजे होतं ! बाकी, आमच्या मेजवानीचा बेत तुम्हांला पसंत आहे कीं नाहीं ?

**विनायक**—( हांसतो ) अरे हरामखोरा ! बघतो कोण कुणाला देतो ते!

**दिनकर**--त्या रिकाम्या घरांत, पक्वान्नावर पक्वान्नाची वाढपं सुरू झाली, मग कशा ढेकरां देईल त्याचा आवाजदेखील या कानांत घुमू लागले ! लाथा गुद्दे, ठोस्साचे लाडू त्याच्या घशांत जबरदस्तीनं कोंबतांना कसे चेहरे होतील, याचा तर सिनेमा, माझ्यासमोर दिसूं लागला ! कायहो, तो खेटरं खात असतांना काय गंमत होईल, याची कल्पना मनांत येऊन, तुम्हांला नाहीं हांसू लोटत ? मला तर तो जन्मांत न पाहतां मूर्तिमंत डोळ्यासमोर उभा राहीलासं वाटतो ! मला हांसू आवरतच नाहीं, तुम्हांला नाहीं हांसू येत ? मनापासून नाहीं हांसत तुम्ही ?

**विनायक**--छे, छे, मनापासून येतं ! ( अरे वेरडा, हालकटा रामोशा !)

**दिनकर**--ठीक आहे ! भेटेन पुन्हां ! बाकी आमचा हा घुशीचा सांपळा फक्कड आहे कीं नाहीं ? त्या घराच्या सांपळ्यांत, त्या मसण्यासाहेबाची घूस अडकली म्हणजे काय धडपड करील हो !

**विनायक**--होय, होय ! सांपडली पाहिजे ना पण ?

**दिनकर**--अहो, आतां त्याची काळजी नको ! अहो, घूस धरतांच धांवत येतो तुम्हांला सांगायला ! कीं घूस धरली ! आणि तुमच्या समक्ष पोत्यांत घालून सोडग्यानी चांगली चेचतो, कशी केकाटेल ती गंमत दिसेलच आपल्याला ! बरं आहे ! अगदीं गुप्त असूं दे ! [ दिनकर जातो.]

**विनायक**—अरे रामोशा ! त्या सांपळ्यांत माझी घुस पडते कीं मी तुझं मुंगुस अडकवतो, तें समजेल तुला ! [ जातो.]

**अंक २ रा समाप्त**

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ सीन—विनायकरावांचे घर. ]

श्रीखंड्या—ये अनु ! डार्लिंग ये ! यावेळेस कीं नाहीं, मी अगदीं जॉली आहे !

पद.

**अनपूर्णे माझें डार्लींग । तुज गुडमॉर्निंग । तव ब्यूटी कितीही चार्मिंग । नच ठेवी मजला हँगिंग । व्यर्थची वेटींग । म्हणा करूं ये चल एम्ब्रेसिंग ॥ ध्रु० ॥ मम प्रेम तुजवरी राईजिंग । ओव्हर फ्लोईंग, । चल करुं ये जगती फ्लटींग ॥ १ ॥ चल येई करूं गे कोर्टींग । वीलींग, कुईंग । प्रेमाचे रेकॉर्ड ब्रेकिंग ॥ २ ॥**

ये ! अगदीं लाजूं नकोस !

अन्नपूर्णा—इशः हे हो काय मेलं सोंग ! मला म्हणाले, मी कपडे घालतो आणि तूही चांगलं लुकडं नेस ! आपण म्हणे सिनेमाला जाऊं ! आणि बघते तों अगदीं माकडासारखा शृंगार करून सजले आहेत ! अशा पोषाखांत मी साफ तुमच्याबरोबर यायची नाहीं !

श्रीखंड्या—अनु ! तूं मोठमोठ्या अब्रूदार, घरंदाज, अधिकारी पेनशनर, सुधारक आणि लिबरल पार्टीच्या लोकांचा अपमान करते आहेस ! ते काय वेडे आहेत काय ! शंभरातले पाऊणशें टक्के, ते लोक, अशाच थाटाचा पोषाख करतात ! ते काय सगळे हरामखोर, लोक आहेत होय ! ते काय देशद्रोही आहेत काय ! ते काय बे अक्कल लोक आहेत ! मला शहाणपण शिकवते आहे !

अन्नपूर्णा—अहो, पण तुम्ही कोणत्या जातीचे ! कोणत्या धर्माचे ! कोणत्या देशाचे ! कोणत्या आईबापाचे ! कांहीं मुद्दा पत्ता नको कां

समजायला ? तुम्हांला कोणची उणीव वाटली तुमच्यांत ! कां तुम्हांला जात, धर्म, देश, आईबाप ठाऊकच नाहीं, म्हणून हा साहेबी पोषाख केलांत ! काय बाई सोंग हे मेलं ! टांग्याला जसं घोड जुंपतात, तसं अगदीं खोगीर, जीन, लगाम, पायबंद, डोळ्याला झापड लावून तगडवंद झाला अहात ? कशाला ह्या लंगोट्या नरड्याला आवळून, मोहरमातलं सोंग झालांत ! मी म्हणते अगदीं जुन्या चालीरितीचा पोषाख नको ! बदलेल्या काळाप्रमाणं, सुधारणा पाहिजे. कबूल ! पण कोट, टोपी, सदरा, रुमाल, धोतर, उपरणं वाटेल ते वापरलं ! तर नाहीं कां चालणार ! आपल्या पोषाखावरून निदान आपण हिंदुस्थानातले हिंदुधर्मांचे लोक आहोत, असं जर दुसऱ्यांनीं ओळखलं, तर त्यांत अपमान आणि लाज कां वाटते ! हा हो काय एखाद्या अमेरीकन, जर्मन किंवा पॅरीस, लंडनमधल्या भंग्याचा पोषाख ! तुम्हांला विलायती भंग्यापेक्षां ब्राह्मण म्हणावयाची लाज वाटते होय !

**श्रीखंड्या**—अन् ! तोंड अटप ! चुकते आहेस ! मोठमोठे मिनिस्टर झालेले, विलायतेहून आय, सी, एस. होऊन आलेले, जर्मनीतून, अमेरीकेतून आलेले, मोठमोठ्या हुद्यावरून पेनशन घेतलेले, बहुतेक हिंदु लोक, अशाच थाटाचा पोशाख करतात ! ते सगळे विलायती भंगी आहेत होय !

**अन्नपूर्णा**—अहो, त्या विलायती भंग्याला मी दाहनदां नमस्कार करीन ! पण जो हिंदु आपल्या जातीचा, धर्मांचा, आपल्या देशाचा अभिमान सोडील ! तो आय, सी, एस. असू दे कीं, मिनिस्टर असून दे, कीं गव्हर्नर होऊं दे, मी त्याला विलायती भंग्याइतकी देखील किंमत देणार नाहीं ! तुम्ही पाहिजे तर हिंदुस्थानातल्या भंग्याचा पोषाख करा, मी तयार आहे, तुमच्याबरोबर सिनेमाला यायला ! फार झालं तर लोक म्हणतील, कुणीतरी हिंदु वेड्याच्या जपणूकीला, अन्नपूर्णेनं नोकरी धरली आहे म्हणून !

**श्रीखंड्या**—अने ! पण या माझ्या सारख्याच पोषाखांत नटून, शेंकडों फिरायला जंटलमन, तुझ्याहीपेक्षां शतपट सुंदर नटलेल्या तरुणी घेऊन, हिंडायला, नाटकाला, सिनेमाला जातात ! आणि त्यांच्याजवळ, माझ्या सारखेच हुप्पे बसलेले असतात ! तुझ्यापेक्षां देखील अगदीं गरीब गाई, अगदीं साविञ्या, शेकडों ठिकाणीं बूट, पाटलोण, नेकटॉय, कॉलर, हॅटवाल्या

हुप्पाशीं गुल् गुल् गोष्टी करतांनां मी पाहिले आहेत ! मग तुलाच निभावून न्यायला काय होत माझ्याशी ?

**अन्नपूर्णा**—ज्या निभावून नेत असतील, त्या देखील त्या हुप्पा इतक्याच, कवडी किंमतीच्या आहेत ! दुधखुळ्या आहेत, बावळ्या आहेत ! आम्ही बावळे परधारजीणे, हुरळलेल्या मेंढीसारखे, म्हणून तर जगांत आमचा फजितवाडा झाला आहे ! म्हणे आमच्यातले मोठमोठे असेच वाली सुग्रीव होतात ! आज दिडशे वर्षे इंग्रज तुमच्यावर कसा कां मिळवीना राज्य करतो आहे ना ! मग त्याच्यातला कां हो नाहीं, कुणी गव्हर्नर व्हॉईसराय पगडी, उपरणं, धोतर नेसून बसला ! अहो एक तरी साहेब, आमच्या हिंदी पोषाखांत मिरवतांना पाहिलात कां ! मासाल्याला तरी आढळेल कां ! अहो, तो कमालीचा देशभक्त आहे. मेला तरी आपल्या देशाचा अभिमान, तो सोडायचा नाहीं ! अहो, तसं नसतं तर दहा हजार कोसावरून, राज्यच करतां ना, इतका पराकाष्ठेचा देशाभिमानी इंग्रज, त्याच्या समोर असल्या या पोषाखांत मिरवणाऱ्या, आमच्या हिंदी धेडगुजऱ्याची तो काय किंमत ओळखीत नाहीं म्हणतां–होय ! आपलेपणाचा अभिमान सोडलेल्या, तुमच्यासारख्या त्रितीय पंथी लोकांना, तो आपल्या सडक्या बुलडॉग इतकीही किंमत मनांतून देत नसेल ! पितळ, कथील कां झाकून राहिलं आहे सोनारापुढं ?

**श्रीखंड्या**—अनु ! तूं मोठा देशाभिमान, धर्माभिमानाचा मक्ता घेऊन मला तुझ्या बोधामृतांत घोटून काढते आहेस ! माझी टर उडवते आहेस ! पण मी आतां जर तुझी शोभा केली, तर मग मात्र नाक फुगवशील ! काय ग ! एवढा तुला धर्माचा अभिमान होता, तर मग तुझं हे असं झालं असतांना, मग माझ्याशी हे कसं ?

**अन्नपूर्णा**—अहो माझं हं असं हं मी केलं नाहीं ! तिकडं तसं झालं म्हणून इकडे अस्स झालं ! समजलं ! असं झाल्यावर, असंच मरेतों रहावं असं कांहीं आपल्या धर्मात सांगितलं नाहीं ! वाटलं तर रहावं नाहीं तर पुनर्विवाह करावा ! त्यांतून मी कांहीं इंग्रज, पारशी, मुसलमान पाहिला नाहीं ! चांगला माझ्या जातीचा, धर्माचा, देशाचा ब्राह्मण वर नेमस्त केला आहे ! यांत लाजायसारखं, नाक खालीं होण्यासारखं काय आहे ! आपल्या

मुलाचं दुसरं लग्न करतांना, जितका बाप झटतो, तितकंच त्यापेक्षांहि जास्त कळकळीनं मुलीचा पुनर्विवाह जुळविण्याकरतां, जर आईबाप झटले नाहींत, तर कांहीं दिवसांनीं मी सांगते, ब्राह्मणाची जातच हिंदुस्थानांतून नाहींशी होईल ! पुनर्विवाह करणं, इंग्रजी शिकणं, सुधारक म्हणवणं, म्हणजे जात, धर्म, आणि देशाभिमान याच्याशीं बेइमानी, हरामखोरीच करावी लागते, असं नाहीं ! ( तो हंसतो. ) दांत काय काढतां ! माझी शोभा होण्यापेक्षां, तुमची शोभा झाली ! तुम्हांला साफ सांगते, अस्से वाली सुग्रीवाचे चाळे, तुम्हांला करायचे असतील, तर साफ मी तुमच्याशी पुनर्विवाह करायची नाहीं ! तुमचा माझा या क्षणापासून, कांहीं संबंध नाहीं ! ही मी चाललें, खुशाल दुसरी मडबीण बघा ( ती जाऊं लागते.)

**श्रीखंड्या**—अनु, अनु, अनु ! हं काय असं ! तुला काय हा श्रीखंड्या नाहींतर, बासुंद्या तुझ्या पाया पडून ही वधू नेमस्त करील ! ये इकडे ये ! कबूल ! कबूल ! तुझं म्हणण कबूल. पुराव्यादाखल हे बघ, डोकीवरचं शिपतर, हातांत घेतलं ! एकेक सर्व करतो ! आंत धोतर नेसलो नाहीं ! नाहींतर तुझ्यासमोर इथं विजार देखील काढून टाकली असती ! म्हणून तेवढं इथंच फेकून द्यायचा हट्ट धरूं नकोस !

**अन्नपूर्णा**—तर मला कांहीं वेड नाहीं लागलं, भलताच आग्रह करायला !

**श्रीखंड्या**—ठीक आहे ठरलं ! चल आतां ! ए अनू ! आजच्या दिवस तरी माझ्याबरोबर, या पोषाखांत ये कीं सिनेमाला !

**अन्नपूर्णा**—तें कांहीं नाहीं ! असं घरांत परत चला ! आधी हं सगळं सोंग उतरा ! आधीं हिंदुसारखे दिसा ! आजच्या आज आपल्या पुनर्विवाहाचा दिवस ठरवा ! मग सिनेमाच काय, सांगाल तिथे दिल्लीला येते !

**श्रीखंड्या**—ठीक आहे, चल ! तुझ्या सौंदर्याचा दराराच असा जबरदस्त आहे कीं, इंग्रजसुद्धां ब्राह्मण होईल कोणी केला तर ! हो ! बरी आठवण झाली ! हे बघ, अनु ! आपलं बस्तान आतां विनायकराव अप्पासाहेबाच्या इथं कांहीं फार दिवस निभावेलसं, मुळीच रंग दिसत नाहीं !

**अन्नपूर्णा**—म्हणजे कशावरून ?

**श्रीखंड्या**—अग, सरलाताइचं आणि दिनकररावाचं सूत आपण जमवून दिलं, इतकंच नव्हे, चांगला पीळ घालून, त्याचा अगदीं रहाटाचा दोर केला, असं अप्पासाहेबाच्या मनानं घेतलं आहे ! केव्हां वाटाण्याच्या अक्षदा, एकदम दोघांना मिळतील, याचा नेम नाहीं !

**अन्नपूर्णा**—नाहीं तर नाहीं ! आपण सुंदरसा दुसरा उद्योग काढूं !

**श्रीखंड्या**—ठीक आहे ! पण भांडवलं ? ते कसं जमवायचं ? अरे वा ! हो खरं ! भांडवलाला काय तोटा !

**अन्नपूर्णा**—कां ? कसं उभारणार ?

**श्रीखंड्या**—हं पहा, अत्ताच मी ज्ञानप्रकाशांत वाचलं कीं, आपल्या सरलेच्या वडीलावर जो कोर्टांत खटला झाला होता आणि तो बिचारा पसार झाला, यामध्यें दुसरंच एक माणूस सांपडून, त्याचा पुरावा वगैरे सर्व होऊन, त्या मनुष्याला सात वर्षांची शिक्षा झाली, आणि सरलेचे वडील श्रीधरपंत अगदीं निर्दोषी ठरले !

**अन्नपूर्णा**—मग श्रीधरपंत उगीच घाबरून बेपत्ता झाले होते म्हणायचे ! बरं झालं ! जिवंत असला तर बिचाऱ्याचा अज्ञातवास संपला म्हणायचा !

**श्रीखंड्या**—तो जर प्रगट झाला आणि होणारच ! तर मग त्यालाच सरलेच्या मार्फत वशिला लावून, इथंच तीन मजली अन्नपूर्णा क्षुधा–शांती-गृह काढूं ! ठीक, पुढचंपुढं !

**अन्नपूर्णा**—चला ! सगळे कपडे काढून तुम्हांला प्रथम शिककाईनं न्हायला घालून, वजरीनं घासून पुसून, पुन्हां हिंदु ब्राह्मण बनवते !

**श्रीखंड्या**—ऑल राईट ! शेकंड हँड ! ठरलं !

**अन्नपूर्णा**—अहं ! आधी नमस्कार म्हणा, तर ठरलं !

**श्रीखंड्या**—ठीक आहे. नमस्कार ! बाकी अगदीं कोपरापासून नमस्कार आहे तुला ! ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

[ **सीन**--प्रभाकराची खोली.]

**दामूअण्णा**—वेल. युअर हायनेस दुमहिलाव ! आमच्या इकडच्या सारखाच, तुमच्या बोंबिलाबाद स्टेटचा सर्व कारभार असेल ?

**दिनकर**--ओ, नो ! बहोत फरक है !

**दामूअण्णा**--तो कसा काय ?

**दिनकर**--जो कुछ स्टेटका उत्पन्न आतां है वो सब हमारे बाबांका माल है !

**प्रभाकर**--पण लोकांच्या सोई ?

**दिनकर**--ओ कुछ परवा नही ! ये तुम्हारे सुख सोई गई जहानमें ! लोगोकूं उसे क्या गरज है ! बरसभर मखींया शेहेद जमा करती है ! हमजाके हजम करते है ! फीर वो जमा करती है ! फिर हम उडा देते, सब उनका डब्बा !

**प्रभाकर**--वा ! वा ! राज्यकारभाराची तुमची फारच सोपी रीत आहे !

**दिनकर**--हां ! जैसा बाबाजान बतला दिये, वैसाही करते है !

**दामूअण्णा**--कायहो, युअर हायनेस दुमहिलाव ! हा एवढा लक्षावधी पैसा, स्टेटचा रेव्हेन्यू तुम्ही करतां तरी काय ?

**प्रभाकर**----अँ, त्यांत काय ?

**दिनकर**—मखींया जमा करती है, हम निंगल जाते है ! लाखो तो क्या चीज है, हम करोडो उडा दिये है ! सोनेचांदीके मोटारीयें मोल लेकर, विलायती रंडीया, उसमे बिठा देते है ! विलायती कुत्ते खरीदनेको, हजारो पौंडके चेक, बँकपर चला देते है ! स्टेटमें किसीकी औरत खुबसूरत होय, तो उसके मरदकूं, दगाबाजीसे कत्तल करके, उसके औरतकू जनानखानेमें शामील करते है ! किसीकी उमदा उमदा मा, बहेन होय तो उसकू घरकू अंगार लगाते है ! और आदमी बचानेके बहानेसे, ढोंगसे, मा बहेन भगाकर, मरद लोगोंकू उसी घरमें, जला देते है ! किसीकी घरदार, बागबगीचे, खेतीवाडी, अच्छी होय तो कानूनके जरयेसे, झट लिलाम करके, हम साफ कर देते है ! ऐसा एकतो क्या हजारो रास्ते है हमारे, और हरएक रास्तो-

पर गडे हुये खुन पर, सोनेकी चदर और गालीच्या बिछा देते है ! हमारे खानदान और बाबांजानके जुतोमे पाव रखकर, हम सीधे चले आ रहे है ! अजीसाहेब, तुमकू जादा क्यां कहूं ! ओ चुला फुंकते, उसकू क्या कहते तुमारे में ?

**प्रभाकर**—फुंकणी !

**दिनकर**—हां, हां ! फुंकणी ! इतना भारी जनावर हाथी है ! लेकीन चाहेतो उसको सूंड फुकणीमें डालकर, और उसकी सूंड पकडकर, सालीमके सालीम हाथी फुंकणीमेंसे बाहेर खींचकर निगाल देंगे ! ऐसी कमाल रखते है ! के हाथीबी जिंदा और फुंकणीभी सलामत रहे !

**प्रभाकर**—वहावा ! वहावा ! काय तुमचं फुंकणीपुराण सांगावं ! तुम्ही एकवेळ तुमचं शेपूट बघा फुंकणीत घालून, सध्या फारच वाकडं झालं आहे !

**दामुअण्णा**—बंडरफूल गव्हरमेंट ! वेल, नवाब दुमहिलाव, आम्ही या आमच्या पुतण्याकरतां, तुम्हांला जी मुलगी दाखविली, ती कशी काय आहे ? आहे कीं नाहीं, तुम्हांला पसंत ?

**प्रभाकर**—अरे बापरे ! ही कोणची संक्रात काका माझ्या गळ्यांत बांधणार आहेत !

**दिनकर**—ओ दॅट छोकरी ! मोस्ट ब्यूटीफूल ! सिंपली चार्मिंग ! बिलकूल परींदा है !

**प्रभाकर**—कायरे, तूं पाहिलंस तिला ! माझी हिरॉईन तर नव्हे ! तसं असलं तर मग हरकत नाहीं !

**दिनकर**—छे रे ! ( या स्वारीला आम्ही तिच्या इथं जाऊन आल्याचा मागमूस देखील लागूं देऊं नये ! ) छे रे दुसरीच एक आहे, पण साधारण बरी आहे !

**दामूअण्णाः**—मग माझी पसंती अगदीं योग्य आहे कीं नाहीं ?

**प्रभाकर**—छे, छे भलतीच घोरपड गळ्यांत पडायची !

**दिनकर**—ओ क्या पूछते हो ! बिलकूल पसंत, चांगला है !

**प्रभाकर**—अहो, नबाब दुमहिलाव! तुम्ही गप्प बसा! तुम्हांला नाहीं त्यांत कळायचं! काकासाहेब! सध्यां मला लग्नच नाहीं करायचं! पुढं पाहूं त्याचं!

**दामूअण्णा**—तुला काय कळतं पोराला! तुला नसेल, पण मला कर्तव्य आहे!

**दिनकर**—बरोबर है! यू मस्ट ओबे!

**प्रभाकर**—(आतां काय करावं कपाळ! हाही गाढव त्यांना सामील झाला आहे.) पण काका माझं थोडं ऐकून तर घ्याल! माझं कारण—

**दिनकर**—डोन्ट वॉन्ट कारण!

**दामूअण्णा**—नो, नो! असूनदे काय वाटेल तें! तें पाहिन नंतर मी सगळं!

**दिनकर**—वो हम देख लेंगे!

**प्रभाकर**—देख लेंगे! तूं काय पाहणार लेका मग! अहो, पण माझं ऐकून तर घ्या! अगदीं शक्य नाहीं! आटोक्याबाहेर गेलं आहे काम!

**दामूअण्णा**—म्हणजे काय? मूर्ख आहेस! तुला नसेल पण मला कर्तव्य आहे! तें कांहीं नाहीं! (गिरजा पत्र आणून देते, ती दिनकरकडे पहाते. तो तिला चूप बसायला सांगतो.) थांब थोडी. उत्तर लिहून देतो! तें कांहीं नाहीं! प्रभ्या! तुझं कांहींएक ऐकणार नाहीं! मी करीन त्याला मुकाट्यानं कबूल झालंच पाहिजे नाहींतर परिणाम फार वाईट होईल सांगून ठेवतो!

**प्रभाकर**—हें तर विकोपाला जातं आहे! (गुडघे टेकतो) काका? मला क्षमा करा? मी आधींच लग्न लावून चुकलों आहे!

**दामूअण्णा**—म्हणजे! यू डॅम फूल! कुठं? केव्हां? कधी?

**प्रभाकर**—रोजा! दौलताबाद! तिकडे मोंगलाईत आहे. रोजा! यलोरा!

**दामूअण्णा**—काय? रोजा! यलोरा! दौलताबाद! विवाह झाला!

**प्रभाकर**—लग्न झालं!

**दिनकर**—अरे, हा तर गाढव काव्य करायला लागला!

दामूअण्णा—काय मॅरिड ? टेरीबल !

प्रभाकर—यस. मॅरीड ! हॉरीबल !

दिनकर—हां मॅरीड ! मिझरेबल !

दामूअण्णा—हरामखोरा, मला विचारल्याशिवाय ?

प्रभाकर—अहो, काय सांगू ! परमेश्वराला विचारायलासुद्धां फुरसत त्या वेळेस मिळाली नाहीं ! तुम्ही देखील ती दुर्दैवी कहाणी ऐकली तर गहिवरून जाल ! फार कशाला या नबाब दुमहिलाव यांना विचारा ! काय भयंकर प्रसंग तो !

दिनकर—अरे गाढवाच्या लेका, मला कशाला गोवतोस त्यांत !

दामूअण्णा—काय म्हणतो ! दुमहिलाव, तुम्हांला ठाऊक आहे तर सगळं !

दिनकर—मला तर अक्षर ठाऊक नाहीं ! हें काय लचांड गळ्यांत घातलंस ! हां, हां ! मालूम था ! लेकीन मय समजा कीं, तुम इनके वास्ते हमारे लोगोंके सारखा दो चार शादी करके, जनानखाना तयार करते हो.

प्रभाकर—माझा तर ऊर दाटून, शब्द उमटत नाहीं !

दामूअण्णा—वेल, युअर ऑनर ! ती कोण ? कुठली, कोणच्या जातीची सर्व सांगा पाहूं !

दिनकर—गाढवाच्या पुतण्या, काय सांगू आतां !

प्रभाकर—( रडत. ) सांग, बाबा ! काय सुचेल तें ! तो पहा त्याचा गळा दाटून आला !

दामूअण्णा—तुमच्यासारखा तिऱ्हाईत जर इतका गहींवरला, तेव्हां भयंकर प्रसंग असेल ! अरे ! अरे ! अरे ! वेल, सांगा ! रोजा ! यलोरा !

दिनकर—हां ! रोजा !

दामूअण्णा—रोजा ! यलोरा !

दिनकर—मोंगलाई !

दामूअण्णा—बरं, बाबा मोंगलाई ! बरं पण तिचं नांव, गांव, जात ?

दिनकर—अरे, नांव काय सांगू ? हां हां ! वो छोलरीका नाम !

दामूअण्णा—अहो तुम्हीच काय हुंदके देऊन रडतां मला तर कळूं द्या !

**प्रभाकर**--उगा ! उगा ! नका रडूं, नबाब दुमाहिलाब ! बोंबिलाबाद तुम्ही माझ्याकरतां ! मी सांगतो. सुचेल तसं काकांना !

**दिनकर**—बरं बाबा ! मला सोडवलंस !

**दामूअण्णा**--कायरे, तुम्ही रोज्याला कशाला गेलात मरायला ?

**प्रभाकर**—अहो, सांगितलं ना लेणी पहायला गेलो होतो.

**दामूअण्णा**—बरं पुढं...

**प्रभाकर**--तिथंच त्या रोजाला एकाच्या घरीं उतरलों, तिथंच हा प्रकार झाला !

**दामूअण्णा**—अरे गाढवा, हे रोजा रोजा काय आहे ?

**प्रभाकर**—अहो, काका ! वेरूळची लेणी ज्या डोंगरांत खोदली आहेत, त्याच्या माथ्यावर रोजा हे गांव आहे ! ती वेरुळची लेण्याची जाळपोळ, मोडतोड करणारा, औरंगजेब बादशहा, त्याच रोजाला पुरला आहे !

**दामूअण्णा**—आय, सी ! आलं गांव लक्षांत ! बोल. आतां तिचं नांव काय ?

**प्रभाकर**--सौभाग्यवती मधुराप्यारी,मोंगलाईत तिला मिठ्ठीजान म्हणतात.

**दामूअण्णा**—कशाला गेला मरायला तिथं ! काय सांगावं ! मोठा चमत्कार आहे ! मधुराप्यारी ! मिठ्ठीजान, दौलताबाद, यलोरा, रोजा, औरंगजेब, मोंगलाई ! हरामखोरा ! पण तुमचं हें जमलं कसं ? कशाला गेलास मरायला अडमडायला !

**प्रभाकर**—अहो, काका मी जाणार नव्हतो, पण उन्हाळ्याच्या सुटी-मध्यें, त्या निळकंठरावानं कुठंतरी ट्रीप, फेरफटका काढायचा भारी आग्रह केला, म्हणून त्यांच्याबरोबर गेलो !

**गिरजा**—आन तथं ह्यो मिठ्ठीजानचं लचांड गळ्यांत पडलं !

**प्रभाकर**—हाय, हाय ! काय भयंकर प्रसंग तो !

**दामूअण्णा**—पण सुरवात कशी झाली ?

**प्रभाकर**--चार चौघांच्या सारखीच झाली !

**गिरजा**—काय बया ! ह्येला ह्यो अकक्षी बनवतोया जनू ! अपून बी जरा बारकाईनं नंदर ठिवावी !

**दामूअण्णा**--काय प्रकार झाला तें सांग चटकन ! पाजी !

**दिनकर**—हां, हां ! बोल देव ! अफसोस ! अफसोस ! सुभानअल्ला !

**प्रभाकर**—तुम्हांला तर दुमहिलाव ठाऊक आहेच सगळं ! काकासाहेब, सुरवात सरळच झाली ! निळकंठरावाच्या ओळखीचा एक खातापिता सुखी श्रीमंत रोजाला रहात होता !

**दामूअण्णा**—त्याचं नांव काय ? कोणत्या जातीचा ?

**प्रभाकर**—त्याचं नांव मोरूभाऊ, मोंगलाईत त्यांना मुरादखां म्हणतात ! त्याच्या इथंच आम्ही सर्व उतरलो ! ते हिंदु खरे पण पिढ्यान पिढ्या मोंगलाईत गेल्यामुळें, ते मोंगलाईतले मुसलमान आहेत, कां मुसलमानी हिंदू आहेत हे देखील कळणार नाहीं कोणाला !

**दिनकर**—बिसमिल्ला !

**दामूअण्णा**—त्यांची रहाणी, पेहराव, चालरीत सगळी मुसलमानी होती कीं काय ?

**दिनकर**—हां, हां ! बिलकूल हमारे माफक !

**प्रभाकर**—अगदीं मुसलमानासारखी ! त्यांच्या इथं उतरल्यावर, ते मोरूभाऊ, मुरादखां ! हे दुमहिलाव, निळकंठराव, आणखी दोघे चौघे, दौलताबादचा किल्ला, जयराम स्वामीची समाधी, वेरूळची लेणी वगैरे पहायला गेले !

**दामूअण्णा**—मग लेका, तूं कां गेला नाहींस त्यांच्याबरोबर !

**गिरजा**—ह्येसनी पाहिजे होतं, मिठ्ठीजानचं लेण !

**प्रभाकर**—अहो, काका ! मी पडलो, भयंकर पोटशूळानं आजारी ! माझ्या औषधपाण्याची व्यवस्था करून, ते जाऊन येतो म्हणाले ! उगीच तिऱ्हाइताचा माझ्याकरतां खोळंबा कशाला, म्हणून मी त्यांना परवानगी दिली !

**दामूअण्णा**—बरं पुढं काय झालं ?

**प्रभाकर**—पुढं सगळं ठीक झालं ! ही सर्व मंडळी गेल्यावर मोंगलाईत जरी इतका भयंकर बुरखा पाळतात, तरी माझी पोटांत दया आणून, त्या मिठ्ठीजाननं, दुसरं कोणी तिथं नसल्यामुळं, माझं पथ्यपाणी वगैरे बुरखा

दूर करून, मोकळ्या मनानं सुरू केलं! रोजाहून ही सर्व ठिकाणं पहा-यला चार दिवस मुक्काम करायच्या इराद्यानं सर्व गेले होते!

दिनकर—या चोरानं औरंगजेबच्या कबरीजवळच्च रोजाला ठाणं दिलं!

दामूअण्णा--मला तुझं पथ्यपाणी नको आहे! पुढें काय! प्रकार झाला तो सांग चटकन्!

प्रभाकर--आतां कोणच्या तोंडानं, काय सांगू! थोडक्यांत सांगायचं म्हणजे आम्ही परस्परावर अत्यंत लुब्ध होऊन, त्याच दिवशीं रात्रीच्या निवांत वेळीं, थोड्या शृंगारीक चेष्टा करीत बसलो! तोच तिचा परगांवी गेलेला भाऊ रामराव ऊर्फ रहिमान हळूच परत आला! त्यानं आम्हां उभयतांचा शृंगारीक संवाद आडून ऐकतांच भयंकर रागावून, एका हातांत चाबूक आणि दुसऱ्या हातांत सुरा घेऊन आंत घुसला (देतो रेटून सुचेल ते.) मग काय विचारतां!

दिनकर--मॉय गॉड! फिर क्या झाला!

दामूअण्णा--हॉरीबल! पुढें!

प्रभाकर—पुढें काय! त्यानं तोंडाची सरबती सुरू केली! चाबकाची फेर उडवली, आणि आतां सुरा घेऊन, जो माझ्यावर ऑपरेशन करणार, तोच मिठ्ठीजाननं धांवून, त्याचा हात धरला!

गिरजा—मोगलाईच ती! दाद ना फिर्याद!

दामूअण्णा—टेरीबल! पुढें काय!

प्रभाकर—त्यानं "हमारे बहेनकू बिघाड डाला! बहेनकू खराब करडाला! बहेनकू नापाक करडाला!" अशी बोंब करून सगळा गांव गर्जून टाकला! हा आरडा ओरडा ऐकून, नोकर चाकर, भाला, बर्ची घेऊन आले. आजारी पळा, लाटणं घेऊन सरसावले, घोडेवाले, लगामी, जीन घेऊन धांवले! न्हावी मशाली पेटवून आले, आणि सर्वत्रांनी मला एकदम गराडा घालून, तिसऱ्या सप्तकांत तिच्या भावानं "शादी लगाव" "शादी लगाव" अशी प्रचंड गर्जना केली! त्यासरशी सभोंवतालच्या लोकांनीं एकदम गराडा घालून, "नहीं तो काट डालेगें" असा त्रिवार गंभीर जयघोष केला! त्यासरशी मी देखील, जमिनीवर अष्टांग पसरून,

खालच्या खर्जात, "तयार हूं" असा नम्रतेनं जबाब दिला! आणि डाळ मिटून, देवाज्ञेची वाट पहात तसाच पडून राहिलो!

दामूअण्णा—अरे, अरे, अरे! बरं झालं, होय म्हणालास! नाहींतर तुझा खूनच पाडला असतां त्यांनीं!

गिरजा—कसा पतंग उडवला बघा!

दिनकर—(किती ब्रह्मदेवानीं, किती वर्षं याला घडीवला, देव जाणे!) तोबा! तोबा! सुभानअल्ला! खूदा रहेम करे! तोबा तोबा!

प्रभाकर—अहो, दुमहिलाव! तोबा, तर खरा सकाळीं उडाला!

दामूअण्णा—तो काय?

प्रभाकर—अहो, सकाळ होऊन, सूर्य उगवतो न उगवतो, तोंच डंका, नौबती झडवून, मला जमिनीवरून गोळा करून, गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर लग्न लावून सोडून दिला!

दामूअण्णा—मॉय गॉड! हॉरीबल लोक मोंगलाइचे!

दिनकर—अच्छा हुवा तुम बच गये! मिठ्ठीजानके भाईके हातमें सुरा था! झट सुंता करके, नमाज पढाके, निका लगा देता, तो क्या करते!

प्रभाकर—योगायोग! दुसऱ्या दिवशीं ही सर्व मंडळी परत आली आणि त्याच दिवशीं मोरूभाऊ, मुरादखांनीं आमचं मांडवपरतण केलं! यावरून पहा, आतां कसा कडेलोट झाला!

दामूअण्णा—अरेरे, पुअर बॉय मॅरीड!

प्रभाकर—होय हो, अगदीं बेरीड!

दामूअण्णा—नो डाऊट! शंकाच नाहीं. पण मी भयंकर पेचांत आलो आहे! वेल, युअर हायनेस दुमहिलाव! त्या छोकरीला आतां मी काय, आणि कसं सांगूं!

दिनकर—कुछ बी सांगून छोडो!

दामूअण्णा—वेल तू हो पुढं! नको थांब! मी तुझ्याबरोबर येऊन समक्षच त्यांना सर्व प्रकार सांगतो! वेल प्रभ्या! डोन्ट बी सॉरी! वेल युअर हायनेस! मी भेटतोच पुन्हां तुम्हांला लवकर! (जातो.)

दिनकर—महान् पंडीत आहेस! झक मारली आणि तुझी संगती

धरली ! नुसतां महान् छे, प्रचंड पंडीत आहेस ! कायरे, कोण कोणते ग्रंथ पालथे घातलेस बाबा !

**प्रभाकर**—बच्चा आहेस ! ग्रंथ घोकंपट्टी आणि व्यवहार, जमीन अस्मान फरक ! अत्यंत कडकडीत व्याकरणग्रंथ, तो, ती, तें सर्वनाम जसं लागेल, तसा लिंगभेद ओळखावा, म्हणून बजावतो ! पण व्यवहारांत भयंकर चूक होते ! मी म्हणतो, तो लागेल ते स्त्रीलिंग, ज्याच्या मागं ती लागेल ते पुल्लींग, आणि ज्याच्या मागं तो किंवा ती लागत नाहीं, जो अलीप्त रहातो ते नपुसकलींग ! बरोबर आहे कीं नाहीं ! ठीक. सर्व बाजूला राहू दे. आधी माझ्या काकांनीं, तुला कोणची छोकरी दाखवली, ते सांग मला सगळं ! चल आधीं ती दाखीव !

**दिनकर**—चल, बघतो मला सापडलं तिचं घर तर ! ( ती देते याला गुंगारा ! मी याला इतक्यांत बिलकूल पत्ता लागूं देत नाहीं ! )

**प्रभाकर**—अरे चल ! ज्या गांवच्या बोरी त्याच गांवची ही बाभूळ आहे म्हटलं !

**दिनकर**—आणि म्हणूनच म्हणतो मी, सगळ्यांना कीं हा कांहीं कच्च्या गुरूचा चेला नाहीं ! ठीक आहे चला, भांबुर्ड्यांचे महाराज ! व्हा पुढें ! काव्याच्या नुसत्या विटा पाडल्यांत तुम्ही !

**प्रभाकर**—बरं तर ! या असे बोंबिलाबाद दुमहिलाव माझ्या मागोमाग ! हं, हलवा चांगलं शेपूट ! ब्रदर, कॉमरेड ! कमलांग ! [ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ सीन--रस्ता. ]

**शंभ्या**--आतां माझ्या गिरजेला कुठं म्हून हुडकावं ! वाटखुळची गेलीया ! अजून कां नाहीं परत फिरली म्हून तिला पघाया, प्रेमाबाईनं जा म्हून सांगितलं, तवा निघालो तिला हुडकाया ! ह्या माझ्या मालकिनीचा तऱ्हेवाइकपनाचा प्रकार, नाय यायचा ध्यानात कुनाला ! हिचा तडाखा कांहीं न्याराच है ! कशी काय गत होनार, देव जाने ! आज चार महिनं झालं,

कईक गोरगोमटी, जानजवान पोरं, लगीन कराया कशी येड्यावानी उंबरठ्याच धरन धरून बसले हायती. पन ही देतीया समद्यासनी गुंगारा! कसा ब्री यस्फस् करनारा, आन आकशीं साहेबावानीं नटून, थटून येऊं दे, दोन शब्दातच त्याचा उतरती या नखरा! हिला पैकेवाला नग, गोरागोमटा नग, कामगार, ऑफीसर नग! मंग करनार तरी कुनाशीं लगान! जाऊं द्या, आपल्याला काय करायचं हाय! पन पगा, हिचं लगान, जर का, लवकर नाय टरलं, तर माझा पडनार मुडदा! हकडून, तकड जा! ह्येसनी पत्र दे! अक्क्षी चोविस घंट माझ्या पायाला कशी मोटर बांधलीया! आतां सांजच म्हटलं, ह्यो फिरायला गेल्या म्हनजी, अप्नभी बाईच संध्या करून शान घेवी! पन आज फिरायलाबी गेल्या नाहीती! बाईच बसनार, तोच म्हंगाल्या कीं, तकड त्या तांबट आळीच्या कोपऱ्यावर कोण दामुअण्णा हैत, त्यांच्या इथून गिरजेला बोलावून आन, तवा तसाच निघालो! म्हनलं उगाच हात हलवीत जायचं, तर तशीच ह्यो झारी आन दराबभी बगलत मारावं आन जावं झालं रस्त्यानं तर्पान करीत! म्हनजी योक काम तरी आटपलं! चला, सुरवात करूं या! उगीच येळ वाया जाया नग! समद्याच्या आधीं गणपती बापाला मी तिरपी! इशवे देवाला, ओंकाराला. मी तिरपी! समद्या नदी, नाला, ओढा यांना मी तिरपी! उंचाड, टेकाट, डोंगराला मी तिरपी! इश्वामित्र, वसिष्ठ बेडूक ऋषीला मी, तिरपी! पापाणां पाप करमाणां, पापात्मा पाप संभव! तिरहींमां करपयात गंगे! समदं पाप घरोघर! आतां माझा बा, धोंडीबा रताळे त्यासनी मी तिरपी! माझा बाचा बा, पनजा, खंडू रताळ्या त्यासनीभी मी, तिरपी! आतां माझी आई, धोंडी आन तिची आई, माझी पनजी दगडी, तिला मीभी तिरपी! माझी पहिली अस्तुरी इठी, त्या इठीलाभी मी तिरपी! आन तिची बहीन सारजा, त्या बहीनीलाभी मी तिरपी! आन जी कोणी राहिली असल, तिलाभी मी तिरपी! आतां माझं समदं गोतावळ! मसाळे, घोसाळे, रताळे, पाटोळे, वाटोळे, रेताडे, खडे, चिकणे, ढेंकणे, झांजवाले, टाळवाले, मुरदंगवाले, पिंपाणे, समाद्या जातकुळीच्या, मराठ्यासनी मी, तिरपी! या गावांच्या जित्या मेलयासनी मी तिरपी! तकडं येशूच्या देवळांत डोकशीवर पानी शिंपडून घेतलं! म्हनजी जसा झटपट किरीस्ताव

होतो किंवा सूंता, नमाज पढून, जसा चटकन मुसलमान होतो तसं बामन होन्यापाई, कांहीं उपाव असतां तर कसं छान झालं असतं! पन शंकाचार्यांनी बामन होन्यापाई कांहीं तरी वाट ठिवायला पाहिजे होती पगा! योक कान जरी कापून मागीतला असतां, तरी तवाच आपल्या हातानं नाक कापूनशान बामनाच्या दारांत उभा राहिलो असतो! पन वाटच ठिवली नाय तथं काय करावं! चला, लई येळ झाला! गिरजेची आन माझी चुकामूक पडायची! नाहीं तर नाहीं, नुसतं येदोक्त, आपचन आन तर्पनच हानुया! पमाताई तर हकडूनच येऊन राहिल्या! चला! उचला पाय वेगी वेगी! (जातो. प्रेमा व सुधा येतात.)

**प्रेमा**—मला मुळींच मिळमिळीत आयुष्याची किंमत वाटत नाहीं! चंद्रज्योतीसारखं प्रकाशीत तरी व्हावं, नाहीं तर एकदम विझून तरी जावं! हृदयाच्या लामणदिव्यांत, एक एक दिवस आयुष्याची वात सारून, जिवाला मिण मिण जाळत बसण्यांत काय अर्थ आहे! धड त्याचा दुसऱ्याला उजेड नाहीं आणि स्वतःखाली मात्र भरपूर अंधार! कसलं हें आयुष्य! माझा आयुष्यक्रम कसा काय आखायचा, तो मात्र मी ठाम निश्चय केला आहे!

**सुधा**—पहा बाई! तुझा तूं संपूर्ण विचार करून! प्रत्येकाची आवड निराळी असते! अमूकच आवड तूं ठेव हे कसं, कोणी कुणाला सांगावं!

## पद.

**हीं आवड कशि पटवावी। सांगावी कोणी कुणा शिकवावी। जगीं या॥ ध्रु०॥ हृदयीं उपजे प्रिती विमला, केवि कशी फिरवावी। अडवावी, केवि नदी फिरवावी॥ १॥ अमूक प्रकारें नाच ढगावरी। चंचल त्या चपलेशीं। प्रितीशीं, आज्ञा कोणी करावी॥ २॥**

**प्रेमा**—बरोबर आहे! आणि म्हणूनच, मी मात्र आग्रहानं सांगते कीं निळकंठराव, माझ्या सख्या भावाप्रमाणं असून, तूं जर त्यांच्या विनंतीला मान दिलास, तर मला बहीण आणि भावजय, या दोन्ही प्रेमळ नात्यांचा लाभ घडवून देशील! (ती लाजते.) कां लाजलीस कां अशी!

**सुधा**--पण तुला देखील, मी सुखी पाहिल्याशिवाय, मला त्यांच्या विनंतीला रुकार तरी कसा देतां येईल !

**प्रेमा**—कां नाहीं ! पण मी स्पष्ट सांगितलंना ! तुला गुलाबाची आवड आहे, तूं खुशाल त्याच्या सुवासांत रममाण हो ! मला उंबराच्या फुलाची आवड, हौस आहे, ते मिळालं तरच त्याचा सुवास मी घेणार !

**सुधा**—पण तुझा रोमँटिक लव्हर, ते उंबराचं फूल, केव्हां उमलणार नी तूं केव्हां सुखी होणार ?

**प्रेमा**--ते माझं मी पाहीन ! त्याबद्दल तुला मुळीच खिन्न वाटण्याचं कारण नाहीं !

**सुधा**—काय ग, हे दामूआण्णा ! हा कोण ओल्ड जन्टलमन, तुझ्या-कडे आला होता ? कोण हा ?

**प्रेमा**—ते कीं नाहीं माझ्या वडीलांचे एक स्नेही आहेत ! चांगले श्रीमान आहेत ! त्यांची इच्छा, मी त्यांच्या पुतण्याशीं लग्न लावावं अशी आहे ! ते सर्व संपत्ती, मी लग्न केल्यास, आपल्या पुतण्यास देण्यास तयार आहेत ! कारण ते निपुत्रिक आहेत ! मी त्यांना स्पष्ट सांगितलं कीं,तुमच्या पुतण्याशीं, केवळ दागदागिने, नोटांची बंडलं, मोटारी, यांच्या करतांच लग्न लावायचं असलं तर, सगळी हिऱ्या, मोत्यांची, दागदागिनं, नोटांची बंडलांची, माझ्यापुढं रास करून मांडा ! मी त्या ढिगाशीं लग्न लावायला तयार आहे ! पण तुमच्या पुतण्याची माझ्या घरांत अडगळ नको !

**सुधा**—मग बसली असेल मात्र त्याची दांतखिळीच !

**प्रेमा**—छे, म्हातारपणीं स्वभाव भारी लोचट होतो ! एक एक गोष्ट तीन तिनदां उगाळतांना, त्यांना मुळीच कंटाळा येत नाहीं ! त्यांनीं केलन आपल्या पुतण्याचं रूपवर्णन आणि गुणवर्णन सुरू ! तेव्हां रामायण थोड-क्यांत आटपायच्या करतां, त्यांना साफ सांगितलं कीं, तुमचा पुतण्या, मी स्वतः पाहिल्याशिवाय मला त्याच्या स्वभावाची पूर्ण पारख केल्याशिवाय, मला कांहींएक करतां येणार नाहीं ! त्यांनीं लवकरच भेटीचा योगायोग घडवून आणतो म्हणून सांगून गेले आहेत !

**सुधा**—कशाला तसदी घेत आहेत. केस फिसकारलेल्या आयाळाचा सिंह, तुला दाखवायची ! ही जी शेंकडो जिनगरी बाहुली, हे जे जिराफ,

ऊंट, संध्याकाळीं टेनीस बॅटस् घेऊन, लाजत मुरडत जिमखान्यांतून जातात यातलाच त्यांचा पुतण्या! एखाद नाजूक चित्र असेल झालं! तुला बघितल्यावर तरी दामूअण्णांनीं आपल्या पुतण्याचं तट्टू दामटायला नको होतं!

**प्रेमा**—तो त्यांचा दोष नाहीं! तो त्यांच्या वयाचा दोष आहे! उतार वयांत तारतम्य अगदींच बेताच असतं! त्यांच्या पुतण्याचं घोड, उगीच माझ्या घरच्या तबेल्यांत आणायची तसदी घेऊं नका. म्हणून मी पत्र देखील लिहून, गिरजेच्या हातीं पाठीवलं! उगीच फार्स नको व्हायला आपल्या घरांत!

**सुधा**—बरं, पण तुझ्या मनासारखा पायलट, तुला आतां केव्हां भेटणार? एक भेटला, पण त्याचा तर बेपत्ताच झाला! बरं, त्यानं तुझं नांव, गांव, ठाव, ठिकाणा विचारला! तर तोंही तूं त्याला तुझ्या रोमँटिक फिट मध्यें दिला नाहींस! तेव्हां जरी समजा! आणखी एखादा कोणी भेटला, तरी थोडं आपण मिळतं घेतल्याशिवाय योगायोग जुळून कसा येणार!

**प्रेमा**—मग तुला रोमान्सचा अर्थंच कळत नाहीं! कल्पना, धाडस, रंगेलपणा, आणि योगायोग, या सर्वांच्या भरपूर मिश्रणाशिवाय, रोमान्सच निर्माण होत नाहीं! हे सर्व माझं मी पाहून घेईन! फक्त एक गोष्ट ठरली!

**सुधा**—ती कोणती?

**प्रेमा**—मी तुला वहिनी म्हणून हांक मारायची! चल तर! आपण बराच वेळ रमलों! बस्स्! नथिंग लाईक रोमान्स, नॉव्हेलटी!

(जातात.)

---

## प्रवेश चवथा.

(**सीन**—विनायकरावांच्या घराची पडवी.)

**श्रीधरपंत**—अरेरे, माझ्या सारखे किती तरी जीव संशयाच्या फेऱ्यांत सांपडून, अब्रू बचावण्याकरतां, देशोधडीला लागले असतील! काय माझी चमत्कारिक स्थिती ही! वाटेच्या चालण्यानं, आणि उपास मारीनं मी कसा अगदीं थकून गेलों आहे! इथंच थोडं बसावं! या भिकाऱ्याच्या

वेषांत, पण वेष कसला-खरोखरीच मी भिकारी आहे ! वेष टाकून देतां आला तर तो नट, पण जो त्या वेषांत कायमचा रहीवासी झाला, तो नट कुठं राहिला ! आतां रात्र होत चालली आहे ! सात आठ वर्षांच्या अवधीमुळें, या गावांत जमीन अस्मान फरक पडला आहे ! मी तर सर्व विसरून गेलों ! तेव्हां इथंच बाजूला पडून रात्र काढावी. प्रातःकाळ होतांच विनायकरावांच्या घराचा शोध काढावा ! या वेळेस माझी सरला, कुठं असेल, केवढी झाली असेल, काय करीत असेल, पुन्हां डोळे भरून कधीं पाहीन, असं झालं आहे ! दुःखाचा ऐनभर चालू असण्यापेक्षां दुःखसमाधीचा काळ, अधीरतेमुळं, जास्त जाचक होतो ! देवा, ती असेल तरी ना ! माझ्या दृष्टीस पडणार आहे ना ! माझं मन कसं दोन्ही प्रकारच्या विकारांनीं गोंधळून गेलं आहे ! राजापासून रंकापर्यंत गोंधळलेल्या जिवाला, चिंतेनं काळीज करपून, गेलेल्या जिवाला, पापाच्या जाणिवतेमुळं पिचून जाणाऱ्या जिवांना, आणि अन्यायाचा नांगर फिरल्यामुळं, देशोधडीला लागलेल्या निरपराधी जिवाला, आपल्या मांडीवर थोपटून, त्याचं दुःख हलक करणाऱ्या, ह्या आईला, मिठी मारून, इथंच धरणीवर पडावं !

( तो निजतो. जांभई देतो. इतक्यांत श्रीखंड्या येतो. )

**श्रीखंड्या**--छे, छे ! डुकर देखील एक वेळ आपली मुसंडी मागं फिरवील, पण ही अनू, आपला शब्द कधीं देखील परत घेणार नाहीं! हिला माझ्या कपड्याची काय चीड बसली आहे, कोणास ठाऊक ! तिच्या मुरवतीकरतां, सगळे कपडे टाकून, दिले ! म्हटलें एवढी पाटलोण तरी राहू दे! पण छे! आतां दहा मिनिटें, आमचा वाद झाला ! शेवटी पाटलोण तिच्या काढून स्वाधीन केली ! काय करायचं ! रूप, मुखडा जरा मारू आहे, म्हणून बोटचेपा झालों, नाहीं तर केव्हांच दिलं असतं धुड-कारून! चला ! अरे पण हे कोण इथें ! (त्याला गदगदा हलवतो व नंतर) कोण रे लेका तूं ! काय आहे रे यावेळेस इथें !

**श्रीधरपंत**—अरे, अरे ! पण ही काय गरीबाशीं वागण्याची तुमची रीत ही ! हे हिंदुचच घर आहे कांहो !

**श्रीखंड्या**—मोठा लेकाचा आर्यभूमीचा कैवारी ! मोठा आला आहे हिंदूचा अभिमानी ! हो आहे, हिंदुचच. मग काय म्हणणं आहे तुझं ?

**श्रीधरपंत**—असे रागावूं नका ! मी गरीब ! कां बरं असे रागावतां उगीच्या उगीच ! मी भुकेनं अत्यंत व्याकूल झालो आहे ! इथं पडलों, पण भुकेमुळं डोळ्याला डोळा लागला नाहीं ! मला थोडसं अन्न आणि पाणी देतां कां ?

**श्रीखंड्या**—अरे चोरा ! अलीकडे डिटेक्टिव्हांचा भयंकर सुळसुळाट झाला आहे ! गांवच्या लोकापेक्षां देखील यांचीच संख्या जास्त झाली आहे ! कायरे, एखादा डिटेक्टिव्ह पोलीस बिलीस नाहींस ना ?

**श्रीधरपंत**—नाहीं हो ! मी निराधार वाटसरू आहे !

**श्रीखंड्या**—मग हरकत नाहीं ! ऊठ तर इथून आतां बऱ्या बोलानं ! नाहीं तर घालतो बघ कंबरेत लाथा !

**श्रीधरपंत**—नका हो ! थोड पाणी तरी द्या !

**श्रीखंड्या**—( त्याचं घोंगड हिसकावून घेतो. ) हरामखोरा ! वटवट किती करतोस ! तुझ्या बापानं तिथं नळ उभा केला आहे त्या नळावर पाणी पी जा ! जातोस कीं नाहीं ! ( त्याला मारतो. )

**श्रीधरपंत**—अरे बापरे ! मेलो ! अग आई ! अरे राम ! अहो मारूं नका ! मेलों ! मेलो ! तुमच्या पाया पडतो ! ( सरला येते. )

**सरला**—कोण ओरडल केविलवाणं ? कोण ? श्रीखंडे ! सोडा ! सोडा त्या गरीबाला ! गरीबाला कां बरं मारावं असं ! काय हो मांग हृदयाचे आहात तुम्ही !

**श्रीखंड्या**—तुम्ही काय ह्या भिकारड्याच्या नादी लागतां ! ए हरामखोरा ! इथें अन्न पाणी, वगैरे कांहीं एक मिळायचं नाहीं ! चालता होतोस कां घालूं पुन्हां दोन लाथा ! ऊठ ! उठतोस कां नाहीं चटकन ! (मारण्यास जातो, तो सरला अडथळा करते. )

**सरला**—गप्प बैस मेल्या ! थांबा अं. मी देते तुम्हांला खायला ! ( श्रीखंड्यास ) जा तुम्ही आपल्या कामाला ! जा ! जातां कीं नाहीं !

[ तो जातो ].

**सरला**—हो! हो! देते हं खायला! बसा हो! लागलं हो तुम्हांला फार?

**श्रीधरपंत**—बाई, उदंड आयुष्याची हो! तुमच्या मायेच्या बोलण्यानं माझं सगळं दुःख नाहींसं झालं बरं!

**सरला**—अग आई! काय तरी चांडाळ निष्ठूर पहा! गरीबांचा जन्म, दुःख भोगायच्या करतांच असतो कीं काय, देव जाणे! किती तुमचे पाय फुटले तरी हे! हे पहा, कसं रक्तदेखील येत आहे! चला, चला घरांत! थोडं खाऊन पाणी प्या म्हणजे तुम्हांला बरं वाटेल!

**श्रीधरपंत**—बाई, कशाला त्रास घेतां! थोडंसं शिळं अन्न असेल तर इथंच आणून द्या! मी पाणी पिऊन इथंच पडतो!

**सरला**—शिळं अन्न नाहीं हो सोसणार तुम्हांला! मी अत्ता भात टाकून तुम्हांला वाढते! आतड्यांना खुपेल हो शिळं अन्न!

**श्रीधरपंत**—बाई, गरीबांची आंतडी वाटेल तितका पीळ सहन करतात! निरपराधी लोक, गरीब लोक, आणि जगाचा उद्धार करणारे महात्मे ह्यांच्या आंतड्यांना जेव्हां भयंकर पीळ बसून, त्या आतड्यांतून करुण स्वराचा टाहो फुटतो, त्याच वेळेला अणूरेणूंतला निजलेला परमेश्वर गंहीवरून प्रगट होतो!

**सरला**—तुम्ही कसं खरं आणि चांगलं बोलतां हो!

**श्रीधरपंत**—(किती भोळा आणि ममताळू स्वभाव हिचा हा!) बाई! तुमचं नांव काय? वडलांचं नांव काय? तुमच्या सासरचं आडनांव काय?

**सरला**—माझं कीं नाहीं, लग्न झालं नाहीं अजून! चला घरांत, मी माझी आणि माझ्या टाकून गेलेल्या वडीलांची, मग सगळी हकीगत सांगते! माझ्या वडीलांनीं कीं नाहीं, मला दुसऱ्याच्या स्वाधीन करून, पळून जातांना पुष्कळ दागदागीने ठेवले आहेत त्यांतला एक तुम्हांला देते, म्हणजे तुम्हांला दुःखांत दिवस काढायला नकोत! चला, आधी खाणंपिणं झाल्यावर, मग सगळं सांगते!

**श्रीधरपंत**—काय माझ्या डोळ्यांना भ्रम तर झाला नाहीं ना! मी कुणाला बघतो आहे? मुली, तुझं नांव सरू कां? तुझं नांव सरला कां? तूं एका अभागी श्रीधरपंताची मुलगी का?

**सरला**—तुम्ही कांहो दचकला ! मला भेटतील कांहो माझे वडील पुन्हां ! मला लहानपणी कसे कुरवाळत होते हो ! मला कुरवाळून, पोटाशी धरतील कांहो पुन्हां ? अजून माझ्या कानांत भरले आहेत त्यांच्या शब्दांचे आवाज ! तुम्ही मला सरू म्हणून हांक मारतांच, माझ्या बाबांनींच, हांक मारल्या-सारखं वाटलं हो ! कसे बाई, मला दिसणार पुन्हां ते ? तुम्हांला माझं आणि माझ्या वडीलाचं नांव, कसं ठाऊक झालं ? कुणीहो तुम्हांला सांगि-तलं ? तुमच्या ओळखीचे होते कांहो ? तुमच्या डोळ्याला पाणी कां बरं आलं ? कांहो असे रडतां ! मलादेखील, तुम्हांला पाहून, रडूं येत हो ! कोण थंडी पडली आहे ! ( त्याच्याकडे पाहून कळवळून ) ह्या फाटक्या चिंध्यानि, कशी बरं थंडी थांबणार ! घ्या ! ही शालजोडी पांघरून घरांत चला !

**श्रीधरपंत**—असूं दे ! असूं दे !

**सरला**—दुसऱ्याची वस्तु वापरायला, यांना लाज वाटते बरं कां ? पण ही तुम्हांला मी देऊन टाकते ! मग झालं ना ! मला कीं नाहीं पुष्कळ आहेत ! मला अप्पासाहेब, रागावतील, मारतील, जाच करतील, म्हणून कांहो तुम्हांला भिती वाटते ?

**श्रीधरपंत**—म्हणजे ! हिला कांहीं त्रास होतो वाटतं घरीं !

**सरला**—मला कीं नाहीं, घरच्या त्रासाची आतां अगदीं सवंयच झाली आहे ! अप्पासाहेब, रागावले तर घेईन ऐकून चार शब्द !

**श्रीधरपंत**—( अहाहा ! हिला प्रगट होऊन, प्रेमानं पोटाशीं धरण्या-करतां, माझें पंचप्राण, कसे अधीर झाले आहे ! पण हिच्या घरांतील, सर्व वस्तुस्थिती, पुरी कळल्याशिवाय दुर्दैवी श्रीधरपंता ! तुला याच वेषांत, काळ काढला पाहिजे ! )

**सरला**—असं आपल्या मनाशीच बोलून, कां बरं, खिन्न होता ? चला आधीं, थोड खा ! म्हणजे तुम्हांला बरं वाटेल ! आणि हुशारी येईल !

**श्रीधरपंत**—चला तुमची इच्छा ! ( तो लंगडतो. ) ती त्याला धरते.

**सरला**—थांबा अं ! मी तुम्हांला धरते ! ( त्याला घेऊन ती आंत जाते व विनायकराव प्रवेश करतो !

**विनायकराव**—मला लेकानं प्रेमसंन्यास नाटकाचं तिकीट देऊन पाठिवलं आहे ! आणि हा हरामखोर जाणार आहे, माझ्याघरीं स्वयंवराला ! तुझ्या बारशाला नी बाराव्याला जेवणारा मी त्या ह्या तुझ्या पितराच्या डोळ्यांत धूळ घालायला पहातोस काय ! ठीक आहे ! मीही लेका, उलटा सापळा लावून, असं तुझं मुंगूस धरतो कीं, पहातच रहावं सगळ्यांनी ! सरलेची एका कोऱ्या कागदावर, कांहीं कोर्ट कामाकरतां, मागं सही घेतली होती ! त्यावरच मेजवानींची जागा ठरवून, हे त्याला उलट पत्र पाठवतो, म्हणजे हरहुकमी काम फत्ते झालेच पाहिजे ! बिलकूल संशय नको ! आणि पाठवतो, श्रीखंड्याकडून ! ते कांहीं नाहीं: याचा ताबडतोब निकाल लावलाच पाहिजे ! तो आमचा श्रीधरपंत निर्दोषी सुटल्यामुळं, केव्हां दत्त म्हणून उभा राहील त्याचा नेम नाहीं ! तेव्हां ताबडतोब या गोष्टीचा सोक्षमोक्ष केलाच पाहिजे ! श्रीखंड्या ! श्रीखंड्या ! ( तो येतो. ) अजून हे डोक्यावर टोपल आहेच ! हे पहा. हे पत्र घे ! आणि ह्या पलिकडच्या आळीच्या शेवटीं, तो डाव्या हाताला, बोळ लागतो. त्या बोळांतलं शेवटंच घर ! तें दोन मजली ! हॉं, तेथेंच दिनकराव सोंगाडे रहातात ! त्यांना हे पत्र नेऊन दे. जा ! उचल पाऊल चटकन ! श्रीखंड्या, या महत्त्वाच्या कामाबद्दल, चांगलं बक्षीस देईन, बरं कां ! कायरे घरी चांगला बंदोबस्त ठेवला आहेस ना !

**श्रीखंड्या**—तर ! घराच्या आसपास अठरा ते पंचवीस वयाचं चिटपांखरूं देखील, फिरकू दिलं नाहीं !

**विनायक**—ठीक आहे ! याही कामगिरीबद्दल, तुला चांगला मोबदला मिळेल ! चलं जा लवकर ! (तो जातो.) अरे कचोरी भरोस ! ए लड्डूभरोस ! ( दोन पुरभय्ये येतात. )

**कचोरी**—हां, महाराज, आज्ञा करो !

**विनायक**—हे पहा ! हे घर ! जवान छोकरा ! मिसरूं आहे नाहीं, हं, निदान चार महीने अंथरुणावर खिळला पाहिजे !

**कचोरी**—अरे महाराज ! काहे चिंता करो ! मारे लाठीके धडाकेसे दम उखाड देते ! लाव रुपीया लाव !

**विनायक**—हं, घ्या; हे! ते काम झाल्यावर, तुम्ही मी सांगितलं, त्याच्या आसपासच असा.

**लड्डूभरोस**—अरे आप निंचित रहो! अमी वहका पीट पिटाकर, बगैचेके आसपास खडे हुये जात है! आप होकर कपास घुनक देव!

(जातात.)

---

## प्रवेश पांचवा.

[ प्रेमाचे घर. ]

**गिरजा**—छे बया! लई मानसं थापा मारत्यात, थट्टामस्करीत खोट-नाट बोलत्यात, पन ह्येंचा परकार कांहीं न्याराच बघा! मी तर अक्क्षी दंग होऊन गेले! काय त्या पुतन्यानं, काकाला रिंगणात फिरवला, काई इच्यारू नका! आन त्योबी वेडयावानी समदं आकरून, गटागट गिळीत होता पगा! काय कांगावा! काय कांगावा केला पगा पुतन्यान कांहीं इच्यारूं नका! मी तर अक्क्षी हसन्याचा उमाळा दाबता दबता हैरान झाले!

**प्रेमा**—कायग, पण त्या पुतण्याचं नांव काय? ते कळलं कां तुला?

**गिरजा**—अहो, परभाकर! अर प्रभ्या, ह्यो काय केलंस! प्रभ्या, असं कसं तुझं, लगान लागलं! आन तकड मोगलाईत! प्रभ्या! कशाला गेलास होतास! असं म्हून काका, त्येंच्या अंगावर खेसकत होता नव्हका!

**प्रेमा**—काय म्हणतेस प्रभाकर! माय रोमॅंटिक लॉयन! आणि दामूअण्णांचे पुतणे!

**गिरजा**—व्हय! त्येचाच पुतन्या! अक्क्षी थापेबाज हायती! योक शबूद खरा बोलला असल, तर मला इचारा!

**प्रेमा**—शाबास! (तुला त्यांच्या थापेबाजीतलं काव्य काय कळणार? मला तर उलट असं वाटतं कीं—

पद

**वाटे प्रेमाची वाजवी मंजुसतार। जणु छेडी हृदया तार ॥ ध्रु० ॥ वचन तयाचे, दे प्रेमासी भरती। शृंगार भाव अपार ॥ १ ॥**

समुद्राचा अंत घ्यावा, तेव्हांच मोती मिळतात ! अरण्यांत वनवास काढावा तेव्हांच कस्तुरी लाभते ! आणि धाडस करावं, तेव्हांच रोमान्स जन्माला येतं ! ठीक, चल आंत ! प्रभाकरांनीं दामूअण्णांना मारलेल्या थापातलं अक्षरनी अक्षर सांगतां येईल तुला ! मी ते सर्व लिहून घेणार आहे !

**गिरिजा**--अक्षरनी अक्षर घ्या ! इतकंच नव्हं तर थापा मारतांना, कुठं खोकलं, कुठं गांगरलं ! कुठं डोळे मिचकावलं, त्ये समदं सांगते पगा !

**प्रेमा**—चल तर मग. एकंदरीत तूं बरीच बारीक नजर ठेवणारी आहेस

**गिरजा**—संवयच झाली हाय, मला ध्येनांत ठिवायची !

( प्रेमा व गिरजा जातात. व निळकंठराव व सुधा प्रवेश करतात. )

**निलकंठ**—खरंच सांगू कां, डिअर सुधे ! तिनं माझ्या प्रपोजलकडं दुर्लक्ष केलं, हे एकापरीनं माझ्यावर उपकारच झाले म्हणायचे ! कारण त्या उपकारामुळंच, ही सद्गुणी सुधा मला लाभली ! ( इतकं रोमँटिक प्रकरण मला झेपलही नसतं ! बरं झालं, भानगड आपोआप संपली ! )

**सुधा**—मग नाइलाजानं माझी पसंती ठरली असंच कीं, नाहीं !

**निलकंठ**—हे पहा, एकदा किनारा गांठल्यावर आतां वादळाची आठवण कशाला ! आतां मागल्या गोष्टी राहूं दे ! प्रथम निवड करतांना, अशा चुका होतातच ! एक वेळ वचन दिलं म्हणजे दिलं ! आतां जर तुझ्यावरील प्रेमांत, अंतर पडलं तर, मग मला म्हण ! आपण दोघेही वचनबद्ध झाल्याची बातमी, आतां प्रेमाला सांगायला तुझी हरकत तर नाहीं ना !

**सुधा**—मीच ती ओघाला आली म्हणजे कळवीन ! पण प्रेमा कुठं बरं गेली असावी ! थांबा, मी तिला पहाते !

( ती जाते व दामूअण्णा येतात. )

**निलकंठ**—कोण ? दामूअण्णा ! वाहवा ! वाहवा ! अलभ्य लाभ ! तुम्ही इकडे कुणीकडे ? या ! टेक युअर सीट !

**दामूअण्णा**—कोण ! निळकंठराव ! नमस्कार ! नमस्कार ! बरं, अनायासे भेटलात ! काय ! तुमचं कसं काय चाललं आहे ! तुम्ही काय खुशालचंद लोक ! मी तुम्हांला आज भेटणार होतो ! कायहो, हे आपलं मोरूभाऊ मुरादखांच, कसं काय घराणं आहे !

**निलकंठ**--काय ! मोरुभाऊ मुरादखां ! काय म्हणतां ! ते समजलों नाहीं !

**दामूअण्णा**--अहो, ते रोजाचे मोरूभाऊ ! रोजा. यलोरा !

**निलकंठ**--रोजा, यलोरा, मोरूभाऊ, मुरादखां ! कायहो, अलीकडे तुमची प्रकृती वगैरे ठीक आहे ना ?

**दामूअण्णा**--एः हॅः ! एः हॅः. जसं कांहीं तुम्हांला ठाऊकच नाहीं ! माझी प्रकृती उत्तम आहे ! मला तुमच्याच स्मरणशक्तीची शंका वाटते आहे ! अहो, रोजा, यलोरा, मोंगलाई, दौलताबाद, मुरादभाऊ !

**निलकंठ**--एक्सक्यूज मी ! मी थोडं तुमच्या डोक्यावर बर्फ ठेवायला मागवूं कां ?

**दामूअण्णा**--( उभ्या आयुष्यांत जितकं माणूस खोट बोलेल, तितकं हा पांच मिनिटांत बोलतो म्हणून जे प्रभाकर म्हणाला ते अगदीं खरं ! पहा, चेहरा कसा करतो आहे ! माझ्याशी लपंडाव करतो आहे ! ) अहो, तुम्हीच थोडी क्रोलन वॉटरची घडी ठेवा. आणि आठवण करा ! म्हणजे आठवेल तुम्हांला ! तुमची वेरूळच्या लेण्याच्या स्ट्रीपची आठवण करा ! ( हा तरी मला एक भ्रमिष्टच दिसतो. )

**निलकंठ**--ही व्यक्ती म्हणजे नमुना दिसतो आहे !

**दामूअण्णा**--अहो, ओका कीं आतां पोटांत ढवळत आहे ते ! असं कां लपवतां ! प्रभ्यानं सांगितलं मला, कसा त्याचा नाइलाज झाला तो !

**निलकंठ**--कसला नाईलाज ! कुणी केला ? कां झाला ? प्रभाकरानं सांगितलं !

**दामूअण्णा**--ओहो ! ओहो ! जसं कांहीं एक बिचाऱ्याला ठाऊक नाहीं ! अगदीं उपड्यानच रांगतो आहे ! अहांत खरे गाळीव रत्न !

**निलकंठ**--हा थेरडा मला नुसतां चक्रमच दिसतो आहे !

**दामूअण्णा**--अहो, आमच्या प्रभ्याच्या लग्नाचं !

**निलकंठ**--काय त्याचं लग्न झालं ! कुठं ! केव्हां !

**दामूअण्णा**--अहो, त्याच्या लग्नाच्या मेजवानीचं अन्न तुमच्या घशांत उतरलं आहे ! त्या अन्नाला तरी जागाल कीं कांहीं ! तुम्ही वेरूळची लेणी पहायला स्ट्रीप काढलींत, प्रभ्याला बरोबर नेलांत ! तिथं तो रोज्याला

थांबला ! तुम्ही दौलताबाद किल्ला, लेणी, समाधि पहायला गेलात ! तुमच्याबरोबर मुरादभाऊ, बोंबिलाबादचे नबाब दुमहिलाव, परत येऊन मथुराप्यारी मिठ्ठीजानवर आणि प्रभ्यावर अक्षदा टाकल्या ! कां, आठवतं का नाहीं. आतां सगळं तुम्हांला ? चांगलेच घालवेडे दिसतां !

निलकंठ—कायहो, तुम्हांला हे अस्स केव्हांपासून होऊं लागलं ? किती दिवस झाले सुटून तुम्हांला ? भलेबहाद्दर ! बोंबिलाबाद, दुमहिलाव, मुरादभाऊ, मिठ्ठीजान ! तुमचा तो पुतण्या आणि तुम्ही ही जोडी समुद्रमंथनाच्या वेळी निघालेली दारू पिऊन, दैत्यांनीं घडवली असली पाहिजे ! अहो, तुमची काकापुतण्याची जोड गोळी पृथ्वीवरून नाहींशी झाली, तर मनुष्य प्राण्यातला, एक मोठा नमुना नाहींसा होणार आहे ! तुमचा इथला प्रवास संपल्यावर, निदान तुम्हां काकापुतण्यांत, पेंढा गवत भरून प्रदर्शनांत तरी ठेवायला, लिहून ठेवा मृत्युपत्रांत ! असूं दे नमुना चार दिवस मागं !

दामूअण्णा—खबरदार ! एक अक्षर जास्त बोललास तर ! बेशरम, पाजी, हलकट ! तूं काय बेट्या, मला समजला आहेस ?

निलकंठ—वा रे थेरडा ! मी समजलो आहे. नुकतेच ल्युनॅटिक असायलम मधून तुम्ही सुटला अहांत ! ओल्ड फूल ! शट् अप् !

दामूअण्णा—यू स्काउंडरल ! डॅम लॉयर ! हरामखोरा ? माझ्या प्रभ्याला मोंगलाईत नेऊन गळा दाबलास ! तोंड फोडून टाकीन ! ( दोघे मारामारी करतात. इतक्यांत सुधा व प्रेमा येतात व दामूअण्णा व निलकंठराव ह्यांची समजूत घालतात ).

प्रेमा—थांबा ! थांबा ! निळकंठराव—

सुधा—प्लीज ! इथं भांडूं नका ! काय झालं एकदम एकेरीवर यायला !

दामुअण्णा—विचारा या गाढवाला ?

निळकंठ—शट् अप् ! यु चॅटर बॉक्स !

दामुअण्णा—यू फॉक्स !

निळकंठ—खात्रीनं हा भांग पिऊन आला आहे !

*दामुअण्णा—तूं ओढला आहेस गांजा !*

प्रेमा—थांबा ! थांबा ! प्लीज ! शांत व्हा ! शांत व्हा ! टेक युअर सीट !

निळकंठ—मिठ्ठीजान ! रोजा ! दुमहिलाव ! नुसती मोगलाई केलीन आतां इथें !

प्रेमा—वेल, मिस्टर निळकंठराव ! वृद्ध माणसाचा तुम्ही कांहीं झालं तरी, मान राखला पाहिजे ! ही इज् ओल्ड मॅन !

दामुअण्णा—शिकवा त्या गाढवाला कांहीं तरी अक्कल ! शिक ! त्या तरुण मुलीकडून तरी ! घेत जा रोज थोडीशी !

प्रेमा—वेल, दामूआण्णा ! तुम्ही कां बरं इकडे येणं केलं ?

दामुअण्णा—वेल, प्रेमाबाई ! आय ॲम सो सॉरी ! मी माझा पुतण्या चिरंजीव प्रभाकर विषयी मागं गोष्ट काढली होती ! पण मला केवळ नाइलाजानं तो प्लॅन रहीत करावा लागतो आहे ! तुमच्यासारखी सून मिळण्याचं भाग्य, नाहीं माझ्या नशिबी !

प्रेमा—वेल, आपल्या मनासारखे योगायोग जुळून येणं, फारच थोडयाच्या नशींबी असतं ! वेल, कान्ट हेल्प ! तरी पण मी मात्र तुमच्या प्रभाकराच्या मॅरेजमुळं, फारच निराश झाले ! आणि हा सगळा दोष ह्यांचा आहे !

निळकंठ—काय माझा ?

दामुअण्णा—घाला आणखी थोडी त्याच्या तोंडांत बर्फी तुम्हीच ! तरी पण प्रभ्याच्या अधिक प्रसंगाबद्दल, मी प्रभ्याला देखील चांगलं शासन करणार आहे !

प्रेमा—छे, छे, या वेळेस त्यांना शासन करणं, म्हणजे दुसऱ्या निरपराधी माणसालाही शासन होईल ! प्रथम तुम्ही तुमच्या सुनेला पाहिल्याखेरीज, कोणचीही गोष्ट करूं नका ! मी स्वतः ऐकलं आहे कीं तुमची ती मिठ्ठीजान, मथुराप्यारी फारच सुस्वरूप आणि नांवासारखी गोड मुलगी आहे !

दामुअण्णा—ओ थँक्यू ! फॉर युअर अडव्हाईस ! बरं, प्रथम तिला आणवतो ! ( निळकंठास ) अहो, तुम्ही माझ्याशीं कोंबडं लपवलतं पण उजाडायचा थांबल नाहीं म्हटलं ! ठीक. गुड डे गुड डे ! (जातो.)

प्रेमा--वेल. निळकंठराव ब्रदर आणि अहो वहिनीसाहेब ! कांग्रॅच्युलेशन ! चला, आधी चहा घेऊं सगळे, मग बोलूं ! ( जातात. )

---

## प्रवेश सहावा.

[ सीन-रस्ता. पात्र-प्रभाकर. ]

प्रभाकर--जागृतीच्या सृष्टीपेक्षां, कल्पनामय सृष्टीत मजा असते खरी ! पण कल्पनासृष्टींत जी कामं मनुष्य एका फटकाऱ्यासरशी पार पाडतो ! त्याच्यातलं थोडसं जरी काम, जागृत सृष्टीत करायला गेलं, तर मात्र ताबडतोब फटके बसतात ! कल्पनांचे, शब्दांचे खेळ खेळतांना कवि लोक सहजासहजी, दोन निराळ्या स्वभावांचे शब्द जुळवून, सुंदर कोटीला जन्म देतात ! आणि आपल्या रसीक जावयांचा संसार थाटून देतात ! पण, मी मात्र शब्दांचे खेळ खेळून, नसत्या लफड्यांत येऊन पडलो ! हे कोण विक्षिप्त ध्यान इकडे येत आहे ! ( श्रीखंड्या, धोतर उपरणें, जोडा, डोकीवर साहेबी टोपी घालून येतो. )

श्रीखंड्या--( सहज ऊन लागते, म्हणून घालून आलों ! ) ( पत्ता-वाचून ) पलिकडच्या आळीच्या शेवटी डाव्या हाताचा बोळ, बोळातलं डाव्या हाताचें दोन मजली घर, दिनकरराव सोंगाडे ! अग आई ! हे बूप नाहीं घालायची संवय मला ! सारखं पायातनं निसटतं आहे, आणि तीन ठिकाणीं पायाला चावलं आहे ! मला तर पाऊल टाकवत नाहीं ! हे कोण !

प्रभाकर--काय अजब प्राणी आहे ! अलो, गुडमार्निंग ! जन्टलमन !

श्रीखंड्या--गुडमार्निंग ! नाहीं म्हटलं ! उभ्या आयुष्यांत मनुष्याचं हृदय ओळखणारा मनकवडा आज मला दिसला !

प्रभाकर--काय म्हणतां !

श्रीखंड्या--मी स्तुती नाहीं करीत तुमची ! जो पहावा तो माझ्या पोषाखाला नाक मुरडणाराच भेटतो, पण यांना या टोपीची काय किंमत !

प्रभाकर--बरोबर आहे ! ही टोपी ज्याच्या डोक्यावर बसली, तोच तिची योग्यता जाणतो ! मी तर असं म्हणतो कीं ही टोपी वर असली

म्हणजे आंत डोक्याची देखील तिला जरूर लागत नाहीं! बरं, पण हे पत्र घेऊन कुठं निघाला आहांत?

**श्रीखंड्या**--त्या दुमली घरांत दिनकरराव सोंगाडे राहातात, त्यांना हें द्यायचें आहे!

**प्रभाकर**—पण तुम्हांला नुसतां हेलपाटाच पडणार आहे!

**श्रीखंड्या**--कां बरें?

**प्रभाकर**--ते आणि मीं, असे दोघेच तेथें राहतो! दिनकरराव आतांच जिमखान्यांत गेले आहेत! माझ्यावर तुमचा विश्वास असल्यास मला द्या, मी देईन त्यांना!

**श्रीखंड्या**--पत्र जरा नाजूक महत्त्वांच्या कामाचं आहे म्हणून...

**प्रभाकर**—असं काय! (मला गुंगारा देऊन, बेटा दुसरीकडे काव्य करतो आहे! आतां ही संधी दवडूं नये.) अहो, ते आणि मी कांहीं दोन नाहीं! आणि त्यांतून तुम्हांला भेदभाव वाटत असला, तर हे घ्या! (पांच नोटा दाखवतो.) अहो, ह्याचं दर्शन झालं म्हणजे, मोठमोठे अधिकारी देखील, आपलं निकटचं नातगोत, भेदभाव विसरतात! मग दुसऱ्याची काय कथा! वेल, जन्टलमन! टेक इट्!

**श्रीखंड्या**--ऑल राईट! (मला तरी कुठं लंगडी घालवते आहे.) वेल, जन्टलमन! तुम्ही अगदीं दुसऱ्याचं काळीज काबीज करणारे आहात बुवा! ठीक आहे! हे घ्या! कुणीकडून त्यांना पोहचतें करा म्हणजे झालें! बरें गुडमार्निंग! (जातो.)

**प्रभाकर**--कांहीं असो प्रदर्शनांत ठेवण्याला लायक प्राणी आहे! (पत्र वाचतो.) काय! 'आप्पासाहेब बाहेर गेले. सायंकाळी बागेच्या कोपऱ्याकडे यावे. मला बरं वाटेल हो! तुमची सरला!' बेट्या! दिन्या! खरोखर मला असं वाटत कीं—

**पद.**

**स्त्रीवदन रंगभूमि गमे प्रिय, दिसे सुशोभित नव रसांनीं मज॥ धृ०॥ नयन अधर हनु नाटक दाविती परम कुशल नट, नाट्य प्रेमी मज॥ १॥ वीर करुण रस वत्सल भावा, प्रगट करिती मुखीं अभिनयानीं॥ २॥**

ललनांच्या मुख रंगभूमीवरील नाटकाला जिथें देवादिक मोहून गेले, तिथं दिनकरा तुझा काय पाड ? ठीक आहे ! हे सरलाकाव्य शोधून काढतोच तर मग ! अरे हे कोण ? पुन्हां काका ! आली कंबक्ती !

[ दामूअण्णा येतो.]

**दामुअण्णा**—कोण प्रभ्या ! चल आधी घरीं ! काय कार्ट्यां उपद्-व्याप तुझे ! जगांत तोंड काढायला मला सोय राहिली नाहीं ! एवीतेवी तुझ्या लग्नाची धिंड निघालेली सर्वत्रांना ठाऊक आहेच ! मग आतां त्या बिचारीला वनवास का ? नो, नो ! मी आतां गाडीनं रोज्याला जाऊन तिला घेऊन येतो !

**प्रभाकर**—( हं, आतां फुटणार भ्रमाचा डेरा.) छे, छे, इतक्यांत नॉट नेसेसरी !

**दामुअण्णा**—यु आर ए डॅमफूल ! नो, नो, तिला घेऊन आलंच पाहिजे !

**प्रभाकर**—अहो, तिला इतका लांबचा प्रवास नाहीं सहन व्हायचा ! पुढं मागं पाहूं !

**दामुअण्णा**—ओ, नो ! प्रवास सहन न व्हायला काय झालं ! नो, आय मस्ट ब्रिंग हर !

**प्रभाकर**—आय बेग पार्डन ! माझ्याकडून एक अपराध झाला आहे, म्हणून म्हणतो, तूर्त तरी बेत रहीत करा !

**दामुअण्णा**—डॅम ईट ! आणखी काय गुण पाघळलेस !

**प्रभाकर**—वेल, आतां प्लेनली सांगायचं म्हणजे काका, तिचं पाचव्या महिन्याचं नुकतंच डोहाळजेवण झाल्याचं पत्र आलं आहे ! शिवाय पही-लटकरीण माहेरीच बरी पहिल्या खेपेला !

**दामुअण्णा**—मॉय गॉड ! प्रभ्या ! काय उतावीळपणा तुझा मूर्खा हा !

**प्रभाकर**—काका ! अपराध घडला खरा ! आतां काय निस्तरलं पाहिजे !

**दामुअण्णा**—वेल, नेव्हर माईंड ! मी तिला फर्स्टक्लास रिझर्व करून घेऊन येतो ! चल घरीं आताच्या आतां, मला ठरवलं पाहिजे !

**प्रभाकर**—काकासाहेब, ते सगळं खरं, पण तुम्ही कां तसदी घेतां ! अहो, ती मुसलमान आहे कां हिंदू आहे, ते माझ्याशिवाय त्या ब्रह्मदेवाला सुद्धां कळणार नाहीं !

**दामुअण्णा**—मला तुझा तोंडाचा बकवा नको आहे ! चल हो पुढें ! काय करायचं तें मी अत्ता ठरवतो ! चल, एनी हाऊ आज मला निघालच पाहिजे !

**प्रभाकर**--( आतां या मंगळावरच्या सफरीचं काय होणार तें दिसतच आहे ! ) ठीक आहे, चला ! घरीं आपण सगळा प्लॅन ठरवूं !

**दामुअण्णा**—ऑल राईट ! कमलांग ! [ जातात. ]

---

## प्रवेश सातवा.

[ सीन–बगीच्या. पात्रें–सरला ].

**सरला**—माझ्या बाबांनीं मी आल्याचं कुठं बोलूं नकोस, म्हणून का सांगितलं ते कां ! कुणाला ठाऊक गडे ! ते असे कष्ट सहन करीत, घरांत लपून राहिलेले, मला नाहीं बरं वाटत ! पण काय करायचं ! वडील माणसांनीं सांगितलेलं ऐकलं पाहिजे ना ! हो खरंच, हें पुन्हां पत्र वाचते ! कोण बाई रीत ही पत्र पाठवायची ! हळूंच धोंड्याला गुंडाळून, त्यांनीं माझ्याकडे भिरकावून दिलं ! तीन तिनदां वाचलं, तरी पुन्हां वाचावंस वाटतं ! असं कां वाटतं, कुणाला ठाऊक ! ( पत्र वाचते. ) ‘ माझे जीवप्राण सरले ’ तुम्ही माझे जीवप्राणच अहांत ! ‘ संध्याकाळीं अप्पासाहेब बाहेर गेल्यावर, बागेच्या कोपऱ्यावर ये !’ मी आले ना सांगितल्यासारखी ! पण तुम्हीच गडे, आला नाहींत ! आतां केव्हां येणार, ते कुणाला ठाऊक बाई ! एक क्षणभर ते माझ्याजवळ नसले, म्हणजे मला कसं एक वर्ष लोटल्यासारखं वाटतं ! जरा फुलं हालली कीं वाटतं, कीं तेच हांसत येताहेत ! पांखरांनीं मंजूळ स्वर काढला कीं वाटतं, तेच मला हांका मारताहेत ! माया वेडी असते, म्हणून मला म्हणत होते ! खरंच मी

मायेनं वेडी झाले हो ! या गडे लवकर ! मला कसं रडायला येत आहे हो ! केव्हां येताहेत देव जाणे बाई ! ( दिनकर शीळ घालतो.)

**दिनकर**—( टाळी वाजवतो. ) शूः शूः सरले ! सरले !

**सरला**—हे पहा ते आलेच ! मी कीं नाहीं किती किती तरी वाट पहात होते हो !

**दिनकर**--पण मी आलोंना तुला पत्रांत लिहिल्याप्रमाणं ? बरं ते अप्पासाहेब कां मसण्यासाहेब कुठें गेले ?

**सरला**--ते मघाशींच बाहेर गेले !

**दिनकर**—मी मेजवानीचा बेत केला ! त्या ठिकाणीं तर कोणीच नाहीं ! त्याला आला वाटतं वास आमच्या पक्कान्नाचा ! ठीक. लाडके चल ! आतां इथं मुळींच वेळ लावतां कामा नये. शूराला दया आणि प्रेमी माणसाला धाडस जरूर पाहिजे !

**सरला**—तुम्ही मला आतां कधीं कधीं सोडून जाणार नाहींना ? मी तुमच्याशिवाय जिवंत रहाणार नाहीं, असंच मला वाटतं हो !

**दिनकर**—सरले, नाहीं, तुला कधींही विसंबणार नाहीं !

## पद

**उजळली चंद्रप्रभा । दिसत तव वदनशोभा ॥ धृ० ॥**
**विसरूं कैसा आता । देवी विमल कांता, हृदयीं तुज ठेऊनी ।**
**करिन सतत प्रेमपूजा ॥ १ ॥**

जिवाला जीव देणारी, अशी सुखदुःखाची वाटेकरीण मिळाल्यावर, त्या स्वर्गसुखाची तरी कुणाला काय प्रतिष्ठा ! चल तर लाडके, आपण दोघे प्रेमी सर्व जगाला आवडूं ! कारण सगळं जग कोणत्याना कोणत्या तरी प्रकारचे प्रेमीच आहे ! सरले, तुझं सौंदर्य हें रत्न आहे खरं. पण तुझा चांगूलपणा, हा तर रत्नांचा खजिना आहे ! चल, अशी माझ्या मागून ये !

**सरला**--चला, तुमच्या बरोबर अगदीं जगाच्या अंतापर्यंत यायला मी तयार आहे हो ! थांबा ! गडे ! तुम्हांला सांगायला वेळच मिळाला नाहीं, काल कीं, नाहीं ? ( त्याच्या कानांत सांगते. )

**दिनकर**—काय ? तुझे वडील--

**सरला**—होय ! त्यांनीं कुणालाही सांगूं नको असं ते म्हणाले ! त्यांना आत्ताच हांक मारून आणूं कां ? हांक मारूं कां ?

**दिनकर**—छे, छे, तुला आधी माझ्या घरीं नेऊन सोडतो, आणि मग मी स्वतः जाऊन त्यांना घेऊन येतो. चल तर !

**सरला**—बरं तर ! ( ते दोघे जाऊं लागतात इतक्यांत विनायक, श्रीखंड्या, व दोन पुरभय्ये येतात व धरतात. )

**विनायक**—अरे हरामखोर ! दगलबाज ! भय्या, पकडलेव उसकूं ! श्रीखंड्या ! घाल लाथा कमरेंत !

**श्रीखंड्या**—क्रिक लाथ मारणें ! लाथा मारतो !

**विनायक**—अग सटवे ! पळून जात होतीस काय ?

**सरला**—तुम्हीं नाहीं कांहो सांगितलं अप्पासाहेब कीं, लग्न लावलं म्हणजे पाप नाहींस होत म्हणून मी त्यांच्याकडे लग्न लावण्याकरतां जात होते !

**दिनकर**—कोण अप्पासाहेब आणि विनायकराव दोन्ही व्यक्ती एकच !

**विनायक**—होय, होय ! तोच मी तुझा बाप ! भय्या, श्रीखंड्या ! कर पक्वान्नांच वाढप सुरूं ( ते मारतात. )

**सरला**—अग आई ! नकाहो त्यांना मारूं ! मी तुमच्या पाया पडते ! त्यांच्या ऐवजीं माझा प्राण मी खुशाल देते हो !

**विनायक**—गप्प बैस टवळे ! तुलाही घे दोन लाथा !

**दिनकर**—अरे निर्दय चांडाळा ! तिला कां मारतोस ! त्या गाईचा कांहीं एक अपराध नाहीं ! सर्व जबाबदार मी आहे !

**विनायक**—ह्याच्यावर प्रेम करूं नको, म्हणून तुला बजावून सांगितलं होतं ना ?

**सरला**—पण होईना हो तसं ! जों जों कमी करायला गेले, तों तों वाढतच जाऊं लागलं ! त्याला काय तरी करूं मी !

**विनायक**—माझ्यावर प्रेम करीत जा, म्हणून सारखी तुझ्याजवळ जपमाळ घेतली होती ना सटवे ! टवळे, त्याचं काय ?

**सरला**—नाहीं हो करवत त्यांच्यासारखं, तुमच्यावर एक प्रकारचं

प्रेम ! जसं त्यांनीं करवून घेतलं, तसं तुम्ही कांहो नाहीं करवून घेतलं प्रेम ! मी अडवून कां धरलं होत तुम्हांला !

**विनायक**—सारखी माझी अक्कल माझ्या गळयांत ! माझी बोटं माझ्या डोळ्यांत ! माझं घोंगड माझ्या गळयांत ! सटवीचं पहा, कसं चुरुचुरु तोंड चाललं आहे ! खबरदार एक शब्द बोलशील तर ! चल हो पुढं ! श्रीखंड्या ! भय्या ! इसकू खींचकर ले चलो घरकूं ! पक्कान्नानं पोट भुगून तणावा लागलेल हे मुंगूस आधी पोत्यात घालून, सोडग्यानं चेचतो चांगलं ! ( दिनकरास. ) कायहो. कसं केकाटेल ते आतां पोत्यांत ! चल हो पुढं !

**सरला**—चांडाळांनो ! तुम्ही यांचा प्राण कां घेणार अहांत ! अग आई, मेले ! धांवा हो कुणी तरी ! बाबा ! बाबा ! धांवा हो धांवा !

**विनायक**—खबरदार ओरडलीस तर ! आतां कोण तुझा बाप स्वर्गातून तुला सोडवतो तें पहातो. ( इतक्यांत श्रीधरपंत येतो. )

**श्रीधरपंत**—खबरदार ! हा पहा मी हिचा बाप ! प्रत्यक्ष इथें तुमच्या समोर उभा आहे !

**विनायक**—कोण ! श्रीधरपंत !

**श्रीधरपंत**—होय तोच तो ! पुन्हां एकवेळ चांगला मला निरखून पहा !

**सरला**—बाबा, हें आम्हांला मारून टाकणार होते हो !

**विनायक**—माझी तर खात्रीच झाली ! शंकाच नाहीं !

**श्रीखंडया**—काय ! हे सरलेचे वडील ! आतां आपणही पवित्रा बदलावा ! नाहींतर आमचं क्षुधाशांतिगृह कसं निघणार ! ये गंगापुत्रा, सोड यांना ! बेट्या प्रत्यक्ष बाप इथं असल्यावर हा तिन्हाईत चोर, कोण आम्हांवर हुकूम गाजवणार !

**भय्या**—अच्छा, लाव पैसे लाव !

**श्रीखंडया**—कसले पैसे !

**दिनकर**—पकडा याला आधीं ! बेकायदा अटक केल्याबद्दल पोलीसकडे घेऊन जाऊं !

**भय्या**—अरे वा ! एतो, हमकाही फसानेकी कारवाई करत है ! अछा भाई तोहार तुम जावो ! हमतो जाईत है !

**श्रीधरपंत**--वा! विनायकराव, चांगला माझा विश्वास पाळलात! माझ्याकडे काय निरखून पाहतां? मित्रद्रोहाची आणखी कांहीं नवीन युक्ति शोधून काढतां वाटतं? आज दोन दिवस या भिकाऱ्याच्या वेषांत तुमचं सर्व चरित्र पाहतो आहे! माझ्या सरूचं जर तुमच्यावर प्रेमच नाहीं, तर तें जबरदस्तीन कसं उत्पन्न होणार!

**दिनकर**—पण तें या पढत मूर्खाला काय समजणार?

**विनायक**—मी, दिलेल्या, एकांगी शिक्षणाचाच हा परिणाम! आतां जास्त शोभा करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं! ठीक आहे. तुमचे तुम्ही, तुमच्या मुलीच वाटेल त्या गाढवाशीं लग्न लावण्यास मुखत्यार आहांत! हा पहा मी चाललो. (जाऊं लागतो.)

**श्रीधरपंत**—थांबा! थांबा! विनायकराव रागावूं नका! स्वार्थबुद्धीनं कां होईना. पण माझ्या मुलीचं, तुम्ही अत्यंत ममतेनं लालनपालन केलंत, हे तुमचे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं! पण तुम्ही प्रत्यक्ष माझ्या पोटच्या पोरावर धडधडीत करीत असलेला अन्याय मला कसा बघवेल?

**दिनकर**—आंगणांतल्या निसरड्यावर, तिऱ्हाईतापेक्षां घरच्याच मालकाचे दांत आधीं पडतात!

**विनायक**—बरं बरं, उगीच मिजास मारू नकोस! नशिब थोर, म्हणून बचावलास चोरा!

**सरला**—कुणालाहो चोर म्हणतां? बाबा, मी यांच्याशीच लग्न लावणार हो! माझी यांच्यावरच माया, आणि एक प्रकारचं प्रेम आहे हो!

**श्रीधरपंत**--सरु, मी तुझ्याविरुद्ध कांहीं करणार नाहीं किंवा कुणालाही करूं देणार नाहीं. (आंत ओरड होते.)

**भय्या**—अरे चल सबूर, कहा भगी जात हो! (भय्या प्रभाकराला घेऊन येतो) लेव महाराज, येहेका कबजेमे!

**दिनकर**—कोण प्रभ्या! हेरे काय झालं!

**प्रभाकर**--तुझं काव्य माझ्या पाठीवर छापून निघालं! दुसऱ्याचं पत्र मध्येच उडवलं त्याचा परिणाम!

**विनायक**—आमच्या रिकाम्या घराच्या सांपळ्यांत हें भलतच रोमँ-

टिक मुंगूस अडकलं तर! हें पत्र तर, ह्या चोराला देण्याकरतां सांगितलं. सुटला हा हरामखोर!

**सरला**—शिव्या देऊं नका यांना, सांगते बऱ्या बोलानं बर कां! तोंडांत शिवी असणं अगदीं चांगलं नाहीं!

**श्रीखंडया**—अहो, त्यांनीं अती आग्रह केला, मी म्हटलं पैसे मिळून, हेलपाटा वाचतो, तेव्हां कुत्ता जाने चमडा जाने!

**दिनकर**—कायरे! एकंदरींत रोमांटिक मेजवानी झोडलीस तर!

**प्रभाकर**—अरे बाबा! जो पक्वान्न खातो, त्यालाच स्वाद कळतो! काय हसतोस! हाडाहाडांचे सांधे निखळले माझे! परदुःख शीतळच असतं!

**दिनकर**—डिअर अर्धांग्या! नो, नो, आय ॲम सो सॉरी! मी स्वतः आज तुझं आंग चेपून देतो!

**सरला**—कायहो, चांडाळासारखं तुम्ही मारवलंत दोघांना! मी आंबेहळदीचा ओढा उगाळून लावते हं!

**प्रभाकर**—( दिनकरास ) हेंच कां आर्यावृत्त!

[ **निळकंठ, सुधा, गिरिजा, दामुअण्णा** येतात. ]

**दामुअण्णा**—कायरे प्रभ्या, माझ्या हातावर तुरी देऊन बागेत पळून आलास काय! आणि असा काय तुझा अवतार हा!

**दिनकर**—मेजवानींत चार घांस जास्त झाले इतकंच बाकी सर्व ठीक आहे!

**सुधा**—प्रेमाच्या रोमांटिक विमानाचा हाच पायलाट! गिरजे! जा बघू आधी पमेला इकडे घेऊन ये!

**गिरिजा**—अवो, मीच वाहूळची शोधतीया त्येना! त्या म्हनं आणखी दोघी जनी कुठं सिंहगडावर गेल्याती!

**सुधा**—आणि मला न कळवतां! ( अन्नपूर्णा येते. )

**अन्नपूर्णा**—इश्श! मी सगळीकडे शोध शोध शोधलं! तुम्ही इथं कां बागेत आलांत! आम्हांला सांगायचं तरी!

**श्रीखंडया**—आने, इकडे ये! ( विनायकरावाकडे ) यांचा आपला संबंध नाहीं! हे सरलेचे वडील! अन्नपूर्णा क्षुधाशांतीगृह!

**दामुअण्णा**--वेल, युअर हायनेस दुमहिलाव! (सर्वजण, काय! दुमहिलाव) तुम्ही तर आज अगदीं आमच्या पोषाखांत आहांत! नबाब लोक असतात खरे लहरी! वेल, आय डोन्ट केअर! प्रभ्या! मी माझा फर्स्टक्लास रिझर्व करण्याचा बेत रहित करून, आपल्या मोटारीनं रोज्याला थेट जाणार आहे! चल तूं माझ्याबरोबर!

**प्रभाकर**—(आतां काय करावं या म्हाताऱ्याला!) अहो, काका! सध्या नको उगीच त्रास पहिलटकरणीला! पुढंमागं पाहूं!

**दामुअण्णा**—नो, नो, तुला आलंच पाहिजे! कमलांग--

**शंभ्या**--अवो, सुधाताई! पमाताई कुठं हायती? त्यांच्याकडं योक पाहुणी आलीया! तुम्ही संमदं हत अहात. म्हून कळलं, तवा संगच घेऊन आलो! ह्यो बगा ह्या आल्याच!

**प्रेमा**--( मुसलमानी बुरखा घेऊन येते. ) सलाम, आलेकम!

**दिनकर**—सलाम वालेकम!

**सुधा**—बाई, आपण कोण? कुठल्या? काय पाहिजे तुम्हांला?

**प्रेमा**--मैं दौलताबाद, रोज्यासे आईहूं!

**दामुअण्णा**—काय? दौलताबादेहून?

**प्रेमा**—हां! मैं रोज्याके रहनेवाली हूं!

**प्रभाकर**—हे काय नविन लचांड!

**दामुअण्णा**—बाई, तुमचं नांव काय?

**सुधा**—कशाकरतां आलांत?

**प्रेमा**—मेरा नाम मथुराप्यारी! मै मोरूभाऊ, मुरादखांकी लडकी हूं! मेरी इनके साथ शादी हुई है! नहीं इनके साथ!

**दामुअण्णा**—कपाळ माझं. कायरे कार्ट्या! मुसलमान कां झाला आहेस?

**दिनकर**—छे, छे, उदरकी रहानी अशीच रहेता है!

**प्रभाकर**--अहो, दुमहिलाव! गप्प बसा! काका, हिचा माझा कांहीं-एक संबंध नाहीं! ही दुसरीच कुणी तरी गुलबकावली आहे!

**प्रेमा**--कुनी कैसी नहीं, ये ही मेरे खाविंद है!

दामुअण्णा—गोविंद !

प्रेमा—आब मै नही छोडूंगी !

प्रभाकर—अग, मस्ताने ! तुझा बाजीराव मी नाहीं !

प्रेमा—नही, नही, तुमही मेरे बादशहा हो ! आब मै नही तुमकूं छोडूंगी !

निलकंठ—केली तशी भोग फळ आतां !

दामुअण्णा—हरामखोरा, काय उपद्व्याप तुझे हे !

दिनकर—हं, पत्कर हिला ! मोठे दुर्गुणं मोठी माणसच झाकू शकतात!

प्रेमा—मै तुमारी शादीकी औरत हूं ! तुम मेरा इन्कार करोंगे तो मै, मेरी जबान खींचकर, तुमारे कदमोंपर मर जावूंगी !

दामुअण्णा—हरे राम ! प्राण देऊंगी म्हणते आहे !

सुधा—ती कशाला बाई खोट सांगेल ! अहो, पत्करा बिचारीला ! खोटं हें कधी म्हातारं होत नाहीं ! तें नेहमीं अल्पायुषी असतं !

दिनकर—जगांतल्या रिकामटेकड्या कवींनी हें प्रेमाचं कारट लाड करून अगदीं बिघडवून टाकलं आहे ! वाटेल त्याच्या ते आंगचटी जातं ! हं, प्रभ्या ! जाऊं दे आतां ! घे पदरांत बिचारीला ! (सर्व आग्रह करतात.)

प्रभाकर—अग, आकाशांतले लिलंबरी, ढगांतले मिठ्ठीजान या बुरख्यांत जीव नाहीं कां घुसमटला तुझा ! अग, तो बुरखा तरी काढ ! म्हणजे कोणची सुसर हे माणिक गिळणार हें तरी समजेल ! आणि बये, तुलाही थोडा वारा लागेल !

प्रेमा—( बुरखा काढून ) ही पहा, कोणची सुसर आहे ती !

सर्वजण—( काय प्रेमाबाई! शाबास ! )

दामुअण्णा—बरी मात केली सर्वांवर ! प्रभ्या ! चल इकडे ये असा !

प्रभाकर—मॉय गॉड ! माय हिरॉईन !

प्रेमा—माय हीरो !

दामुअण्णा—( प्रेमा व प्रभाकर ह्यांचे हातांत हात देतो. )

श्रीधरपंत—या आनंदाच्या प्रसंगी मीही माझी कामगिरी पुरी करतो ! ( सरलेचा हात दिनकरच्या हातांत देतो. ) विनायकराव, तुम्ही कष्टी होऊं

नका ! आजपासून तुम्ही, मला माझ्या सख्या भावाप्रमाणं अहांत ! झालं गेलं विसरून जा !

प्रेमा—काय, कसं काय वहिनी ! तुमचं ठीक आहे ना ?

सुधा—उत्तम चाललं आहे वन्स, बरं कां !

श्रीखंडया—अहो, शंभेश्वर भट्ट ! आमचं कार्य ब्राह्मणाच्या हातूनच पार पडावं, असा ह्यांचा आग्रह आहे, तेव्हां तुमच्या वहिनींचा हात, आमच्या हातात दिला, तर बरें होईल म्हटलं !

शंभ्या—' तथास्तु ' म्हटलें !

श्रीधरपंत—थांबा ! तें काम मी आनंदानं करतो !

प्रेमा—आणि मी हें उल्हासानं पत्करतें !

( गिरिजेचा हात शंभ्याच्या हातांत देते. )

प्रभाकर—लुच्चे, लफंगे, चोर, धाकुशी, मत्सरी, ढोंगी, दांभिक, लब्ध-प्रतिष्ठित असले लोक निर्माण करणं, म्हणजे देवाच्या हातचा नुसतां मळ आहे! पण हे असले निरभिमानी, रसिक, आनंदी, प्रेमी लोक निर्माण करतांना मात्र देवाला आपली पुण्याईच खर्च करावी लागते !

दिनकर—माय डिअर अर्धांग्या ! देव देव काय करतोस ! यांच्यांतली जी माणसं अजरामर झाली, त्याचेच पुढें देव झाले !

दामुअण्णा—होय ! होय ! आणि ह्या असल्या देवदेवतांनी गजबजलेल्या विश्वाचं वैचित्र्य पाहून मी तर थक्क झालों. ठीक आहे ! आतां सर्वांचं चित्त सावधान करून या गोड प्रसंगाचा शेवट शुभमंगलात करूं या !

॥ कोरस ॥

**स्वातंत्र्य दे मम भारताला । विनती प्रभो तुझीया पदाला ॥ ध्रु० ॥ स्वातंत्र्यता ही जननी सुखाची । जनएक्यतेची नव कल्पनाची ॥ १ ॥**

**प्रसवे जगी तीच ज्ञानी कवींना । स्वातंत्र्यता प्राण राष्ट्रासि जाणा ॥ २ ॥**

॥ श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

११३४

IRBK-0101114

IRBK-0101114

IRBK-0101114

